CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २१ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३२१ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### वैद्यकीय शिक्षण महागणार

**मुंबई** : खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पाच पट शुल्कवाढ होणार असल्याचे वृत्त आहे. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण महागणार आहे. शुल्क प्राधिकरणाने राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांसाठी शुल्क निर्धारित करून दिले आहे. दुसरीकडे, वैद्यकीय शिक्षण विभागाने खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांसाठी शुल्कवाढीचा निर्णय घेतला आहे. महाविद्यालयातील मॅनेजमेंट कोट्याच्या जागांसाठी नियमित शुल्काच्या पाचपट अधिक शुल्क आकारण्यास आपली काहीही हरकत नसल्याचा निर्वाळा वैद्यकीय शिक्षण विभागाने दिला आहे.

### आयएनएस विक्रांत नौदलात दाखल

**मुंबई** : संपूर्ण स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून देशातच विकसित करण्यात आलेले आयएनएस विक्रांत हे विमानवाहू जहाज शुक्रवारी नौदलाच्या वेस्टर्न ताफ्यात दाखल करण्यात आले. यामुळे नौदलाची अरबी समुद्रातील ताकद अनेक पटींनी वाढणार आहे. भारतीय नौदलाकडे आता वेस्टर्न फ्रंटवर दोन स्वदेशी विमानवाहू जहाज आहेत. यापूर्वी आयएनएस विक्रमादित्य हे विमानवाहू जहाज दाखल झाले होते. त्यात आता आयएनएस विक्रांतची भर पडली आहे, अशी माहिती नौदलाने जारी केलेल्या निवेदनातून देण्यात आली.

### गंगाजळी नव्या उच्चांकावर

**नवी दिल्ली** : गोल्ड रिझर्व्हच्या मूल्यातील वाढीमुळे भारताच्या परकीय चलन साठ्याने पुन्हा एकदा नवीन ऐतिहासिक उच्चांक गाठला आहे. आरबीआयने दिलेल्या माहितीनुसार, १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत भारताचा परकीय चलन साठा २२३ दशलक्षने वाढून ६८९.४८ अब्ज झाला आहे. विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी सप्टेंबर महिन्यात देशांतर्गत इक्विटी मार्केटमध्ये ३३,३०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे, जी मार्च २०२४ मध्ये ३५,१०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे.

### श्रीलंकेत आज राष्ट्रपतिपदाची निवडणूक

**कोलंबो** : २०२२ मधील सर्वांत वाईट आर्थिक मंदीनंतर श्रीलंका शनिवारी होणाऱ्या महत्त्वपूर्ण राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी तयारी करीत आहे. विद्यमान अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे हे अपक्ष उमेदवार म्हणून पुन्हा निवडून येऊ इच्छितात. विश्लेषकांचे मत आहे की, १९९२ नंतर श्रीलंकेच्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्या इतिहासात त्रिपक्षीय लढत प्रथमच होत आहे. ही निवडणूक इतर सर्व अध्यक्षीय निवडणुकांपेक्षा वेगळी आहे; कारण २०२० च्या संसदीय निवडणुकीत सर्व तीन प्रमुख दावेदारांना पराभवाचा सामना करावा लागला होता.

# शहरी नक्षल्यांच्या हाती काँग्रेसची सूत्रे

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा घणाघात
- वर्धेत विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा
- अमरावतीच्या पीएम मित्र टेक्स्टाईल पार्कचे भूमिपूजन




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे चरखा देऊन स्वागत करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस व अजित पवार. सोबत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, आमदार समीर कुणावर, पंकज भोयर व माजी खासदार रामदास तडस *(छाया : राहुल तेलरांधे)*

**वर्धा, २० सप्टेंबर**

स्वातंत्र्यानंतर सरकारने परंपरागत विश्वकर्मांची उपेक्षा केली. पारंपरिक व्यवसायात एससी, एसटी, ओबीसींचा समावेश होता. त्यांना हेतुपुरस्सर मागे ठेवले. काँग्रेसने शेतकऱ्यांच्या नावावर राजकारण व भ्रष्टाचार केला. हा पक्ष सर्वाधिक भ्रष्ट असून, या पक्षाची सूत्रे तुकडे तुकडे टोळी आणि शहरी नक्षल्यांच्या हातात आहे, असा घणाघाती हल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केला.

पीएम विश्वकर्मा वर्षपूर्ती योजनेचे कीट वाटप, अमरावती येथील पीएम मित्र टेक्सटाईल पार्कचे भूमिपूजन, आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजना आणि पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेच्या शुभारंभप्रसंगी आज स्थानिक स्वावलंबी मैदानावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, लघु, सूक्ष्म व मध्यम मंत्रालयाचे मंत्री जीतनराम मांझी, राज्यमंत्री जयंत चौधरी, उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस व अजित पवार, वर्धेचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, उदय सामंत, माजी खासदार रामदास तडस आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

आज आपण जी काँग्रेस पाहात आहोत, ती महात्मा गांधी ज्या काँग्रेसशी संलग्न होते, ती नक्कीच नाही. आजची काँग्रेस तिरस्काराने भरलेली आहे. या पक्षातून देशभक्तीची भावना संपलेली आहे, असे सांगताना पंतप्रधान म्हणाले, विश्वकर्मा योजना भारताचा रोडमॅप आहे. स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतर परंपरागत कौशल्यांना नवीन ऊर्जा देण्याचा संकल्प आहे. ही योजना सन्मान, सामर्थ्य आणि समृद्धी व परंपरांचे उत्थान करणारी आहे. या योजनेसाठी एका वर्षात १४०० कोटी रुपयांचे कर्ज दिले. अमरावती औद्योगिक केंद्र होईल. या माध्यमातून शेतकऱ्यांना सुगीचे दिवस येतील.

काँग्रेस आणि आघाडी सरकारवर ताशेरे ओढताना पंतप्रधान म्हणाले की, महाराष्ट्र गणपती पूजन करीत असताना कर्नाटकात गणपती पोलिसांच्या कठड्यात होता. गणपतीचा अपमान होत असताना काँग्रेसच्या तोंडाला कुलूप होते. काँग्रेसचे नेते विदेशात जाऊन देशविरोधी वक्तव्ये करतात. यावेळी देशातील विविध राज्यांतून आलेल्या आणि विश्वकर्मा योजनेत सहभागी कारागिरांना धनादेशाचे वितरण करण्यात आले. *(तभा वृत्तसेवा)*

### मराठी आणि महात्मा गांधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीतून केली. वर्धेतील कार्यक्रमाचा योगायोग सांगताना १९३२ मध्ये आजच्याच दिवशी महात्मा गांधी यांनी अस्पृश्यतेविरुद्ध चळवळ सुरू केली होती. याच दिवशी पीएम विश्वकर्मा योजनेची वर्षपूर्ती होत आहे. ही भूमी प्रेरणेची उपलब्धी आणि संकल्पांना ऊर्जा देते. बापूंची प्रेरणा संकल्प सिद्धीपर्यंत नेण्याचे माध्यम असल्याचे मोदी म्हणाले.

# 'मोदी के दस साल बेमिसाल' : मुख्यमंत्री

**वर्धा, २० सप्टेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाचे नेतृत्व करीत आहेत. त्यांच्या खंबीर पाठबळामुळे राज्याची प्रगती वेगाने होत आहे. ते तिसऱ्यांदा पंतप्रधान होऊन १०० दिवस झाल्यानंतरचा हा पीएम विश्वकर्मा वर्षपूर्ती सोहळा होत असून, ही फक्त झांकी आहे. 'मोदी के दस साल बेमिसाल' असे सांगून भारत महासत्ता होऊन १४० कोटी जनतेचे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पीएम विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्ती सोहळ्यात व्यक्त केला.



देशातील गरीब, वंचित तसेच परंपरागत व्यवसाय करणाऱ्या कारागिरांच्या आर्थिक प्रगतीसाठी पीएम विश्वकर्मा ही योजना अत्यंत महत्त्वाची आहे.या योजनेच्या माध्यमातून कारागिरांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याला प्राधान्य राहणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. अमरावती येथे पीएम मित्र पार्क हा देशातील वस्त्रोद्योगाच्या विकासाला चालना देणारा ठरणार आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापसावर प्रक्रिया करून कापड निर्यातीला चालना मिळणार आहे. या पार्कमध्ये १० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून, सुमारे १ लाखांपेक्षा जास्त रोजगार उपलब्ध होणार आहेत. तसेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र व पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप या योजना राज्यातील महिला व इतर घटकांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला पोषक ठरणार आहे. पंतप्रधान मोदी यांनी महिलांना आत्मसन्मान मिळवून दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान दिले. ते कोणीही बदलू शकत नाही. ३७० कलम हटवल्याने काश्मीरचा विकास होत आहे. पंतप्रधानांच्या आशीर्वादाने वकास होत असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# मोदी आधुनिक 'विश्वकर्मा' : फडणवीस

**वर्धा, २० सप्टेंबर**

पीएम विश्वकर्मा योजनेतून राज्यातील २ लाख नागरिकांना मदत झाली असून, ६ लाख ५० हजार कुटुंबांचे चित्र बदलणार आहे. यापूर्वीच्या कोणत्याच सरकारने सर्व घटकांचा विचार केला नाही. विश्वकर्मा योजनेतून पंतप्रधान मोदींनी विचार केला. त्यामुळे मोदी आधुनिक विश्वकर्मा असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक स्वावलंबी मैदानावर पीएम विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्ती सोहळ्यात केले.



देशातील ७ पीएम मित्र पार्कपैकी अमरावती येथे होत असलेल्या पार्कच्या माध्यमातून कापसापासून कापडापर्यंत व कापडापासून फॅशनपर्यंतच्या सर्व प्रकारच्या एकत्रित सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे मोठ्या गुंतवणुकीसह रोजगार उपलब्ध होईल. बलुतेदार समाज समूहाच्या जीवनात परिवर्तन घडविण्याची मोठी संधी या योजनेमधून उपलब्ध झाली असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना लागू करण्यात आली आहे. सोयाबीन, कपाशीला भाव देण्याची मागणी केली असता पंतप्रधान मोदी यांनी ती मान्य करून शेतकऱ्यांना दिलासा दिल्याचे फडणवीस म्हणाले.

#### पांढऱ्या सोन्याला सोन्याचे दिवस : अजित पवार

पीएम मित्र पार्कच्या माध्यमातून विदर्भासह राज्याच्या औद्योगिक क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. या पार्कमुळे पांढऱ्या सोन्याला खऱ्या अर्थाने सोन्याचे दिवस येणार असून, येथे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी आम चे सरकार संपूर्ण योगदान देईल, असा विश्वास त्यांनी उपस्थितांना दिला.

### सर्वोच्च न्यायालयाचे यूट्यूब चॅनेल झाले हॅक

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयाच्या यूट्यूब चॅनेलवर शुक्रवारी दुपारी अचानक सलग जाहिराती चालू झाल्या. काही युजर्सला क्लिक केल्यानंतर थेट दुसऱ्याच यूट्यूब चॅनेलवर जावे लागत असल्याचा अनुभव आला. या पृष्ठभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे यूट्यूब चॅनेल हॅक झाले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विशेषतः एक दिवसापूर्वीच कोलकाता प्रशिक्षणार्थी डॉक्टर बलात्कार व हत्या प्रकरणाची सुनावणी प्रक्षेपित न करण्याची मागणी न्यायालयाने फ टाळली होती. यासह काही महत्त्वाच्या प्रकरणांची सुनावणी सध्या न्यायालयात सुरू आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर अचानक अमेरिकेतील एक कंपनी 'रिपल लॅब'ची जाहिरात सलग चालू झाल्याचे युजर्सला पाहायला मिळाले.

# इंचगाव येथे अज्ञात कारणावरुन एकाचा कुऱ्हाडीने वार करुन खून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० सप्टेंबर,**

मोहोळ तालुक्यातील इंचगाव येथे शुक्रवार दिनांक २० सप्टेंबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास बंदेनवाज दर्गा जवळ दत्तात्रय वामन वराडे (वय-५१) यांचा इंचगाव येथील विजय नागनाथ घुले यांनी अज्ञात कारणावरुन कुऱ्हाडीने घाव घालून खुन केल्याची घटना घडली आहे.

या घटनेची फिर्याद मयताचा भाऊ नागनाथ वामन वराडे यांनी कामती पोलिसांना दिली आहे.संशयित आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,मौजे इंचगाव ता.मोहोळ येथील बंदेनवाज दर्गा परिसरात सिमेंट कोब्यावर दत्तात्रय वामन वराडे (वय-५१,रा.इंचगाव ता.मोहोळ) हा बसलेला असताना त्यास विजय नागनाथ घुले (रा.इंचगाव.ता.मोहोळ) याने अज्ञात कारणावरुन त्याचा जीव घेण्याच्या इराद्याने कुऱ्हाडीने वारकरुन त्यास गंभीर जखमी करुन जीवे ठार मारले आहे.



या घटनेची माहिती मिळताच कामती पोलीस ठाण्याचे सपोनि.ज्ञानेश्वर उदार यांनी घटनास्थळी भेट दिली. या घटनेतील संशयित आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# असुरक्षित अन्नामुळे दरवर्षी ४ लाख २० हजार लोकांचा मृत्यू

#### ६०० दशलक्ष आजारी होतात

**नवी दिल्ली, दि.२० सप्टेंबर,**

असुरक्षित अन्नामुळे ६०० दशलक्ष लोक आजारी होतात आणि दरवर्षी ४ लाख २० हजार लोकांचा मृत्यू होतो, असे जागतिक आरोग्य संघटनेचे (डब्ल्यूएचओ) महासंचालक टेड्रोस अॅधानोम गेब्रेयेसूस यांनी शुक्रवारी म्हटले आहे.

नवी दिल्लीतील दुसऱ्या ग्लोबल फूड रेग्युलेटर्स समिटला पाठविलेल्या संदेशात गेब्रेयसस यांनी असुरक्षित अन्नाचा सामना करण्यासाठी अन्न नियामकांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली.हवामानातील बदल, लोकसंख्या वाढ, नवीन तंत्रज्ञान, जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे आमच्या अन्न प्रणाली वाढत्या आव्हानांना तोंड देत आहेत. असुरक्षित अन्नामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी ७० टक्के मृत्यू पाच वर्षांखालील मुलांमध्ये होतात, असे त्यांनी उघड केले. ३ दशलक्षाहून अधिक लोक पौष्टिक आहार घेऊ शकत नाहीत म्हणून समन्वयाने प्रयत्न करण्याची गरज आहे. या जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी अन्न नियामक समुदायाची भूमिका महत्त्वाची आहे, असे डब्ल्यूएचओ प्रमुख म्हणाले. सर्वांसाठी सुरक्षित अन्न सुनिश्चित करण्यासाठी सहकार्य आवश्यक आहे.

# जालना- बीड रोडवरील भीषण अपघातात ८ ठार, १६ जखमी

**जालना, दि.२० सप्टेंबर,**

जालना : जालना जिल्ह्यातील जालना-वडीगोद्री रोडवरील शहागडजवळ बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये ८ जण जागीच ठार झालेत. मृतांमध्ये बसमधील ६ तर ट्रकमधील दोघांचा समावेश आहे. १६ जण जखमी झालेत. जखमींपैकी ४ जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

दुसऱ्या वाहनाला ओव्हरटेक करण्याचा नादात आयशर ट्रक समोरून येणाऱ्या बसवर आदळला. त्यामुळे हा अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. अपघात इतका भीषण होता की, त्यात दोन्ही वाहनांचा चेंदामेंदा



झाला. अपघातग्रस्त बस अंबाजोगाई आगाराची होती. ती जालन्याच्या दिशेने जात होती. अंबडपासून १० किमीवर ती आयशर ट्रकला धडकली. अपघात एवढा भीषण होता की, दोन्ही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले. या अपघातामुळे जालना-बीड मार्गावर वाहतूक कोंडी झाली आहे. अपघातग्रस्त ट्रकमधून मोसंबी वाहतूक केली जात होती. जखमींना उपचारासाठी लगतच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# शस्त्र खाली ठेवा, अन्यथा सफाया करू

- नक्षल्यांना अमित शाह यांचा निर्वाणीचा इशारा

**नवी दिल्ली, २० सप्टेंबर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नक्षलवाद्यांना कठोर शब्दांत इशारा दिला. हिंसाचार सोडा, शस्त्र खाली ठेवा; अन्यथा तुमचा संपूर्ण सफाया करण्यासाठी मोहीम हाती घेण्यात येईल आणि ही निर्णायक मोहीम राहील, असा निर्वाणीचा इशारा अमित शाह यांनी शुक्रवारी दिला.

छत्तीसगडमधील नक्षली हिंसाचाराचे बळी ठरलेल्या ५५ कुटुंबीयांची अमित शाह यांनी आज आपल्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. नक्षलवाद्यांना शस्त्र खाली ठेवण्यासाठी आम्ही ३१ मार्च २०२६ पर्यंतची मुदत दिली आहे. या कालावधीतच ते श्वास घेऊ शकतात. त्यानंतर त्यांचा पूर्णपणे बीमोड केला जाणार आहे, असे अमित शाह यांनी या कुटुंबांना सांगितले.



नक्षली हिंसाचार आणि त्यांची विचारसरणी देशातून समूळ नष्ट करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ठाम निर्धार आहे, याकडे अमित शाह यांनी लक्ष वेधले. ईशान्येकडील बंडखोरांनी शस्त्रे खाली ठेवली आहेत. मी आता नक्षलवाद्यांनाही विनंती करतो की, त्यांनी शक्य तितक्या लवकर हिंसाचार थांबवावा आणि शस्त्र खाली ठेवून शरण यावे. ही तुमच्यासाठी शेवटची संधी आहे. त्यानंतर आम्ही निर्णायक कारवाई हाती घेणार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. आधीच्या काळात देशाच्या अनेक जिल्ह्यांमध्ये नक्षली हिंसाचार होता. आता तो काही मोजक्याच जिल्ह्यांमध्ये आहे. तिथेही मृत्यूच्या भीतीमुळे बहुतांश नक्षलवादी शरण येत आहेत. छत्तीसगडमध्ये केवळ काही भागांमध्येच त्यांच्या कारवाया आहेत. मार्च २०२६ पर्यंत नक्षल्यांचा संपूर्ण सफाया करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यानंतर नक्षल्यांना या देशात कुठेही जागा मिळणार नाही, असा इशारा अमित शाह यांनी दिला.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### स्वराज्य माहिती अधिकार संघटनेच्या आरास स्पर्धेत नवभारत मंडळ प्रथम

**ब्रह्मांडनायक द्वितीय तर रामगल्ली गणेश मंडळाने पटकावला तृतीय क्रमांक**

**अक्कलकोट, दि. २० सप्टेंबर-**

स्वराज्य पोलीस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना अक्कलकोट शाखेने घेतलेल्या श्री गणेश विसर्जन मिरवणूक आरास स्पर्धेत नवभारत गणेश मंडळ प्रथम, ब्रम्हांडनायक गणेश मंडळ द्वितीय, राम गणेश मंडळाने तृतीय क्रमांक तर हरवाळकर गल्ली गणेश मंडळाने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. अध्यक्षस्थानी स्वराज्य पोलीस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिनेश काटकर होते. स्वागत तालुकाध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांनी केले. नूतन प्रदेशाध्यक्ष धनश्री उत्पात, विश्वस्त उमेश काशीकर, जिल्हाध्यक्ष दिनेश काटकर, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुशील फडके, सोलापूर शहराध्यक्ष विनोद भोसले, व पत्रकार संघटनेचे अध्यक्ष अरविंद पाटील, पोलीस अधिकारी निलेश बागाव यांच्या हस्ते विजेत्या गणेश मंडळांना पारितोषिक देण्यात आले. आनंद खजुरगीकर, गिरीश पट्टद, अतुल जाधव यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रथम पारितोषिक दीपक पोतदार, द्वितीय काशिनाथ पोतदार, तृतीय दयानंद बिडवे तर उत्तेजनार्थ पंकज कोरेकर यांच्या सौजन्याने ठेवण्यात आले होते. याप्रसंगी अंबूबाई वेदपाठक, दीपक पोतदार, गौरीशंकर चनशेट्टी, दयानंद बिडवे, वर्षाताई चव्हाण, काशिनाथ पोतदार, पंकज कोरेकर, बलभीम पवार, अप्पू संगापूरे, अनिल वेदपाठक, अप्पासाहेब धुमाळ, मीराबाई बुद्रुक, अंबुबाई वेदपाठक, सुरेश वेदपाठक उपस्थित होते.



### अक्कलकोटमध्ये पैगंबर जयंती मिरवणूक

**अक्कलकोट, दि. २० सप्टेंबर-**

ईद-ए-मिलाद-उन-नबीनिमित्त माणिक पेठ सिरत कमिटी अक्कलकोट येथून अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी विविध मुस्लिम बांधव, मित्रपरिवाराकडून मिठाई, शरबत, ज्यूस, सुगंधी दूध, व पाणी वाटप करण्यात आले. रॅली माणिक पेठ ईदगाह येथून निघून शहरातील मुख्य मार्गावरून कारंजा चौक, आरिफ शेरीकर, चौक सावरकर, चौक सेंट्रल चौक, फतेसिंग चौक, नाईकवाड गल्ली, रजिअल्लाह टेक, ए-वन चौक, बस स्टँड, हन्नूर चौक, बुधवार पेठ येथून मार्गस्थ झाली. प्रथम पारितोषिक (मक्का मदिना) मौलाली गल्ली मुख्तार शेख यांना जाहीर झाले. आरिफ शेरीकर चौक येथे माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर व एस. एस. सोशल ग्रुप मित्र परिवारातर्फे ईद-ए-मिलादुनबीनिमित्त रिक्षा सजावट केलेल्यांना बक्षिसे देण्यात आली. यंदा




### नेहरू हॉकी स्पर्धेत अक्कलकोटच्या इंडियन मॉडेल स्कूलला विजतेपद

**अक्कलकोट, दि. २० सप्टेंबर-**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर व क्रीडा संचलनालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १७ वर्षाखालील जिल्हास्तरीय नेहरू हॉकी स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूल ने विजेतेपद पटकाविले. १७ वर्षा खालील गटातील सामन्यात विठ्ठलराव शिंदे प्रशाला अंबड या संघाला ३-० ने पराभव करत अंतिम सामन्यात पोहोचले व अंतिम सामन्यात विश्व अर्कॅडमी या संघाला २-० ने पराभव करत इंडियन मॉडेल स्कूलने यश संपादन केले. या यशस्वी खेळाडूंचे मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या संघाला शाळेचे क्रीडा शिक्षक दयानंद दणुरे, सहशिक्षक संतोष सोनकंटले, हॉकी प्रशिक्षक मुन्ना होटगी, हॉकी मार्गदर्शक जरार कुरेशी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष सिद्धाराम म्हेत्रे, संस्थेचे उपाध्यक्ष अमोल जोशी, सायली जोशी, संस्थेचे सचिव शीतलताई म्हेत्रे, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणपती वाघमोडे, मुख्याध्यापिका गौरी दातार यांच्यासह मान्यवरांनी हॉकी स्पर्धेतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



### फकरोद्दीन मुजावर यांची जिल्हा अल्पसंख्याक राष्ट्रवादी काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी निवड

**अक्कलकोट, दि २० सप्टेंबर-**

कुडलचे फकरोद्दीन करीम मुजावर यांची सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. निवडीचे पत्र राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते देण्यात आले. त्यांचे जिल्हाध्यक्ष दीपक साळुंखे-पाटील, राज्यप्रमुख इद्रीसभाई नाईकवाडी, प्रदेश कार्याध्यक्ष वसिमभाई बुऱ्हाण यांनी अभिनंदन केले.

# पंढरीत धनगर आरक्षणासाठी सोमवारी रस्ता रोको

## मंगळवारी निर्णायक मेळावा; राज्यव्यापी बैठकीत निर्धार, समाजाला दिला चतु:सूत्री कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० सप्टेंबर-**

एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी मागील १२ दिवसांपासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाच्या स्थळी राज्यातील प्रमुख नेते, मंडळींची राज्यव्यापी बैठक पार पडली. या बैठकीत समाजाला चतु:सुत्री कार्यक्रम देण्यात आला असून त्यानुसार राज्यभर सरकारविरोधात आंदोलने होणार आहेत. सकल धनगर समाजाच्या वतीने पंढरपूर येथे आयोजित केलेल्या राज्यव्यापी आमरण उपोषणाच्या बाराव्या दिवशी समाजाच्या वतीने पंढरपूर येथे २४ सप्टेंबर रोजी निर्णायक राज्यव्यापी मेळावा घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

धनगर समाजाला एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी पंढरपूर येथील टिळक स्मारक मैदानावर दिनांक ९ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाचा बारावा दिवस असून २२ सप्टेंबर रोजी



आपापल्या भागातील सर्व आमदार, खासदार, माजी आमदारांच्या घरासमोर हलगी नाद आंदोलन करून धनगर समाजाच्या आरक्षण आंदोलनास लेखी पाठिंबा व आंदोलनात सहभागी होण्याचे आश्वासन घेण्याचे ठरले, तर २३ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रभर रस्ता रोको करण्याचा निर्णय यावेळी धनगर समाज बांधवांकडून घेण्यात आला.धनगर समाजाच्या आरक्षणाला पाठिंबा देणारे डिजिटल बॅनर प्रत्येक गावामध्ये उभारण्यात येणार असल्याचे यावेळी ठरले. माजी आ. रामहरी रुपनर यांनी यावेळी मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महाराष्ट्र शासन आरक्षण देण्याबाबत सकारात्मक असल्याचे सांगितले. उद्या मंत्रालयामध्ये शासकीय अधिकाऱ्यांना सोबत आरक्षणा बाबत बैठक होणार असल्याचेही माजी आमदार रामहरी यांनी सांगितले.

**उपोषणकर्ते रुग्णालयातून पुन्हा आंदोलनस्थळी दाखल**

पंढरीत सुरू असलेल्या आमरण उपोषण आंदोलनास गुरुवारी ११ व्या दिवशी हजारो समाज बांधवांनी भेट दिली आणि आंदोलकांना पाठिंबा दिला. दरम्यान, गुरुवारी माऊली हळणवर व गणेश केसकर या आंदोलकांची प्रकृती ढासळल्याने त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर ते पुन्हा उपोषणस्थळी दाखल झाले आहेत. दीपक बोऱ्हाड, यशवंत गायके यांचीही रात्री तब्येत खालावल्यामुळे आंदोलन स्थळीच त्यांच्यावर उपचार सुरू केले आहे. या आंदोलनास भेट देण्यासाठी राज्यभरातील धनगर आणि इतर समाजातील नागरिकांची रीघ लागलेली आहे. दिवसभर सोलापूर जिल्ह्यासह बीड,कोल्हापूर, परभणी, नांदेड, यवतमाळसह इतर भागातील समाज बांधव आंदोलनास भेट देऊन पाठिंबा देत आहेत. मराठवाड्यातील शेकडो समाज बांधवांनी आंदोलकांची भेट घेऊन पाठिंबा व्यक्त केला. तर जिल्ह्यातील शेकडो मोटसायकलस्वार जय मल्हारच्या घोषणा देत ढोल वाजवित आंदोलकांच्या भेटीसाठी आले होते.

**धनगर आरक्षण आंदोलनाला अनेक ग्रामसभांचा पाठिंबा**

पंढरपूरमध्ये सुरू आलेल्या धनगर समाजाच्या अनु. जमाती आरक्षण लढ्यास राज्यभरातील विविध ग्रामपंचायतीचे ठराव देत पाठिंबा असून राज्य शासनाने तातडीने अनु. जमाती आरक्षण अध्यादेश काढून आंदोलन समाप्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी करणारा ठराव ग्रामसभेत करण्यात आले आहेत.

## अक्कलकोटमध्ये सोमवारी रस्ता रोको

**धनगर समाज एसटी आरक्षणासाठी समाज बांधव आक्रमक**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० सप्टेंबर-**

राज्यातील धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करण्यासाठी सोमवारी २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वा. अक्कलकोट येथे अक्कलकोट ते सोलापूर या राज्य महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनद्वारे अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर यांना देण्यात आला आहे.

यावेळी सुनिल बंडगर, दत्तात्रय माडकर, सुभाष पुजारी, स्वामीराव घोडके, अप्पू चेंडके, सूर्यकांत बाचके, भुताळी वागदरी, विष्णू ठेंगले, हणमंत बिराजदार, कृष्णप्पा बिराजदार, संतोष फुलारे आदी उपस्थित होते. तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की ९ सप्टेंबरपासून पंढरपूर येथे पाच धनगर समाज बांधव आमरण उपोषणास बसले आहेत. पण सरकार यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करताना दिसून येत नाही.



धनगर समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करु नये यासाठी २५ आमदार, ४ खासदार मिळून सरकारकडे मागणी केली आहे. अदिवासी समाजाच्या आरक्षणाला कोणत्याही प्रकारचे धक्का न लावता धनगर समाजाला एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी, ही सकल धनगर समाजाची मागणी आहे. सकल धनगर समाजाच्या वतीने सोमवारी २३ सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकदिवसीय रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्या अनुषंगाने अक्कलकोट शहर व तालुका सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने अक्कलकोट ते सोलापूर या राज्यमहामार्गावर एमएसईबी चौकात आंदोलन करण्यात येणार आहे.

## पंढरीतील गणेशोत्सव संगीत महोत्सवाची सांगता

**श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने जपली सांस्कृतिक परंपरा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० सप्टेंबर-**




श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके आणि सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या अथक परिश्रमातून श्री संत तुकाराम भवन येथे श्री गणेशोत्सव संगीत महोत्सवात सहावे पुष्प महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक पं. रघुनंदन पणशीकर यांनी गुंफून गणेशोत्सव संगीत महोत्सवाची सांगता केली.

प्रारंभी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, गायक रघुनंदन पणशीकर, भरत कामत, सोहम खंडाळकर यांच्या हस्ते विठूरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. सुरुवातीला पं. रघुनंदन पणशीकर यांनी वारकरी संप्रदायाचा बीज मंत्र जय जय राम कृष्ण हरी गजराने वातावरण भक्तीमय झाले. गानसरस्वती किशोरीताई आमोणकर यांनी अजरामर केलेल्या काही रचना त्यामध्ये अवघा तो शकुन, जणी जाय पाणीयासी, अहो नारायणा, बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा गाऊन शेवटी अवघा रंग एक झाला भैरवी गाऊन कार्यक्रमाची सांगता केली.

यावेळी त्यांना तितकीच सुंदर आणि साजिशी साथसंगत तबला भरत कामत, हार्मोनियम शुभमम खंडाळकर, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळांची साथ अपर्णाताई पणशीकर आणि माऊली खरात यांनी केली. अविस्मरणीय कार्यक्रम लक्षात राहील असा झाला. सूत्रसंचलन विक्रम बिस्किटे यांनी केले.

## कुरनूर धरणाबरोबरच आठ बंधारे पूर्ण भरा

**माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२० सप्टेंबर-**

सध्या उजनी धरणातून एकरुख योजनेच्या माध्यमातून कुरनूर धरणात पाणी सोडले जात आहे. या पाण्याची गती वाढवून कूरनूर धरण १०० टक्के भरुन धरणाखालील आठ केटीव्हीआर बंधारे भरुन देण्याची मागणी माजी ग्रामविकास राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व अधीक्षक अभियंता भीमा कालवा कार्यालय, सिंचन भवन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

कुरनूर धरणावर अक्कलकोट तालुक्यातील ५१ गावे व ३ नगरपालिकांचा पाणीपुरवठा अवलंबून आहे.अनेक शेतकऱ्यांनी धरणातून पाइपलाईन नेली आहे. पावसाळा अंतिम टप्प्यात आला असला तरीही दमदार पावसाअभावी तालुक्यातील कोणत्याही प्रकल्पात पाणीसाठा झाला नाही. धरणाखालील आठही बंधारे भरुन दिल्यास आगामी काळात काही अंशी पाणीटंचाईचा प्रश्न मिटण्यास मदत होणार आहे. ही बाब म्हेत्रे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितली. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी तात्काळ संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी म्हेत्रे यांना दिले. कुरनूर धरणाखाली अक्कलकोट तालुक्यात सांगवी, बणजगोळ, गौडगाव खु, मिरजगी, रुद्देवाडी, संगोळगी ब, बबलाद, सातनदुधनी हे आठ बंधारे आहेत. यावेळी अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सिध्दार्थ गायकवाड, मोहन देडे, सोमनाथ चिकलंडे, जेटप्पा मुत्तगी आदी उपस्थित होते.



**जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आदेश**

शुक्रवारी म्हेत्रे यांनी दिलेल्या निवेदनाची दखल घेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भीमा कालवा कार्यालयाच्या अधीक्षकांना कुरनूर धरण तात्काळ भरून त्याखालील आठही बंधारे भरून घेण्यासंदर्भात आदेश दिल्याची माहिती माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी दिली.

## श्रीपूर येथील कर्मयोगी कारखान्याचे पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २० सप्टेंबर-**

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यातर्फे यंदाचा पांडुरंग ऊसभूषण पुरस्कार भोसे गटातून पटवर्धन कुरोली येथील सभासद प्रमोद किसन नाईकनवरे यांना जाहीर झाल्याची माहिती चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी दिली.

याबरोबरच सात गटांमधून एक पांडुरंग आदर्श शेतकरी पुरस्कारही देण्यात येणार आहेत. याप्रसंगी उपाध्यक्ष कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, मुख्य शेती अधिकारी संतोष कुमठेकर, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर उपस्थित होते. पुरस्कार वितरण २६ सप्टेंबर रोजी कारखान्याच्या सर्वसाधरण सभेत करण्यात येणार आहेत. पांडुरंग ऊस भूषण पुरस्कार १ लाख १ हजार १११ रुपये, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र, शाल, श्रीफळ असे स्वरुप आहे. याबरोबरच ७ गटांमधून प्रत्येकी १ पांडुरंग आदर्श शेतकरी पुरस्कार प्राप्त सभासद पंढरपूर गटातून खर्डीचे नारायण सुभाष रोंगे, देगांव गट (रा. वाखरी) भीमराव ज्ञानेश्वर बागल, चळे गट (रा. सिध्देवाडी) नागन्नाथ कुंडलिक जाधव, भंडीशेगाव गट (रा. भाळवणी) चंदशेखर गणपत कोळवले, भोसे गट (रा. भोसे) दत्तात्रय बळीराम माळी, जळोली गट (रा. करकंब) धनाजी जयवंत नरसाळे यांना देण्यात येणार असून २५ हजार १११ रुपये, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी यांनी स्पर्धेची सुरुवात लागण हंगाम सुरु झाल्यानंतर जे शेतकरी पूर्वहंगाम व सुरु हंगामामध्ये उसाच्या लागणी करतात, ते या स्पर्धेसाठी पात्र असतात. को-८६०३२, कोसी-६७१, VSI-०८००५, MS- १०००१ या ऊस जातींचीच ऊस लागण करणे आवश्यक आहे. स्पर्धेतील शेतकऱ्यांनी ऊसाची लागण केल्यापासून ऊस तोडणीपर्यंत शंभर गुणांची तपासणी विविध मुद्यांच्या आधारे पुरस्कार देण्यात येतात असे सांगितले.

## उडीद पिकाने शेतकऱ्यांना आणले जेरीस

**मजुरीमध्ये वाढ; मात्र दर उतरल्याने शेतकरी अडचणीत**

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**मंद्रुप, दि. २० सप्टेंबर-**

खरीप हंगामातील नगदी पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उडीद पिकाने यंदा शेतकऱ्यांना जेरीस आणले आहे. मजुरीमध्ये वाढ झाली असताना खरेदीदर मात्र कमी झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. मघा नक्षत्राच्या पावसामुळे काढणीस विलंब झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे.

यावर्षी खरीप हंगामातील रोहिणी, मृग नक्षत्राने दमदार हजेरी लावल्याने तूर, मूग, उडीद, सोयाबीन, मका, बाजरी



आदी पिकांची मोठ्या प्रमाणात पेरणी करण्यात आली. उडीद व मूग पीक कमी कालावधीचे व कमी खर्चाचे असल्याने यावर्षी उडीद पिकाची मोठ्या प्रमाणात पेरणी करण्यात आली. पेरणीनंतर संततधार पावसामुळे आळ्यांचा प्रादुर्भाव वाढल्याने औषधफवारणी खर्चही वाढला आहे. शिवाय ऐन काढणीवेळी मघा नक्षत्राने जोरदार हजेरी लावल्याने उडीद काढणीची लगबग सुरू होती. मात्र पावसाने उसंत न दिल्याने काढणीस विलंब होऊन सर्वत्र एकाचवेळी काढणी सुरू झाली. त्यामुळे महिला व पुरूष मजुरांची तुटवडा जाणवू लागला. पावसामुळे उडीदाचे नुकसान होऊ नये, मजुरी वाढवून काढणी व मळणी करण्यात आली.मजुरांचा तुटवडा जाणवत असल्याने महिलांची मजुरी अडीचशे-तीनशे रूपयांवरून चारशे पन्नास ते पाचशे रूपयांपर्यंत पोहोचला आहे, तर पुरूषांची मजुरी चारशे रूपयांवरून पाचशे ते पाचशे पन्नास रूपयांपर्यंत पोहोचला आहे. शिवाय वेळेवर मजूर मिळत नसल्याने पिकाचे नुकसानही सहन करावे लागत आहे. काढणी व मळणी झाल्यानंतर उडीदाला क्विंटलमागे दोन ते तीन हजार रूपये दर कमी मिळत आहे. त्यामुळे दक्षिणमधील शेतकरी मेटाकुटीस आला आहे.

**उडीदाचे दर नऊ हजारांवरून सहा हजारांवर**

ऑगष्ट महिन्यात उडीदाला प्रती क्विंटल नऊ हजार रूपये दर होता. मात्र आता कमी प्रतीचे उडीद असल्याचे सांगत प्रती क्विंटल सहा हजार रूपये दर देण्यात येत आहे.

**एकराला सहा हजार रूपये मजुरी**

सर्वत्र एकाचवेळी उडीदाची काढणी व मळणी सुरू असल्याने मजुरांचा तुटवडा जाणवत आहे. म्हणून महिला मजुरांकडून एक एकराला उडीद काढण्यासाठी सहा हजार रूपये मजुरी द्यावे लागत आहे. त्यामुळे उडीद पीक काढणी नुकसानकारक ठरत आहे.

**भाकवणूक ठरतेय सत्य**

मंद्रुप, भंडारकवठेसह अनेक ठिकाणी भाकवणुकीत उडीद पिकाच्या उत्पन्नाविषयी धोका दर्शविण्यात आला होता. त्याप्रमाणे सध्या उडीद पीक धरलं तर चावतंय अन् सोडलं तर पळतंय अशी शेतकऱ्यांची अवस्था झाली आहे. सर्वच ठिकाणी उडीदाविषयी सांगण्यात आलेली भाकणूक सत्य ठरत आहे.

**मजुरीमुळे शेतकरी मेटाकुटीला**

उडीद काढण्यासाठी महिला व पुरूषांची मजुरी दोनशे ते तीनशे रूपयांनी वाढली आहे. शिवाय लवकर उडीद काढायचे असल्यास एकरी सहा हजार रूपये मजुरी द्यावे लागत आहे. त्यामुळे शेतकरी मेटाकुटीस आला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचा

# जिल्ह्यातील २७ महाविद्यालयांमध्ये शुभारंभ

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वर्धा येथे स्वावलंबी शाळेच्या प्रांगणात जाहीर सभेद्वारे प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य योजनेच्या लाभार्थ्यांनी मार्गदर्शन व त्यांच्याशी संवाद साधला. तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेचे उद्घाटन व यशस्वी म हिला स्टार्टअपचा सन्मान सोहळा आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंदांचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. यामध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये २७ महाविद्यालयाचा समावेश होता. या योजनअंतर्गत ऑनलाईन उद्घाटन कार्यक्रम ासाठी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच कौशल्य विकास रोजगार व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती होती.






सोलापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाईन / वर्च्युअल उद्घाटन करण्यात आले. त्यामध्ये श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी, स्वामी समर्थ महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल अ‍ॅण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी सोलापूर, सी.बी खेडगीज बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंग कॉमर्स अ‍ॅण्ड राजा जयसिंह आर्टस कॉलेज अक्कलकोट, भाऊराव पाटील कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड सायन्य अनगर, एसएसएसएम डिप्लोमा इन आर्किटेक्चर सोलापूर, एस.एस. गणपतराव महाराज डिग्री कॉलेज ऑफअ‍ॅडनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसेस सोलापूर, स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि पॉलिटेक्निक पंढरपूर, सोजर इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट बार्शी, ग्लोबल व्हिलेज आर्ट्स सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज बोरामणी, श्री साई आयटीआय सासुरे-वैराग ता.बार्शी, लोकमंगल फाउंडेशन सोलापूर, लोकमंगल अ‍ॅग्रीकल्चर बिझनेस मॅनेजमेंट कॉलेज आणि लोकमंगल इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्युट व लोकमंगल कॉलेज ऑफ फार्मसी सोलापूर, सुवर्णलता गांधी महाविद्यालय वैराग, एमआयटी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड रिसर्च बार्शी, लाटे अण्णासाहेब चांदणे कृषी तंत्रनिकेतन एखतपूर, सांगोला, लक्ष्मी-आनंद विद्यामंदिर अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज म ाढा, श्रीनाथ विद्यालय अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज माळशिरस, श्री सिध्देश्वर वुमन्स पॉलिटेक्निक या महाविद्यालयांचा समावेश आहे.

लोकमंगल फाउंडेशन सोलापूर या ठिकाणी उद्घाटन कार्यक्रमासाठी दक्षिण सोलापूरचे विधानसभा सदस्य मा.सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. व लोकमंगल फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी व महाविद्यालयाचे प्राचर्य उपस्थित होते. निवड झालेल्या म हाविद्यालयांचे केंद्र शासनाच्या या वेब पोर्टलवर ट्रेनिंग सेंटरला मान्यता घेण्यात येणार असून प्रत्येक प्रशिक्षण केंद्रात साधारण १५० युवक युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील २७ महाविद्यालयांमध्ये सोलर एलईडी टेक्नेशियन, डोमेस्टीक डाटा इन्ट्री ऑपरेटर, डेअरी फार्मर/ इंटरप्रेशअर, डेअरी वर्कर, गोट/शीप फार्मर, डाटाबेस अ‍ॅडमिनिस्ट्रेटर, वेब डेव्हलपर्स, सोशल मीडिया एक्झीक्युटीव्ह, आकौंट असिस्टंट, सर्वेअर, ड्रगस्टमॅन मॅकॅनिकल, ड्राप्ट्सन, सिविल वर्क, सॉप्टवेअर डेव्हलपर प्रॉडक्ट डेव्हलपमेंट, जनरल ड्युटी असिस्टंट, हेल्थ केअर होस्पीटल फ्रन्ट डेस्क कॉर्डीनेटर अशा प्रकारच्या ५२ कोर्स द्वारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

#### १० विश्वकर्मांना प्रमाणपत्र वाटप

एसएसएसएम डिप्लोमा इन आर्किटेक्चर सोलापूर, या महाविद्यालयाम ध्ये कार्यक्रमासाठी उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सोलापूर विभाग क्र.१ सदाशिव पडदुणे, सहायक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग हणमंत नलावडे, खादी ग्रामोद्योग अधिकारी श्री बनसोडे, सदर संस्थेचे सहसंचालक असिम सिंदगी, प्राचार्य फयाज शेख, सोलापूर महानगरपालिका कौशल्य विकास विभागाचे समन्वयक समिर मुलाणी यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विश्वकर्मा योजनेअंतर्गत १० विश्वकर्मांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.





## गोव्याचे लोकायुक्त जोशी, अ‍ॅड. सोनवणे यांचे उद्या व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

सोलापूर शहर जिल्हा अधिवक्ता परिषदेने आयोजितलेल्या रंगनाथ विष्णू लळीत वकील स्मृती व्याख्यानमालेत रविवारी, २२ सप्टेंबर रोजी गोवा सरकारचे लोकायुक्त न्या. अंबादास जोशी आणि उच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील विलास सोनवणे हे विचार पुष्प गुंफणार आहेत. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात अ‍ॅम्पी थिएटर सायंकाळी पाच वाजता होणार आहे. या व्याख्यानाचा विषय भारताचे सार्वभौमत्व-एक न्यायिक दृष्टिकोन असा आहे. या व्याख्यानाचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन अधिवक्ता परिषदेचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. धनंजय माने आणि शहराध्यक्ष अ‍ॅड. महेश अग्रवाल यांनी केले आहे. या व्याख्यानमालेचे मागील वर्षीचे पुष्प भारताचे निवृत्त सरन्यायाधीश उदय लळीत आणि ज्येष्ठ वकील उदय वारंजीकर यांनी गुंफले होते.



## विविध सामाजिक उपक्रमांनी चन्नवीर चिट्टे यांचा वाढदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

'नात आपुलकीच, सामाजिक बांधिलकीचं' हे ब्रीद घेवून सामाजिक क्षेत्रात कार्यरत चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराच्या वतीने भाजपा नेते चन्नवीर चिट्टे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक उपक्रम राबविले गेले. हगलूर येथील संजीवनी आश्रम ातील विद्यार्थ्यांना भोजनाची व्यवस्था करण्यात आली. आश्रम ातील सर्व विद्यार्थांना रूचकर जेवणाची मेजवानी देण्यात आली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्याचे वाटप करण्यात आले. तसेच श्री सिद्धेश्वर मंदिर परिसर, पासपोर्ट ऑफिस परिसर, जिल्हा परिषदेतील दर्ग्याजवळ व दत्त चौकातील दत्त मंदिर परिसरातील असहाय्य व निराधार लोकांना अन्नदान करण्यात आले. याशिवाय भवानी पेठेतील हनुमान नगर येथील विकास विद्यालयातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्याचे वाटप करण्यात आले.




## आपले कार्य उपकार नाही तर साधना आहे : ओझा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

जनजाती समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी कार्यरत असलेल्या अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाच्यावतीने आयोजित तीन दिवसीय कार्यकर्ता संमेलनाचे उद्घाटन हरियाणातील सेवा साधना व ग्राम विकास केंद्र, समालखा येथे गुजरातचे प्रसिद्ध भागवत कथाकार पूज्य रमेशभाई ओझा यांच्या हस्ते झाले.

प्रारंभी सिक्कीमच्या भगिनींनी बुद्ध प्रार्थना सादर केली. मंचावर उपस्थित असलेले रा. स्व. संघाचे सह-सरकार्यवाह रामदत्तजी म्हणाले, की वनवासी कल्याण आश्रमाला ३ वर्षानंतर ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. ज्या जनजातीम ध्येही आपले काम नाही त्यांच्या पर्यंत पोचण्याचा संकल्प घेऊन आपण सर्व कार्यकर्त्यांनी येथून जायला हवे. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय जनजाती आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य, कल्याण आश्रम ाचे अध्यक्ष सत्येंद्र सिंह, उपाध्यक्ष एच.के.नागू आणि तेची गुबिन, महामंत्री योगेश बापट, संघटन मंत्री अतुल जोग, मध्य प्रदेश जनजातीय सल्लागार समितीच्या सदस्या उर्मिला भारती आणि हरियाणा युनिटचे अध्यक्ष राम बाबू उपस्थित होते. संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी अंदमान आणि निकोबार द्वीपसमूह, लडाख, जम्मू कश्मीर, पूर्वांचल आणि दक्षिण भारतातील राज्यांसहित देशातील सर्व राज्यांमधील जनजातीय प्रतिनिधी आणि कार्यकर्ता उपस्थित होते. प्रांताचे कार्यकर्ते आपापल्या कार्यक्रमाचे वृत्तकथन करतील तसेच अधिकाऱ्यांचे म ार्गदर्शन प्राप्त करतील. अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम वेगवेगळ्या प्रांतांमध्ये आपल्या संबंधित संस्थांच्या माध्यमातून जनजाती समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आरोग्य ग्राम विकास व स्वावलंबन इत्यादीशी संबंधित २२,१५२ प्रकल्पांचे संचालन देशातील १७, ३९४ ठिकाणी करत आहे. वनवासी कल्याण आश्रमाचे अखिल भारतीय कार्यकर्ता संमेलन दर तीन वर्षांनी आयोजित करण्यात येते. रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांच्या हस्ते २१ सप्टेंबर सायंकाळी साडेसहा वाजता उद्घाटन झाल्यानंतर देशातील ८० वेगवेगळ्या जनजाती प्रतिनिधी आपापल्या रीती रिवाज आणि परंपरेनुसार आपल्या जनजातीय पूजा पद्धतीचे सादरीकरण करून एकतेचा संदेश देतील तसेच जनजाती भैय्या बहन सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतील. संमेलन स्थळी वनवासी कल्याण आश्रम ाची प्रगती, कामगिरी आणि मुख्य कार्यक्रमांचे चित्र प्रदर्शन लावण्यात आले आहे.



# सीएटचा लक्षवेधी विक्रमी टप्पा

**सोलापूर,दि. २० सप्टेंबर-**

सीएट या भारतातील आघाडीच्या टायर उत्पादक कंपनीने आज विक्रमी टप्पा गाठल्याचे जाहीर केले असून,कंपनीच्या नागपूर येथील प्लँटमधले १०० दशलक्षाव्या टायरचे उत्पादन करण्यात आले.ही कामगिरी सिएटची भारत,तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर दुचाकी टायर्सना असलेली वाढती मागणी पूर्ण करण्यासाठीची बांधिलकी जपणारी आहे. सीएटच्या उत्पादन विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष जयाशंकर कुरुप्पल या विक्रमी टप्प्याविषयी म्हणाले,आमच्या प्लँटने उत्पादनक्षेत्रात मापदंड प्रस्थापित करण्याबरोबरच कामगारांना सक्षम केले आहे.

# समूहगान स्पर्धेत मेहता प्रशालेस विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. २० सप्टेंबर-**



भारत विकास परिषदेच्या राष्ट्रीय समूह गान स्पर्धेत वि. मो. मेहता प्रशालेने विजेतेपद पटकाविले. शिवस्मारक येथे ज्येष्ठ साहित्यिक डॉ माधवी रायते यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून स्पर्धेस प्रारंभ झाला. या प्रसंगी त्यांचा सत्कार संस्थेचे सचिव गौरी आमडेकर यांनी डॉ माधवी रायते यांचा सत्कार केला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष महादेव न्हावकर, वर्धराज मिरजी, महेश साठे, महेश देशपांडे, संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख रविन्द्र नाशिककर आदी उपस्थित होते. वि. मो. मेहता प्रशाला, हरिभाई देवकरण प्रशाला, संगमेश्वर पब्लीक स्कूल, सेवासदन प्रशाला, जैन गुरुकूल, एम आय टी प्रशाला, एस आर चंडक प्रशाला आदी प्रशालेने यात भाग घेतला. रोख पारितोषक पदृनाभ काटीकर यांनी दिले. पारितोषक वितरण समारंभास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक सुनील इंगळे, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथजी बंकापूर यांचे उपस्थितीत पार पडला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारत विकास परिषदेचे महेश देशपांडे, अविनाश केतकर, प्राध्यापक महेश साठे आदींचे सहकार्य लाभले. संस्थेचे सदस्य वंदन प्रभू यांनी आभार मानले.

# अंशकालीन स्त्री परिचारकांच्या मागण्यांसाठी लाँग मार्च काढणार

**सोलापूर :** अंशकालीन, अर्धवेळ स्त्री परिचारकांच्या विविध मागण्यांसाठी नाशिक ते मुंबई लाँग मार्च काढण्यात येणार असल्याची माहिती आई कामगार संघटनेचे प्रदेश सचिव विनोद भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली. महाराष्ट्रातील अर्धवेळ स्त्री परिचारिका महिलांना वेतन वाढ करण्यात यावी. कायमस्वरूपी पूर्णवेळ परिचारिका म्हणून घेण्यात यावे. त्यांना पेन्शन सुविधा द्यावी. शासनाकडून मिळणाऱ्या सर्व सोयीसुविधा देण्यात याव्यात. वेतन वेळेत अदा करावे. कोरोना काळात मृत्यू झालेल्या अंशकालीन स्त्री परिचारकांच्या कुटुंबीयास अर्थसाह्य देण्यात यावे यासह विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी नाशिक ते मुंबई लाँग मार्च काढण्यात येणार असल्याचे भोसले यांनी सांगितले.

## निधन वृत्त...

### चंद्रकांत शिंगाडे



**सोलापूर दि.२० सप्टेंबर -**

डोणगाव रोड सलगरवस्ती येथील चंद्रकांत बाबूराव शिंगाडे (वय ७४) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, भाऊ, मुलगा, मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार रविकांत शिंगाडे यांचे ते वडील होत.

### कांताबाई मोहिते



**सोलापूर दि.२० सप्टेंबर -**

डोणगाव रोड सलगरवस्ती येथील कांताबाई सौदागर मोहिते (वय ९०) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात सून, २ नातू व पणतू असा परिवार आहे.

### अंबव्वा कलशेट्टी



**सोलापूर दि.२० सप्टेंबर -**

कोतम चौकातील कलशेट्टी समाजातील अंबव्वा विश्वनाथ कलशेट्टी (वय ९०) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या शनिवारी (दिनांक २१)क्षत्रिय गल्ली, कुंभारवेस येथून सकाळी अकरा वाजता निघणार आहे. अंतिम संस्कार तुळजापूर वेस येथील रुद्र भूमीत करण्यात येईल. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन सुना, तीन मुली व नातवंडांचा परिवार आहे. अश्विनी हॉस्पिटल पॅथॉलॉजी लॅबमधील भाग्यश्री कलशेट्टी यांच्या त्या सासू होत.

---

## DECLARATION

I HERBY DECLARE THAT MY NAME ON AADHAR CARD & PAN CARD IS **RIMPLE KHUSHAL DEDHIA** & ON PASSPORT IS **RIMPLE KUSHAL DEDHIA.** BOTH PERSON ARE ONE & THE SAME RESIDING AT MANDAR APPARTMENT, 101 RAILWAY LINES, SOLAPUR-413001. KINDLY NOTE THE SAME. (AFFIDAVIT SERIAL NUMBER NO.13626 DATED 19/09/2024)

---

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**ई-निविदा क्र : १०८७७५५-१ सन २०२४-२०२५**

**अहमदनगर महानगरपालिकेस** महानगरपालिकेच्या हद्दीत आवश्यकतेनुसार खाजगी टँकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे (जी.पी.एस. यंत्रणेसह) सन २०२४-२०२५ करिता वार्षिक दर मागविणे या कामाची अहमदनगर महानगरपालिकेच्या http:// mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**स्वाक्षरी/- आयुक्त**
**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

---

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३०१/२०२४**

१) **चंद्रकला श्रीरंग मसाळ,** रा. धामणगाव (दु), ता. बार्शी, जि. सोलापूर (असल्यास, तर्फे वकील जी.आर. उंबरगे) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

२) **जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,** ग्रामपंचायत, धामणगाव (दु), ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. धामणगाव (दु), ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे धामणगाव (दु), ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ जून १९५८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जून १९५८ रोजी मौजे धामणगाव (दु), ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

सही/-
(गोल शिक्का) **कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

---

## फॉर्म क्र. INC-25A

सार्वजनिक (पब्लिक) कंपनी चे खाजगी (प्रायवेट) कंपनी मध्ये रुपांतरण करण्यासाठी वृत्तपत्रात द्यावी लागणारी जाहीर नोटिस माननीय प्रादेशिक निर्देशक कॉर्पोरेट कार्य मंत्रालय यांचे समक्ष पश्चिम क्षेत्र मुंबई

कंपनी कायदा २०१३ व कंपनी (नोंदणीकरण) नियम २०१४, ४१ अन्वये आणि **मेसर्स चित्रकूट इंडस्ट्रीज लिमिटेड** (CIN: U51909PN2001PLC016495) यांचे नोंदणीकृत कार्यालय १४/५ सिव्हिल लाइन्स, गांधी नगर, सोलापूर-४१३००३ महाराष्ट्र येथे आहे. (अर्जदार)

या नोटीसीदवारे सर्व जनतेला कळविण्यात येत आहे की **चित्रकूट इंडस्ट्रीज लिमिटेड** या कंपनीने दिनांक **३१ ऑगस्ट २०२४** रोजी विशेष सर्वसाधारण सभेत **सार्वजनिक (पब्लिक) कंपनी चे खाजगी (प्रायवेट)** कंपनीत रूपांतरण करण्यासाठीचा विशेष ठराव मंजूर करण्यात आला आहे. सदर ठरावान्वये कंपनी माननीय प्रादेशिक निर्देशक कॉर्पोरेट कार्य मंत्रालय पश्चिम क्षेत्र मुंबई यांचेकडे वर नमूद केल्याप्रमाणे कंपनीचे रूपांतरण करण्यासाठी अर्ज करत आहे. कंपनीचे सदर रूपांतरण करण्यास कोणाची हरकत असेल अथवा, व्यक्ति अथवा संस्थेस हानी पोहोचत असल्यास सदर व्यक्ति अथवा संस्था यांनी ही नोटिस प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसाच्या आत आपली हरकत, व सोबत हरकत सत्यतेसाठी शपथपत्र (affidevitt) **माननीय प्रादेशिक निर्देशक कॉर्पोरेट कार्य मंत्रालय पश्चिम क्षेत्र मुंबई यांचे कार्यालय – एवरेस्ट, ५ व मजला १०० मरीन ड्राइव, मुंबई-४००००२** यांचेकडे नोंदवावी. सदर हरकत व सत्यतेसाठी शपथपत्र याची प्रत कंपनीच्या खाली दिलेल्या नोंदणीकृत कार्यालयात सुद्धा सादर करावी.

Jhaveri

चित्रकूट इंडस्ट्रीज लिमिटेड यांचे करिता
संचालक :
मनोज कांतीलाल शाह
DIN: ०१५९०७२९

दिनांक : १९ सप्टेंबर २०२४

कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय १४/५ सिव्हिल लाइन्स गांधीनगर, सोलापूर-४१३००३ (महाराष्ट्र)

---

## मैंदर्गी नगरपरिषद, मैंदर्गी, जिल्हा सोलापूर

**MAINDARGI MUNICIPAL COUNCIL, DIST : SOLAPUR**

Web:- www.maindargimc.org
maindargimuncipalcouncil@gmail.com
ऑफिस 02181 – 255028, 255128

**जा.क्र.एम/कावि/२/१०६१/२४** **दिनांक २०/०९/२०२४**

मैंदर्गी नगरपरिषद, मैंदर्गी शहर पथविक्रेता समितीवर इतर मंडळांमधून सदस्य निवडणेकरीता अर्ज सादर करणेबाबत.

**जाहीर सुचना**

मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (अधिनियम २०१६ मधील नियम ११ (३) ख इतर मंडळामधील अशासकीय संघटना आणि समुदाय आधारित संघटना ०२ सदस्य, निवासी कल्याण संघ ०२ सदस्य, व्यापारी संघाचे प्रतिनिधी ०१, पणन संघाचे प्रतिनिधी ०१, अग्रणी बँकेचे प्रतिनिधी ०१ असे ०७ सदस्य मैंदर्गी नगर परिषद मैंदर्गी शहर पथविक्रेता समितीवर निवडणेचे आहेत.

शहर पथविक्रेता समितीवर सदस्य नामनिर्देशनाकरिता सदस्यासाठी किमान अर्हता खालीलप्रमाणे आहे.

१. संघटनेची व संघाची सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२. संघटना किंवा संघ मागील ३ वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरिक्षण अहवाल सादर करावा.
३. संघटनेस किवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
४. संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिध्ददोषी असणार नाहीत.
५. संघटना किवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणकडे नोंदणी केल्याच्या त्याच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.

सदर अर्ज दि. २७/०९/२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत मैंदर्गी नगर परिषद कार्यालयात सादर करावेत. एका पेक्षा जास्त प्रवर्गासाठी अर्ज प्राप्त झाल्यास अर्जाची निवड करणे अथवा अर्जाबाबत कोणतेही कारण न देता अर्ज बाद करणेचा अधिकार मुख्याधिकारी तथा अध्यक्ष मैंदर्गी शहर पथविक्रेता समिती, मैंदर्गी नगर परिषद यांचेकडे राहील.

**दिनांक :- २०/०९/२०२४**
**स्थळ : - मैंदर्गी**

**सही/-**
**मुख्याधिकारी तथा अध्यक्ष**
**शहर पथविक्रेता समिती,**
**मैंदर्गी नगर परिषद**

---

Kai. Sushilatai Gaikwad Bahuuddeshiya Sanstha's

## Bharat Ratna Indira Gandhi College of Engineering

**Solapur Pune National Highway,**
**Gat No. 58/3, Kegaon, Solapur-413 255**
**E-mail-ksgbs.bigcoe@gmail.com website www.bigce.in**
**(Approved by AICTE New Delhi, Govt. of Maharashtra and affiliated to BATU Lonere)**

**WALK-IN-INTERVIEW**

| Designation of the position | Total Vacancies | Category-wise Vacancies |
|---|---|---|
| PRINCIPAL (Ad-hoc basis) | 01 | Open |

**Condition**

1. Educational Qualifications, Experience applicable for the post is as per the norms specified by AICTE Govt of Maharashtra & Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere, Dist - Raigad & as Modified from time to time.
2. Salary as per AICTE/DBATU norms.
3. No TA, DA will be paid for attending the interview
4. Duration of appointment will be till the appointment of regular Principal of 11 months whichever is earlier.
5. The candidates should attend interview on 27/09/2024 at 10.00 AM at office of Bharat-Ratna Indira Gandhi College of Engineering, Kegaon, Solapur

**Place - Solapur**
**Date 20/09/2024**

**sd/-**
**R.D. Gaikwad**
**President**

---

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २६५/२०२४**

१) **महादेव मारुती अटक,** रा. ४२२ ब गाडेगाव रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर (असल्यास, तर्फे वकील अनुपमा द. कुलकर्णी) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

२) **जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. ४२२ ब गाडेगाव रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ जानेवारी १९४६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जानेवारी १९४६ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

सही/-
(गोल शिक्का) **कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

---

## औसा नगरपरिषद कार्यालय, औसा जि. लातूर

जा.क्र.२०२४/नपओ/बांधकाम/कावि-२०४० दिनांक. २०/०९/२०२४

**जाहीर ई-निविदा सूचना**

**ई-निविदा सूचना क्र. ०८,०९ व १० साल-सन २०२४-२०२५**

मुख्याधिकारी, नगरपरिषद, औसा यांच्या वतीने नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण ठोक तरतुद योजना (विशेष वैशिष्ट्यपुर्ण) अंतर्गत औसा शहरातील विविध विकास कामासाठी ऑनलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेची सविस्तर माहिती दिनांक, २१/०९/२०२४ पासून www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

निविदा प्रकिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा व वेळ www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

**सही/-**
**(मंगेश शिंदे)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, औसा जि. सोलापूर**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ- शास्त्रीनगर नगर अ झोपडपट्टी या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं.८८३अ ही मिळकत घरजागा आमचे अशिल पुंडलिक दत्तू बोगा यांची पत्नी कै. कांचना पुंडलिक बोगा यांचे नांवावर असून सदर ठिकाणी त्यांचे मालकीचे दोन खोल्या आहेत. सदरच्या खोल्या वीट, मातीने बांधलेले वरती पन्हाळी पत्रे, वासे घातलेले खोल्या आहेत.

आमचे अशिलाचे पत्नी कै. कांचना पुंडलिक बोगा यांचे दि.२१/०३/२०१३ रोजी सोलापूर येथे राहते घरी मृत्यु झालेला आहे. त्यांचे मृत्युपश्चात आमचे अशिल पुंडलिक दत्तू बोगा हे त्यांचे पती व कुटुंबकर्ता या नात्याने मुख्य वारस आहे.

सदर ठिकाणी आमचे अशिल हे त्यांचे हयातीपासूनच सदरहू घरजागेवर आजपावेतो कुटुंबासह राहणेस आहेत. सदरहू घरजागेवरील आमचे अशिलांचे मयत पत्नी कै. कांचना पुंडलिक बोगा यांचे नांव कमी करुन पुंडलिक दत्तू बोगा यांचे नांवाची सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २०/०९/२०२४

**सही/-**
**ॲड. ढेकणे एस.एम.**
**रा. १२६-अ वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

---

## जाहिर समन्स

मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप, असोसिएशन लि. सोलापूर
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर-४१३००२

**कृषीसेवा अर्बन को-ऑप बँक लि. कोळे ता. सांगोला जि. सोलापूर** - **अर्जदार**

**विरुध्द**

**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २४१/२०२४-२५ | २६२०७३/- | १ | **आबासो बाबुराव शेळके** मु. पो. गायगव्हाण, ता. सांगोला, जि. सोलापूर |
| | | | २ | **बाळासो लक्ष्मण शिनगारे** मु.पो. मांजरी, सांगोला ता. सांगोला, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहिर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि. ८/१०/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगद तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. २०/०९/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**सही/-**
**शिक्का**
**उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप, असोसिएशन लि., सोलापूर**

---

## DECLARATION

I HERBY DECLARE THAT MY NAME ON AADHAR CARD & PAN CARD IS **KHUSHAL RAMESH DEDHIA** & ON PASSPORT IS **KHUSHAL RAMESHCHANDRA DEDHIA.** BOTH PERSON ARE ONE & THE SAME RESIDING AT MANDAR APPARTMENT, 101 RAILWAY LINES, SOLAPUR-413001. KINDLY NOTE THE SAME. (AFFIDAVIT SERIAL NUMBER NO.13625 DATED 19/09/2024)

---

## शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज ता. माळशिरस, जि. सोलापूर

**फोन नं. (०२१८५) २२६४३३**

संस्थेच्या अनुदानित माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये खालील शैक्षणिक पात्रतेच्या कनिष्ठ लिपिक व प्रयोगशाळा सहाय्यकांच्या नेमणूका करावयाच्या आहेत.

| विभाग | रिक्त पद | संख्या | | शैक्षणिक पात्रता | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्ण वेळ | एकूण | | |
| माध्यमिक विभाग | कनिष्ठ लिपिक | १६ | १६ | कोणत्याही शाखेचा पदवीधर | एससी२, व्हीजेएनटी २, ओबीसी३, ईडब्ल्यूएस २, ईसीबीसी ३, ओपन १३ |
| माध्यमिमक व उच्च माध्यमिक | प्रयोगशाळा सहाय्यक | ९ | ९ | एचएससी/ कोणत्याही शाखेचा पदवीधर | |

वेतन व सेवानियम महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याच्या नियमानुसार. तसेच कनिष्ठ लिपिक पदासाठी संगणक व टंकलेखन कोर्स आवश्यक तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी त्यांचे पूर्ण नांव, शैक्षणिक पात्रता. विषय, श्रेणी, जात, जात पडताळणी, अनुभव, सध्याचा व कायमचा पत्ता, फोन/ मोबाईल नंबर इत्यादी तपशिलाचे स्वतःचे हस्ताक्षरातील अर्ज व अर्जासोबत शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव इत्यादी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतीसह ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसात मा. अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज मु. पो. सदुभाऊ चौक, अकलूज ता. माळशिरस, जि. सोलापूर पिन ४१३१०१ या पत्त्यावर किंवा समक्ष संस्था कार्यालयाकडे पाठवावेत.

**संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील**
**अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज**

---

## जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. ७०/२०२४ नि.नं. ६
पुढील नेमलेली तारीख २५/१०/२०२४

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्हीजन यांचे कोर्टात**
**(मे. एच. यु. यु. पाटील कोर्ट)**

१) **श्री. लक्ष्मण सिताराम अडसुळ,** वय ६१ वर्षे, धंदा- शेती, रा. शेळगांव (आर), ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **श्री. अशोक सिताराम अडसुळ,** वय ५३ वर्षे, धंदा व रा. सदर
३) **महानंदा बाळासाहेब नवले,** वय ५५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. तडवळे, ता. बार्शी, जि. सोलापूर
४) **सुनिता अभिमन्यू काळे,** वय ४७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सुरतगांव, ता. जि. धाराशिव — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सामनेवाले**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडील कै. लक्ष्मण सिताराम अडसुळ हे ता. २१/०३/२०२१ रोजी शेळगांव (आर), ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. अर्जदारांचे वडील लक्ष्मण सिताराम अडसुळ यांचे नावे बँक ऑफ इंडिया शाखा- शेळगांव (आर), ता. बार्शी, जि. सोलापूर या बँकेमध्ये बचत खात्यामध्ये रक्कम रुपये १,२९,५४८.५० (अक्षरी एक लाख एकोणतीस हजार पाचशे आठ्ठेचाळीस रुपये पन्नास पैसे) एवढी रक्कम जमा असून सदर रक्कम मिळणेकरिता अर्जदार हेच मयत लक्ष्मण सिताराम अडसुळ यांचे कायदेशटीर वारस असल्याने सदर रक्कम वारस या नात्याने त्यांना मिळणेसाठी अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार यांचे शिवाय मयत लक्ष्मण सिताराम अडसुळ यांना इतर कोणी वारस असल्यास अगर कोणाचा कसल्याही प्रकारे वार हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटी प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दिनांक २५/१०/२०२४ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा. हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी. मुदतीत कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना त्यांचे मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. तारीख : १२/०९/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहा. अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

---

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

प्रस्तुत जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस विशेषतः शहर बार्शी नगरपरिषद हद्दीमधील व तालुका बार्शी व जिल्हा सोलापूर येथील व आसपासचे सलग्न तालुक्यातील व परिसरातील तसेच लोकांना कळविण्यात येते की,

शहर बार्शी नगरपरिषद हद्दीमधील जागा याचा गट नन. ८५२/२/क यापैकी क्षेत्र ०.०२.७५ चौ.मी. व खरेदीखतानुसार २७८.६९ चौ.मी. असे क्षेत्र आहे. नमूद क्षेत्र आजरोजी वसुंधरा भिमराव तेलंग यांचे नावे ७/१२ उताऱ्याला असून नमूद क्षेत्र प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस मालकी हक्कात व अधिकारात आहे. नमूद क्षेत्र हे वसुंधरा भिमराव तेलंग यांनी रजि. खरेदी दस्ताने विकत घेतलेले आहे. गट नं. ८५२/२/क यापैकी क्षेत्र ०.०२.७५ चौ.मी. व खरेदीखतानुसार २७८.६९ चौ.मी. असे क्षेत्र यांसी चतु:सिमा व मोजमापे पुढीलप्रमाणे- पूर्व बाजू- फूट ५० याचे मी. १५.२४ व दक्षिण बाजू- फूट ६० याचे मी. १८.२९, पश्चिमेस- बाजू फूट ५० याचे मी. १५.२४, उत्तर बाजू- ६० फूट याची मी. १८.२९ यांसी चतु:सिमा- पूर्वेस- जाणे येणेसाठी असलेला २० फूट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस- गट नं. ८५२/२/क मधील प्लॉट नं. १०, पश्चिमेस- प्लॉट नं. ८ व उत्तरेस- गट नं. ८५२/२/क पैकी प्लॉट नं. ९. येणेप्रमाणे प्लॉट आतील तदंगभूत वस्तू व मालकी हक्कासह व अधिकारासह.

वर नमूद प्लॉट हा सौ. वसुंधरा भिमराव तेलंग यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्री करणेचे ठरविलेले आहे, त्याची माहिती आमचे अशिलास झाली. त्याप्रमाणे सदरहू मिळकतीबाबत खरेदी विक्री संदर्भात बोलणी झालेली असून सदर प्लॉट आमचे अशिलास मालकी हक्काने कायम खुषखरेदी देण्याचे ठरले. त्याप्रमाणे आमचे अशिलाकडून सौ. वसुंधरा भिमराव तेलंग यांनी साक्षीदारासमक्ष रोख स्वरुपात रक्कमेचा स्वीकार केलेला आहे व वर नमूद मिळकत ही निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची अशी असल्याची ग्वाही दिलेली आहे.

तरीही वर नमूद मिळकतीबाबत कोसणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्यूपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्जबोजा, जप्ती, करार, नोटरी, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमूद मिळकत ही निजोखमी व बिनबोजाची, त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपूर्वक, स्वच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मागाहून कोणतीही तक्रार आमचे मालकी हक्कावर, कब्जे वहिवाटीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे. तारीख : १९/०९/२०२४

सही/-
**ॲड. एस.आय. भोरी,**
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

---

## लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ

(मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज् ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.क्र. - --- दि. १८/०९/२०२४

रेणुका भवन, २ मजला, सर्वे नं. ३५/२अ-२ब, पुष्पक हॉटेलजवळ,
पाईप लाईन रोड, सावेडी, अ.नगर,
अहमदनगर - ४१४ ००१

**जाहीर नोटीस**

श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.,
अहमदनगर ----- अर्जदार

**विरुद्ध**

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| **३५०७/२०२४** | **कर्जदार** | **श्री. नवनाथ कालिदास बल्लाळ,** रा. कालिदास मुरलीधर बल्लाळ, देवगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | **जामीनदार** | **श्री. सुनील दत्तू अवघडे** रा. दत्तू अवघडे, ५७/२, लातूर रोड, नवीन रेल्वे स्टेशनजवळ, विठ्ठलनगर, बार्शी, ता.बार्शी, जि. सोलापूर |
| | **जामीनदार** | **श्री. सुधाकर बब्रुवान काळे,** रा. बावी, ता. बार्शी, जि. सोलापूर |

सदर नोटीसद्वारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक २८/०९/२०२४ रोजी ठीक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले असे.

सही/-
(गोल शिक्का) **ॲड. तनपुरे गोविंद दशरथ,**
**लवाद अधिकारी**

---

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः बार्शी व ता. बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन- डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर नगरपरिषद हद्दीतील बिनशेती प्लॉट याचा तपशील- गट नं. ७३१/१ यापैकी प्लॉट नं. १८ आहे. याचे एकूण क्षेत्रफळ ७४.७० चौ.मी. आहे याचे चौ. फूट ८०३.७७ आहे. याचा आकार रु. ४९.०० पैसे आहे, याची रुंदी पूर्व-पश्चिम- ४.९० मीटर आणि लांबी दक्षिण-उत्तर १५.२५ मीटर यासी चतु:सिमा- पूर्वेस- प्लॉट नं. १७, दक्षिणेस- ९.०० मी. रुंदीचा सदर जमिनीतील प्लॉटमध्ये जाणे-येणेसाठी सोडलेला पूर्व-पश्चिम चालीचा रस्ता, पश्चिमेस- प्लॉट नं. १९, उत्तरेस- गट नं. ७३० ची जमीन आहे. याचे पाणी व वागणूक दक्षिण बाजूचे रस्त्याने जाते व आहे असा प्लॉट.

सदर प्लॉट हा सौ. शांता अशोक भोसकर यांचे खरेदी मालकीचा असून प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे व सदर प्लॉटच्या ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरचा प्लॉट ते विक्री करु इच्छितात. प्लॉट विक्री निघालेबाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने सौ. शांता अशोक भोसकर यांनी सदरचा प्लॉट विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशिलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे व खरेदीखत करुन देण्याचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरविला आहे.

सदर मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा अशा प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशिल कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरुन मिळकत बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरुन सदर मिळकत खरेदी करतील. खरेदीनंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशिलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये याकरिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दिनांक : २०/०९/२०२४

सही/-
**ॲड. कुलदीप संजय क्षीरसागर,**
ऑफिस पत्ता : ३९४५, भवानी पेठ, सोलापूर रोड, बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सोलापूरची जलतरणपटू किर्तीने रचला इतिहास

## भारत-श्रीलंका ३२ किमी अंतर समुद्रात १० तास २५ मिनिटे न थांबता पोहून पार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

येथील १८ वर्षीय किर्ती नंदकिशोर भराडिया हिने श्रीलंका ते भारत हे ३२ किलोमिटरचे अंतर समुद्रात न थांबता १० तास २५ मिनिट पोहून पूर्ण केले. या ऐतिहासिक क्षणाची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड कम्यूनिटीमध्ये झाली आहे. त्यांचे उच्च अधिकाऱ्यांनी कीर्तीला या विश्व विक्रमाचे तात्पुरते प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. २० सप्टेंबरछए पहाटे १.४५ वाजता श्रीलंकेतील तलाईमनार येथे समुद्रात झेप घेतली. खारे पाणी,लहान मोठे जलचर जीव,उलट्या,लाटांचा उलटा प्रवाह,मोठ मोठ्या लाटा यांचा सामना करत २० सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजून १० मिनिटाला पोहोचली भारतातील धनुष्यकोडी येथे... वर्ल्ड रेकॉर्ड कम्युनिटीचे अधिकारी होते उपस्थित आणि त्यांनी किर्तीला प्रोव्हीजनल प्रमाणपत्र देऊन सन्मान केला. हा विक्रम साध्य करण्यासाठी कीर्तीला रुपाली रेपाळे, अनिरुद्ध महाडिक, श्रीकांत शेटे, स्कूल ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी पुणे, सेहतच्या संचालिका राधिका मालू, सोलापूर महानगर पालिका, इलिजियम क्लब, डॉ .सोनाली घोंगडे, नीरज काटकुर, भराडिया मित्र परिवार यांचे सहकार्य लाभले.

**कसा साधला विक्रम...**

१९ सप्टेंबर रोजी कीर्तीची तंदुरुस्ती तपासण्यात आली. दुपारी १ वाजता रामेश्वर येथून किर्ती बोटीने श्रीलंकेसाठी रवाना झाली. किर्तीसोबत तिच्या प्रशिक्षिका रुपाली रेपाळे, अनिरुद्ध महाडिक, वडील नंदकिशोर, काका द्वारकादास, भाऊ अविनाश व रेस्क्यू टीमचे १५ असे एकूण २० जण व इंडीयन नेव्हीचे जवान होते. श्रीलंका हद्दीत तेथील नेव्हीने कीर्तीचे स्वागत केले व पूर्ण सहकार्य केले. सर्वजण सायं ६ वाजता श्रीलंकेतील तलाईमनार येथील समुद्रकिनारी पोहोचले. सर्वांनी भोजन करून विश्रांती घेतली व वातावरणाचा अंदाज घेऊन २० सप्टेंबरच्या पहाटे १.४५ वाजता कीर्तीने समुद्रात झेप घेतली. किर्ती सोबत तिचे रक्षण करण्यासाठी ३ बोटी तत्पर होत्या. त्या बोटींना अंधारात मार्ग दाखविण्यासाठी हॅलोजन व दिशा दर्शक यंत्र लावलेले होते. रात्रीच्या काळोख्या अंधारात किर्तीने कशाचीही तमा न बाळगता फक्त हात पाय मारत होती. या काळोख्या अंधारात कीर्तीला तिच्या सोबतच्या बोटीच दिसत होत्या. बोटीत बसलेले सर्वजण डोळ्यात तेल घालून समुद्रात चहूबाजूला पूर्ण लक्ष्य देऊन होते. दर १ तासाला किर्ती पोहता पोहता पाणी, चॉकलेट, खजूर, केळी यांचे सेवन करत होती. पोहताना लहान लहान माश्यांचा त्रास सुद्धा होत होता पण त्याची सवय कीर्तीला होती म्हणून काही वाटले नाही. या दरम्यान खाऱ्या पाण्यामुळे व माश्यांच्या वासामुळे किर्तिला ३ वेळा उलट्या सुद्धा झाल्या. पण कीर्तीने जिद्द नाही सोडली. ती सतत पोहतच राहिली. अरबी समुद्र व बंगालचा उपसागर असे २ समुद्र एकत्रित असल्याने कीर्तीला लाटांच्या उलट प्रवाहांचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागला. जिथे १ तासात ४ किलोमिटर अंतर पार व्हायचे त्या ठिकाणी तासात एकच किलोमिटर अंतर पार होऊ लागले. ७ तासानंतर कीर्तीचे खांदे, हाथ व पाय खूप जोराने दुखण्यास सुरु झाले. त्याकडे कीर्तीने पूर्ण दुर्लक्ष केले व ती पोहतच राहिली. शेवटी ९ तासानंतर किर्ती मात्र पूर्ण पणे थकली. तिचे हाथ, पाय, खांदे, पाठ, कंबर इतके दुखू लागले की किर्ती पोहता पोहता समुद्रावर उलटी झोपून पोहू लागली. दुपारी १२ वाजून १० मिनिटाला धनुश्यकोडीला पोहोचली आणि हा विक्रम स्वतच्या नावावर करून घेतला.






### कीर्तीचे यापूर्वीचे विश्वविक्रम

११ ऑगस्ट २०१९ : जलतरण तलावात न थांबता १२ तास १५ मिनिटे पोहून ३४.५ किलोमिटर अंतर पार. २४ नोव्हेंबर २०२२ : मुंबईच्या अरबी समुद्रात वरळी सी लिंक ते गेट वे ऑफ इंडिया हे सागरी ३८ किलो मीटरचे अंतर न थांबता सात तास २२ मिनिटात पोहून पूर्ण २१ फेब्रुवारी २०२३ : धरमतर ते गेट वे ऑफ इंडिया हे ३९ किलोमीटरचे अंतर रात्री सलगपणे पोहत सात तास ५४ मिनिटात पूर्ण

### कीर्ती असा करत होती सराव

हा विश्वविक्रम यशस्वी होण्यासाठी कीर्ती मागील १० महिन्यांपासून मुंबई येथे आंतरराष्ट्रीय जलतरणपटू, रुपाली रेपाळे व अनिरुद्ध महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सात ते आठ तास पोहण्याचा सराव करत होती. रात्री समुद्रात पोहणे ही साधारण कामगिरी नाही. याकरीता मानसिक धैर्य एकवटून जिद्द, चिकाटी, आत्मविश्वासाच्या जोरावर कीर्ती दररोज जलतरण तलावाबरोबरच मुंबईतील समुद्रात रात्री पोहण्याचा सराव करत होती.

भागवत उमामंदिर
एअर कुल्ड
हाऊसफुल्ल २ रा आठवडा
हाऊसफुल्ल गर्दीत







03.30.PM 06.30.PM
12.30.PM 09.30.PM
Book The Ticket At BookMyShow तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

# रोल बॉल स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयास विजेतपद

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

शालेय शहर रोल बॉल स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयाने १९ वर्षाखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका स्मिता पुरवत व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी यांनी अभिनंदन केले. **विजेता संघ :** अक्षय चव्हाण, निशिकांत इरकल, दर्शन जुमाळ, कृष्णा शिंगे, कार्तिक यमपुरे, कृष्णा परदेशी, आदित्य कांबळे, रोहन घुले, समर्थ शिंगाडे, आदेश मगर, गौरव शिंदे, हर्षद भांडेकर.



# सबजुनिअर, सिनियर थ्रोबॉल जिल्हा निवड चाचणी स्पर्धा मुले व मुली

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

थ्रोबॉल असोसिएशन सोलापूरच्या वतीने सोलापूर शहर व जिल्हा सब जुनिअर व सिनिअर थ्रोबॉल जिल्हा मुले व मुली पुरुष व महिला निवड चाचणी स्पर्धा रविवार २२ सप्टेंबर सकाळी ९ वाजता शरदचंद्र पवार प्रशाला उमा नगरी येथे होणार आहे. सब ज्युनिअर खेळाडूंची जन्मतारीख १ जानेवारी २०१० नंतरची असावी संघाने येताना सोबत खेळाडूंचे वयाचा पुरावा व आवश्यक साहित्य सह उपस्थित रहावे खेळाडूंनी मैदानावर तांत्रिक समिती चेअरमन दत्तात्रय पाटील ९३७३९५५६४८, संतोष पाटील ९१५६२३०००९ व विठ्ठल सरवदे ९५५२६७६२२५ यांच्याशी संपर्क साधावा. या निवडचाचणी मधून निवडलेला संघ सोलापुरातच ४ ते ६ ऑक्टोंबर दरम्यान होणाऱ्या राज्य स्पर्धेमध्ये सोलापूरचे प्रतिनिधित्व करेल. स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे थ्रोबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. संतोष खेंडे, उपाध्यक्ष संतोष गवळी, सचिव मारुती घोडके यांनी केले आहे

# भारत ३०८ धावांनी आघाडीवर

### बांगलादेशला १४९ धावांत गुंडाळले

### बुमराहचे ४ बळी

◆ **चेन्नई, २० सप्टेंबर**

एम..ए. चिदम्बरम् स्टेडियमवर सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दुसऱ्या दिवशी भारताने पहिल्या डावात ३७६ धावा नोंदवल्या. नंतर जसप्रीत बुमराहच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर भारताने बांगलादेशला १४९ धावांत गुंडाळले. पहिल्या डावात २२७ धावांची आघाडी मिळविणाऱ्या भारताने दुसऱ्या दिवस अखेर दुसऱ्या डावात ३ गडी गमावत ८१ धावा काढल्या. खेळ थांबला तेव्हा शुभमन गिल (नाबाद ३३) व ऋषभ पंत (नाबाद १२) खेळपट्टीवर होते. भारत सध्या ३०८ धावांनी आघाडीवर आहे.

भारताने ६ बाद ३३९ धावांवरून पुढे आपल्या खेळास सुरुवात केली, मात्र बांगलादेशने चार बळी घेऊन भारताचा पहिला डाव संपुष्टात आणला. भारताला केवळ ३७ धावांची भर घालता आली. भारताने पहिल्या डावात ९१.२ षटकांत सर्वबाद ३७६ धावा उभारल्या. कालचे नाबाद वीर आर. अश्विनने १३३ चेंडूंत ११ चौकार व २ षट्कारांसह ११३ धावांची, तर रवींद्र जडेजाने १२४ चेंडूंत १० चौकार व २ षट्कारांसह ८६ धावांची खेळी केली. बांगलादेशकडून हसन महमूदने ८३ धावांत ५ बळी टिपण्याची किमया केली, तर तस्किन अहमदने ३ बळी, नाहिद राणा व मेहती हसन मिराजने प्रत्येकी एक बळी टिपला.



बांगलादेशच्या मुशफिकुर रहीमला बाद केल्यानंतर जसप्रीत बुमराह सहकाऱ्यांसोबत आनंद साजरा करताना

प्रत्युत्तर देताना बांगलादेशची दाणादाण उडाली. पहिल्या षटकांत वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने सलामीवीर शादमन इस्लामचा त्रिफळा उडवत बांगलादेशला पहिला हादरा दिला. चेन्नईच्या खेळपट्टीने गोलंदाजांना मदत केल्यामुळे बांगलादेशचा निम्मा संघ १२.५ षटकांत ४९ धावांतच तंबूत परतला. जसप्रीत बुमराह, आकाश दीप व मोहम्मद सिराजने ८ बळी टिपले, तर रवींद्र जडेजाने बांगलादेशची सर्वात मोठी भागीदारी मोडून काढली. शाकिब अल हसन व लिटन दासने सहाव्या गड्यासाठी ५१ धावांची भागीदारी केली. सलामीवीर नजमूल ह सन शांतो (२०), शाकिब (३२), लिटन (२२), मेहदी हसनने (२७) तेवढी चिवट झुंज दिली, परंतु इतर फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर टिकाव धरू शकले नाहीत. बांगलादेशचा पहिला डाव ४७.१ षटकांत १४९ धावांतच आटोपला. बुमराहने ५० धावांत ४ बळी, मोहम्मद सिराज, आकाश दीप व रवींद्र जडेजाने प्रत्येकी २ बळी टिपले.

भारताच्या दुसऱ्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. सलामीवीर यशस्वी जयस्वाल (१०) व कर्णधार रोहित शर्मा (५) लवकरच अनुक्रमे नाहिद राणा व तस्किन अहमदच्या गोलंदाजीला बळी पडले. शुभमन गिलने मात्र एक बाजू सांभाळत दिवसअखेरपर्यंत विराट कोहली (१७) व ऋषभ पंतच्या (नाबाद १२) साथीने भारताला २३ षटकांत ३ बाद ८१ धावांपर्यंत मजल मारून दिली. गिलने ६४ चेंडूंत ४ चौकारांच्या मदतीने नाबाद ३३ धावांची खेळी केली.

बांगलादेशकडून तस्किन अहमद, नाहिद राणा व मेहदी हसन मिराजने प्रत्येकी एक बळी टिपला. *(वृत्तसंस्था)*

# महाराष्ट्रातील जल व्यवस्थापन योजना आणि जलसंकटाचे समूळ उच्चाटन

**महाराष्ट्र, भारताचे आर्थिक आणि व्यावसायिक केंद्र, राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त दरडोई उत्पन्नासह भारताच्या जीडीपी मध्ये १२.९२% योगदान देते. त्याची राजधानी मुंबई हे आर्थिक आणि व्यावसायिक शक्तीस्थान आहे. अंदाजे १३.१६ कोटी लोकसंख्येसह, हे दुसरे सर्वात जास्त लोकसंख्या असलेले राज्य आहे.**

एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या अहवालानुसार, एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ५५% लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत आणि राज्यात लक्षणीय ४५.२२% शहरी लोकसंख्या आहे. हे राज्यातील प्रशासकीय हस्तक्षेपाची दोन महत्त्वपूर्ण क्षेत्रे म्हणून कृषी तसेच शहरी नियोजन आणि व्यवस्थापनाच्या महत्त्वावर जोर देते. राज्य मुख्यतः पावसावर आधारित सिंचनावर अवलंबून आहे, ज्यामुळे प्रभावी पाणी वापर तसेच वितरण आणि संवर्धन धोरणे ग्रामीण विकास आणि अन्न सुरक्षेसाठी आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे, मुंबई आणि पुणे सारख्या प्रदेशांमध्ये, औद्योगिकीकरणामुळे पाण्याच्या पायाभूत सुविधांवर वाढणाऱ्या ताणासाठी शहरी जलव्यवस्थापन महत्त्वाचे आहे.

राज्याचे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी जलव्यवस्थापन हे प्राधान्य क्षेत्र म्हणून ओळखले आणि समान प्रादेशिक विकासासाठी एकात्मिक जल योजना विकसित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. महाराष्ट्रातील जल व्यवस्थापनाची दृष्टी २०१४ नंतर वेगवेगळ्या कालांतराने चार प्रमुख उपक्रमांमध्ये वर्गीकृत केली गेली आहे, म्हणजे जलयुक्त शिवार योजना, लातूर वॉटर ट्रेन, वॉटर ग्रीड प्रकल्प आणि नदी जोडणी प्रकल्प. या चारही उपक्रमांमध्ये संपूर्ण महाराष्ट्रात संवर्धन, संकट व्यवस्थापन आणि पाण्याचे वितरण समाविष्ट आहे, ज्यामुळे जलसंकटाचा सामना करण्यासाठी सर्वांगीण पायाभूत विकासाची साखळी निर्माण झाली आहे.

राज्यातील दुष्काळाचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने २०१४ मध्ये सुरू करण्यात आलेले जलयुक्त शिवार अभियान ही सर्वात महत्त्वाकांक्षी जल व्यवस्थापन धोरणांपैकी एक होती. या प्रकल्पाने पाणीटंचाईसाठी संवेदनशील ठिकाणांवर लक्ष केंद्रित केले आणि राज्यातील जलसंधारणाचे विकेंद्रीकरण करण्यासाठी गाळ काढून टाकणे, पाणलोट व्यवस्थापन आणि जलस्रोतांचे खोलीकरण यासारख्या स्थानिक तंत्रांचा वापर केला. सरकारने ३.४ दशलक्ष हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या एकूण २४,००० घनमीटर पाणीसाठ्याची स्थापना केली. ९,९०० कोटींच्या गुंतवणुकीसह, योजनेने २५० लाखांहून अधिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन केले आणि ३.९४ दशलक्ष हेक्टर जमीन सिंचनाखाली आणली. हर खेत को पाणी (प्रत्येक शेताला पाणी) या मूळ ब्रीदवाक्यासोबत केंद्रासह राज्य सरकारचा एकत्रित प्रयत्न म्हणून प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना () राज्यभर लागू करण्यात आली. जलस्रोतांची उत्पादकता वाढवण्यासाठी आणि अपव्यय कमी करण्यासाठी या प्रयत्नांच्या धर्तीवर सूक्ष्म सिंचन आणि ठिबक सिंचन कार्यक्रमांचा अवलंब करण्यात आला.



२०१६ ची ''लातूर वॉटर ट्रेन'' हा मोठ्या प्रमाणावर पाणी संकटाचा सामना करण्यासाठी एक अभिनव उपक्रम होता. त्यातून दररोज २५ दशलक्ष लिटर पाणी पुरवले जाते, ज्याचा फायदा ५ लाख लोकांना झाला. सर्व सिंचन प्रकल्पांना जोडणारा दीर्घकालीन उपाय म्हणून सरकारने मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प पुन्हा सुरू केला. त्याचप्रमाणे, सहा जिल्ह्यांतील १५ शहरांना लाभ देण्यासाठी, वैनगंगा-नळगंगा नदी जोडणी प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करण्यात आले. ८०,००० हेक्टर शेतजमिनीला लाभ देण्यासाठी ४,०८९ कोटी खर्चून टेंभू उपसा सिंचन योजना सुरू करण्यात आली. फडणवीस यांनी पुण्यातील नीरा देवघर धरणाचे उद्घाटन केले, ज्याचे उद्दिष्ट संपूर्ण महाराष्ट्रात ४०० दशलक्ष घनमीटर पाण्याचे आहे.

फडणवीस शासनाच्या मॉडेलने जलव्यवस्थापन ही दीर्घकालीन भविष्यकालीन गुंतवणूक म्हणून ओळखली आणि क्लाउड सीडिंग आणि प्रगत सिंचन तंत्र यासारख्या तंत्रज्ञानावर आधारित उपायांचा पुरस्कार केला. विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात तात्काळ मदत केली आणि जलसुरक्षेसाठी महाराष्ट्राच्या भविष्यकालीन दृष्टीचा मार्ग मोकळा झाला.

सर्वसाधारणपणे पश्चिम महाराष्ट्राचा आणि विशेषत: मुंबईचा केस स्टडी केल्यास या जल-केंद्रित दृष्टीची सर्वसमावेशक माहिती मिळू शकेल. मुंबईत तीन प्राधान्य क्षेत्रे ओळखण्यात आली, ज्यांचे शहरीकरण आणि शेतीच्या मागण्या सुलभ करण्यासाठी आणि समतोल साधण्यासाठी पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, पुरवठा प्रणाली सुधारणे आणि समान वितरण यांमध्ये विस्तृतपणे वर्गीकरण केले जाऊ शकते. एकूण पाणीपुरवठ्यातील सुमारे २७% अपव्यय कमी करण्यासाठी पाण्याच्या पाइपलाइनचे सुधारित करून मुंबईतील जुन्या पाणीपुरवठा पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करण्याच्या गरजेवर सरकारने लक्ष केंद्रित केले. पाणी वितरणाची न्याय्य आणि विश्वासार्ह यंत्रणा सुनिश्चित करण्यासाठी शहरातील उपेक्षित घटकांपर्यंत पाणी पोहोचण्यासाठी पाण्याचे न्याय्य वितरण करण्यात आले. सरकारने १,६०० कोटींच्या अंदाजासह डिसॅलिनेशन प्लांट्स उभारून समुद्राच्या पाण्याचे पिण्यायोग्य पाण्यात रूपांतर करण्याची शक्यता ओळखली. दीर्घकालीन उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी दररोज २०० दशलक्ष लिटर समुद्राचे पाणी रूपांतरित करण्याचे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. गोड्या पाण्याच्या स्त्रोतांवरील ताण कमी करण्यासाठी पाण्याचा पुनर्वापर सुनिश्चित करण्यासाठी व्यावसायिक आणि औद्योगिक दोन्ही ठिकाणी पावसाचे पाणी साठवणे हे प्राधान्य बनले आहे. शिवाय, अतिउत्सारण दूर करण्यासाठी सरकारने भूजल पातळी पुनर्संचयित करण्यावर भर दिला. या प्रदेशांमध्ये चालू आहे. गळती शोधण्यासाठी आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी पुरवठा नेटवर्कच्या वास्तविक-वेळ निरीक्षणासाठी मुंबईला प्राधान्य देण्यात आले. जल आराखड्याच्या टिकाऊपणाची खात्री करण्यासाठी, धोरणात्मक आणि कायदेशीर चौकटींमध्ये कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरण मजबूत करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. नागरी केंद्रांवर जबाबदार वापर आणि पाण्याचे लेखापरीक्षण करण्यासाठी तळागाळातील स्तरावर प्रोत्साहन देण्यात आणि जबाबदारी वाढवण्यात नागरी समाजाचा सहभाग होता.

फडणवीस यांनी महाराष्ट्रातील पाण्याचे दीर्घकालीन आजार ओळखले आणि जलव्यवस्थापनाची शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी भविष्यकालीन दृष्टीकोनातून त्यावर उपाय शोधण्यात आले. राज्याला एकरूप करण्याऐवजी महाराष्ट्रातील वैविध्यपूर्ण प्रदेशातील वैयक्तिक तळागाळातील समस्या ओळखण्याचा हा दृष्टीकोन आहे. जल व्यवस्थापनाच्या या विषम दृष्टिकोनामुळे प्रत्येक प्रदेशाला तपशीलवार केटरिंगची खात्री झाली, ज्यामुळे जलसंधारण, व्यवस्थापन आणि वितरणाचा समतोल निर्माण झाला.

**- सुधांशू जोशी** लेखक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### पंचशील नगरात तरूणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

शहरातील कुमठा नाका परिसरातील पंचशील नगरात तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. विकास गौतम भालेराव (वय ३३, रा. पंचशील नगर, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. विकास भालेराव यांनी शुक्रवारी सकाळी सातच्या पुर्वी राहत्या घरातील लाकडी खुटीस ओढणीने सहाय्याने गळफास घेतलेले दिसून आले. त्यावेळी सदर बझार पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार जी एल काळे यांनी भालेराव यास खाली उतरून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. यावेळी भालेराव यास डॉ. श्रीकृष्ण बागुल यांनी मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### विषारी औषध प्राशन करून विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**




बचत गटाच्या कारणावरून नवऱ्यासोबत वाद झाल्याने विवाहितेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. रेशमा रियाज मुल्ला (वय ३८, रा. एमआयडीसी, निलम नगर, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या विवाहितेचे नाव असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. शुक्रवारी सकाळी आठच्या सुमारास घरी रेशमा यांचे बचत गटाच्या कारणावरून नवऱ्यासोबत वाद झाल्याने त्यांनी रागाच्या भरात सडा मारण्याचे पिवळे विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने मुलगा मेहबुब याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पाणी मारण्याच्या कारणावरून वृद्धेला मारहाण

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

पाणी मारण्याच्या कारणावरून वृध्द महिलेला मारहाण करून जखमी करण्यात आले. तुळसाबाई नागनाथ बर्हनपुरे (वय ६९, रा. उत्तर सदर बझार, सोलापूर) असे जखमी वृध्देचे नाव असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. शुक्रवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास तुळसाबाई या घराजवळ पाणी मारत होत्या. त्यावेळी सुरेश कोल्हापूरे, रंजना कोल्हापूरे यांनी तुळसाबाई यांना मारहाण केली. तुळसाबाई यांच्या सर्वांगास मार लागल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### हौदातील पाण्यात बुडून कामगाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

अक्कलकोट रोडवरील एमआयडीसीमधील युगंधर टेक्स्टाईल कारखान्यातील हौदातील पाण्यात बुडून एका कामगाराचा मृत्यू झाला. ही घटना गुरूवारी सायंकाळी घडली. राजू अंबादास पोलशेट्टी (वय ५२, रा. सुनिल नगर, नागनाथ मंदीराच्या मागे, सोलापूर) असे मरण पावलेल्या कामगाराचे नाव आहे. पोलशेट्टी हे युगंधर टेक्स्टाईल येथील कारखान्यात कामगार म्हणून होते. गुरुवारी कामावर असताना गेटजवळील पाण्याच्या हौदाचा कॉक चालू करत असताना पोलशेट्टी यांचा तोल जाऊन ते हौदातील पाण्यात पडले. त्यांच्या नाका-तोंडात पाणी गेल्याने ते बेशुध्द पडल्याने त्यांना एमआयडीसी पोलिस ठाण्याकडील हवालदार एस ए मुजावर यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु, पोलशेट्टी यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. प्रतिक माने यांनी घोषित केले.

### उच्च शिक्षण संचालक पुणे कार्यालयासमोर महाविद्यालय युनियनचे सोमवारी उपोषण

**सोलापूर, दि.२० सप्टेंबर**

राज्याच्या शिक्षण संचालनालयस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रश्नासाठी महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी सोमवारी २३ सप्टेंबर रोजी उपोषणास बसणार असल्याचे महासंघाचे सरचिटणीस डॉ. आर. बी. सिंह यांनी जाहीर केले आहे. प्रयोगशाळा परिचर/ ग्रंथालय परिचर या पदांना कालबध्द पदोन्ती/आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ देतांना वेतननिश्चिती करण्यासाठी शिक्षण संचालक यांनी दिनांक १६ ऑगस्ट २०२४चे पत्र सुधारीत करून आदेश निर्गमित करण्यासाठी तसेच इतर प्रश्नांना योग्य तो न्याय देण्यासाठी हे उपोषण करीत असल्याचे कॉलेज कर्मचारी युनियन सोलापूरचे अध्यक्ष दत्ता भोसले व सरचिटणीस राजेंद्र गिड्डे यांनी कळविले आहे. प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या वेतन निश्चीती समयी ग्रेड पे २४०० व ४२०० देय असताना विभागवार सहसंचालक कार्यालयातून होणाऱ्या विसंगतीबाबत सहसंचालक डॉक्टर प्रकाश बच्छाव यांनी दि. २० ऑगस्ट, २०२४ रोजी दूरध्वनीवरून वेतन निश्चीतीबाबत आढावा घेतला हता. त्याबाबत संबंधित सहसंचालक कार्यालयांना येत्या दोन दिवसात पत्राने कळविण्याचे निश्चीत झाले होते. परंतु अद्यापपावेतो कोणतीही कार्यवाही झालेली नाही. एम.आय.टी. विद्यापीठ पुणे संदर्भात आठवड्याभरात संचनालयाच्या वतीने बैठक आयोजित करण्यात येणार होती तसेच डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे के. व्ही. पेंढारकर महाविद्यालयात लवकरच शासन प्रशासक नियुक्त करण्यात येईल असे अश्वासित करण्यात आले होते. परंतु आजतागायत कोणत्याही बैठकीचे आमंत्रण अथवा शासन प्रशासक नियुक्त करण्यात आलेले नाहीत.

### आई कामगार संघटनेच्यावतीने सीईओंना निवेदन

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

महाराष्ट्रातील संपुर्ण महिला परिचारिका वेतनवाढ करण्यात यावी व त्या महिलांना कामावर कायमस्वरुपी पूर्णवेळ परिचारिका म्हणून घ्यावी, परिचारिकांना पेन्शन सुविधा मिळावी, शासनकडून मिळणाऱ्या सोई सुविधा सुरु करण्यात यावी, संपूर्ण अंशकालीन स्त्री परिचारीकंचे वेतन शासनाकडून वेळेवर अदा करण्यात यावे, परिचारीका, सेविका महिलांचे वेतनवाढ करण्यात यावी व वेतन वेळेवर देण्यात यावी कोरोना कळात काम करीत असताना कांही महिला परिचारकांच्या परिवास अर्थसाह्य मिळावे अश्या विविध मागण्यांचे निवेदन आई कामगार संघटनेच्यावतीने सीईओना विविध मागण्यांचे निवेदन झेडपी सीईओंना देण्यात आल्याची माहिती संघटनेचे सचिव विनोद भोसले यांनी निविदनाव्दारे माहिती दिली आहे.

## कुंभार वेस मुख्य चौक रस्त्यावरील अतिक्रमण हटविले

### महापालिकेने केले चार चाकी हात गाड्यांसह इतर साहित्य जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, २० सप्टेंबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील गजबजलेल्या कुंभार वेस मुख्य चौक परिसरातील रोड लगतचे अतिक्रमण हटविण्यात आले. रस्त्यावरील ३ चार चाकी हात गाड्यांसह वजन काटे व इतर साहित्य जप्त करण्यात आले.



महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रहदारीस अडथळा ठरणारे तसेच फुटपाथवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू आहे. या मोहिम अंतर्गतच कुंभार वेस मुख्य चौक परिसरातील अतिक्रमण काढण्यात आले. या कारवाईत ३ चार चाकी हात गाड्या, वजन काटे व इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

## विवेकानंद केंद्र कन्याकुमारीच्या वतीने शिवहरे यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर**

११ सप्टेंबर १८९३ रोजी स्वामीजींचे शिकागोच्या सर्वधर्म परिषदेत सुप्रसिध्द व्याख्यान झाले. तो दिवस विश्व बंधुत्व दिन म्हणून साजरा करण्यात येतो याचे औचित्य साधून विवेकानंद केंद्र कन्याकुमारी सोलापूर यांच्या वतीने वक्ते सुमित शिवहरे यांचे 'विश्वबंधुत्व आणि भारताची भूमिका' या विषयांवर सुमित शिवहरे यांचे व्याख्यान होणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सोलापूर डिस्ट्रिक केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष व्यंकटेश पुजारी हे असणार आहेत. सदरचा कार्यक्रम रविवारी २२ सप्टेंबर सायंकाळी ६.३० ते ८.०० वाजता जुळे सोलापूरातील गोविंदश्री मंगल कार्यालय याठिकाणी होणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने हजर रहावे असे आवाहन विवेकानंद केंद्र कन्याकुमारी सोलापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मिनी डंपरच्या धडकेने दुचाकीवरील वृध्द ठार

### सात रस्ता बस डेपोजवळील अपघात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**



शहरातील सात रस्ता परिसरातील बस डेपोजवळ भरधाव जाणाऱ्या मिनी डंपरच्या धडकेने दुचाकीवरील वृध्द खाली पडून जागीच ठार झाला. या अपघातानंतर नागरीकांनी डंपरच्या काचा फोडल्या असून चालक पळून गेला आहे.

बाळासाहेब विश्वनाथ कुलकर्णी (वय ८२, रा. गणेश हौसींग सोसायटी, जुळे सोलापूर) असे अपघातात मरण पावलेल्यांचे नाव आहे.

शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास बाळासाहेब कुलकर्णी हे रंगभवन चौकाकडून सात रस्त्याकडे त्यांच्या दुचाकीवरून येत होते. त्यावेळी बस डेपो जवळ पाठीमागून भरधाव आलेल्या (एमएच १३ डीक्यू ६८५६) क्रमांकाच्या मिनी डंपरचालकाने डंपर निष्काळजीपणे चालवून कुलकर्णी यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. या अपघातात कुलकर्णी हे त्यांच्या दुचाकीवरून खाली पडल्यानंतर त्यांच्या डोक्यावरून डंपरचे चाक गेल्याने कुलकर्णी यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातानंतर डंपर चालक पळून गेल्याने जमलेल्या नागरीकांनी डंपरच्या काचा फोडून नुकसान केले. या घटनेमुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक खोळंबली होती. या अपघाताची माहिती मिळताचा सदर बझार पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक सुरळीत करून कुलकर्णी यांचा मृतदेह शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. दरम्यान याबाबत सदर बझार पोलिसांनी डंपर ताब्यात घेतला असून चालक पळून गेला आहे. याबाबत गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरु होते.

बाळासाहेब कुलकर्णी हे जुळे सोलापूर परिसरातील सामाजिक कार्यकर्ते व प्राणायाम व योगाचे धडे देणारे गुरु म्हणून प्रसिध्द होते. त्यांच्या अपघातील निधनाने जुळे सोलापूर परिसरातील अनेक नागरीकांमधून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



## श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलीटेक्निकमध्ये कै. कर्मयोगी आप्पासाहेब काडादी यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलीटेक्निकमध्ये कै. कर्मयोगी आप्पासाहेब काडादी यांची जयंती साजरी करण्यात आली, तसेच अभियंता दिनानिमित्त डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन कॉलेजचे प्राचार्य गजानन धरणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी कॉलेजचे प्राचार्य गजानन धरणे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. याप्रसंगी बोलताना त्यांनी एक उत्कृष्ट अभियंता कसे बनता येईल याविषयी सांगितले.

त्यांनी डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जीवन परिचय करून दिला. विद्यार्थिनींनी आपली स्पर्धा जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय किंवा देशपातळीवर न ठेवता आंतरराष्ट्रीय स्तरावर ठेवावे असे मोलाचे मार्गदर्शन केले.

इंजीनियरिंग क्षेत्रातील सध्या मुलींचा वाटा झपाट्याने वाढत आहे व मुली या पुरुषांच्याही पुढे गेल्या आहेत असे त्यांनी सांगून विद्यार्थिनींचे मनोबल वाढवले.

विज्ञान व तंत्रज्ञानाचे हे युग असून याचा वापर करून विद्यार्थिनींनी विविध क्षेत्रात मोठी भरारी घ्यावे असे त्यांनी आवाहन केले. सूत्रसंचालन प्राध्यापक सुचेता चौधरी यांनी केले.

याप्रसंगी कॉलेजचे सर्व विभागाचे विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होते.



## सिद्ध-ईश्वर नगरच्या गणरायांची डॉल्बी मुक्त मिरवणूक

### कांबळे परिवाराची भजन संध्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

श्री सिद्ध-ईश्वर नगर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या श्री गणरायांची डॉल्बी मुक्त मिरवणूक काढून विसर्जन करण्यात आले.

आजच्या धावपळीच्या युगात केवळ गणेशोत्सव, शिवजयंती सारख्या सार्वजनिक कार्यक्रमात सर्व समाज एकत्रित येऊन एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण, एकमेकांमध्ये सहकार्याची भावना निर्माण व्हावी म्हणून श्री सिद्ध ईश्वर नगर या सामाजिक संस्थेने आतापर्यंत सामाजिक बांधिलकी जपत अनेक समाज उपयोगी कार्यक्रम पार पाडले. गणेशोत्सवानिमित्त दररोज सकाळ, संध्याकाळ श्री गणेशांच्या पूजेचा मान सर्व जाती, धर्मातील गणेश भक्तांना देण्यात आला. मनुष्य हा समाजशील प्राणी असून आपण सर्व एक आहोत. ही भावना या संस्थेने रुजवण्याचा प्रयत्न केला.

गणेशोत्सवानिमित्त चैतन्य कांबळे परिवाराने तब्बल दोन तास भजनाचा कार्यक्रम पार पाडला. संजीवनी कांबळे यांच्या सुमधुर आवाजाने व कैवल्य कांबळे यांच्या तालबद्ध तबलावादनाने या बालकलाकारांनीश्रोत्यांची व रसिकांची मने जिंकून घेतले. तसेच चैतन्य कांबळे, सुमन कांबळे, ज्ञानेश्वरी कांबळे, सच्चिदानंद कांबळे, भाग्यश्री कांबळे, स्वरूपा वाघमारे, ईश्वरी वाघमारे, समृद्धी वाघमारे आदींनी सुमधुर आवाजानी भजनाला साथ दिली.

''श्री'' उत्सव निमित्त सर्वांना महाप्रसाद देण्यात आला. विसर्जना दिवशी कोणत्याही प्रकारचा कर्णकर्कश आवाज न करता, ध्वनी प्रदूषणमुक्त मिरवणूक काढून विसर्जन करण्यात आले. श्री गणरायांच्या उत्सवासाठी मंडळाचे सर्वेसर्वा राजशेखर दोड्डाळे, राजदत्त देवरकोंडा, वैभव परिचारक आदींनी परिश्रम घेतले. रामलिंग मेहेत्रे, श्री. खोबरे, सिद्धराम धर्मसाले, नवनाथ वाघमारे, सुरेश माने, वसंत धायगुडे,जयदेव गायकवाड ,महेश कोर आदींनी हा कार्यक्रम अतिशय उत्साहाने पार पाडला

## कर सल्लागारासह दोघांना गंभीर जखमी केल्याप्रकरणी चोघांची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर -**



येथील कर सल्लागार नईम बावालाल पटेल ( वय ४३) व आई रेहाना पटेल (वय ६३) यांना विटेने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी इलियास इब्राहिम शेख (वय ६८), शमशाद इलियास शेख (वय ६२), साजिद इलियास शेख (वय ३२) आणि मो. मयोद्दीन सराउद्दीन शेख (वय २८, सर्व रा. गजानन नगर, मजरेवाडी, सोलापूर) यांची प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी डी. जी. कंखरे यांनी निर्दोष मुक्तता केली.

फिर्यादी नईम पटेल आणि आरोपी इलियास शेख यांची घरे गजानन नगर येथे समोरासमोर असून यांच्यातील पूर्वीच्या भांडणाचा राग मनात धरून किरकोळ कारणावरून ५ नोव्हेंबर २०१७ रोजी सार्वजनिक रस्त्यावर इलियास शेख व त्यांची पत्नी शमशाद शेख यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून भांडणे केली. त्यावेळी त्यांचा मुलगा साजिद शेख हा त्यांचा मित्र मयोद्दीन शेख याच्यासह तेथे आला. त्यांनी नईम पटेलला हाताने व लाथाबुक्क्यांनी मारण्यास सुरुवात केली. त्याचवेळी साजिद याने बाजूस पडलेल्या विटेने नईम यास डोक्यात मारून गंभीररित्या जखमी केले. याबाबतची फिर्याद कर सल्लागार नईम पटेल यांनी विजापूर नाका पोलीस ठाणे येथे दिल्यावरून वरील चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता.

या खटल्याच्या सुनावणीवेळी सरकार पक्षातर्फे ७ साक्षीदार तपासण्यात आले. तथापि दोन भिन्न वैद्यकीय प्रमाणपत्रे संशयास्पद असून फिर्यादीनेच आरोपींना पूर्व वैमनस्यामुळे खोट्या खटल्यात गुंतविल्याचा युक्तिवाद आरोपींचे वकीलांनी केला. तो युक्तिवाद ग्राह्य मानून चारही आरोपींची न्यायाधिशांनी निर्दोष मुक्तता केली.

या खटल्यात सरकारच्यावतीने ॲड. सार्थक चिवरी यांनी तर आरोपींच्यावतीने ॲड. आल्हाद अंदोरे व ॲड. अथर्व अंदोरे यांनी काम पाहिले.

## शिक्षक बदली प्रकरण....

## शिक्षकांच्या बदल्या न थांबल्यास झेडपी समोर सोमवारी उपोषण

### महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

दहा पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या आणि दोन शिक्षक कार्यरत असलेल्या शाळेतून सेवाजेष्ठ शिक्षकाचे अत्यंत गरज असलेल्या शाळेत समायोजन करण्याचे आदेश आहेत. मात्र अक्कलकोट तालुक्याचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत समुपदेशन न करताच बदल्या केल्याने शिक्षकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. तर गटशिक्षणाधिकारी आरबाळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. या बदली संदर्भात त्वरीत बदल्या न थांबल्यास जिल्हा परिषद समोर तिर शिक्षक संघटनेला सोबत घेवून उपोषण करणार असल्याचा इशारा महाराष्ट्र राज्य मागस्वर्गीय शिक्षक संघटनेचा इशारा दिला आहे. तसेच बदल्या संदर्भात महाराष्ट्र राज्य मागस्वर्गीय शिक्षक संघटनेचे पदाधिकारी हे सोमवारी सीईओंची भेट घेणार असल्याचे अक्कलकोट तालुका शिक्षक संघटनेचे अध्यक्ष मंहातेश कट्टीमनी यांनी दैनिक'तरुण भारत'शी बोलताना सांगितले आहे.



समुपदेशन न करताच शिक्षकांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. शिक्षकांच्या बदल्या न थांबल्यास जिल्हा परिषदसमोर इतर शिक्षक संघटनांना सोबत घेवून उपोषण करण्यात येणार आहे. झालेल्या बदल्या त्वरीत थांबवाव्यात तसे न झाल्यास,सोमवारी झेडपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची भेट घेणार आहे. शिक्षण विभागात हा आता नवीन पायंडा पाडल्याचे दिसून येत आहे. शिक्षकांना तोंड दाबून बुक्क्याचा मार देण्याचा प्रकार सुरु आहे. असे प्रकार घडत असेल तर शाळेची गुणवत्ता कशी काय वाढणार असा प्रश्न पडला आहे.

**- मंहातेश कट्टीमनी, मुख्याध्यापक, मैदर्गी**





दरम्यान याबाबत शिक्षणाधिकारी कादर शेख यांना विचारले असता आमच्याकडे कोणतीही तशी तक्रार अध्याप प्राप्त झालेली नसून, तर तशी तक्रार आल्यास आम्ही चौकशी करू

**- कादर शेख, शिक्षणाधिकारी, झेडपी**

### या शिक्षकांच्या बदल्या...

सुलोचना कलमदाने, सुनीता कास्पटे, कांचन बिराजदार, ज्ञानेश्वर पाटील, सत्त्वजित भालेराव, देश मुंढेवाडी, नागनाथ मेटकरी, जावेद गोडीकट, मनोज माने, तोलन वागवान, सचिन फावडे, (कन्नड माध्यम) मधुसूदन कटगेरी, सिद्धप्पा हारके, बाबुराव नडगिरे, प्रवीण देसाई, बसवराज गोरे, श्रीशैल भुसारे, श्रीमंत शिवशरण, मंगलदास यारोळे, पंचाक्षरी मठपती, (उर्दू माध्यम) शहनाजबानो सुंडके आदी शिक्षकांचा समावेश आहे.

मंहातेश कट्टीमनी म्हणाले, शिक्षकांच्या करण्यात आलेल्या या प्रतिनियुक्त्या रद्द करण्याची मागणी मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष महांतेश कट्टीमनी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे करण्याचा इशारा दिला आहे. सन २०२४-२५ नी संचमान्यता अंतिम नसतानाही नियमबाह्य समायोजन करण्याचा उद्देश स्पष्ट होत नाही. समायोजन प्रक्रिया ही समुपदेशनाद्वारे रिक्त पदे दाखवून करणे आवश्यक असतानाही मनमानी पद्धतीने समायोजन करण्यात आलेले आहे. सेवा ज्येष्ठता डावलून सेत्रा कनिष्ठ शिक्षकांच्या प्रतिनियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत, कमी पटसंख्येच्या काही शाळा व शिक्षक यांना वगळून जाणीवपूर्वक काहींना लाभ पोहचविण्यात आला असून काही उपशिक्षकांची नियुक्ती विषय शिक्षक पदावर केल्याने याची जोरदार दबक्या आवाजात चर्चा शिक्षकांच्यामध्ये सुरु आहे. या शिक्षकांच्या समायोजनाच्या नावाखाली प्रतिनियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

त्यामुळे अनेक शिक्षकांना समुपदेशन न करताना बदल्या केल्याने मोठी गैरसोय झाली असून असा शासन आदेश आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात असल्याची प्रतिक्रिया अक्कलकोट तालुका शिक्षक संघटनेचे अध्यक्ष मंहातेश कट्टीमनी यांनी यावेळी बोलताना दिली.

# समाजकारण, राजकारणातील संवेदनशील नेतृत्व : ॲड.मीनलताई साठे



भारत हा लोकशाही प्रधान देश. येथे सत्ता गाजवायची नसते तर उच्च नैतिकता, संविधानिक मूल्यांवर निष्ठा आणि महात्मा गांधींच्या कल्पनेतल्या विश्वस्त भावनेने काम करण्याची मानसिकता आणि निर्धार असणे महत्वाचे. पदे ही सत्ता आणि अधिकाराची नसून सेवेची आहेत आणि यातून सामाजिक आर्थिक परिवर्तन घडवायचे असते. ज्याप्रमाणे एक कुटुंबप्रमुख आपल्या घराची, घरातील लोकांची काळजी घेतो आणि त्यातील दुबळ्या लोकांची जास्त घेतो अगदी तशीच काळजी घेणाऱ्या माढा नगरीच्या नगराध्यक्षा ॲड. मीनलताई साठे यांना राजकारणरूपी काटेरी कॅक्टसवर उगवलेलं दुर्मिळ फुल असून समाजाच्या सर्व घटकांविषयी आपुलकी आणि संवेदनशीलता अंगी असणारे नेतृत्व म्हणून ॲड. मीनलताई साठे यांच्याकडे पाहिले जात आहे. राजकारणाने आणि सत्ताकारणाने बजबजलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये नगराध्यक्षा म्हणून काम करताना माढ्यासह संपूर्ण तालुक्यात महिलांचे मोठे संघटन त्यानी केले. जुन्या रूढी, परंपरा यामुळे क्वचितच बाहेर पडणाऱ्या तमाम स्त्रियांना मानसिकरित्या कणखर बनवीत स्वावलंबी बनवले. असुरक्षिततेची भावना मनातून काढतानाच स्त्री ही अबला नसून सबला आहे हे दाखवून दिले. पुरूषकेंद्रीत राजकारण महिला केंद्रीत बनवताना आपल्या सखींना सोबत घेत माढा नगरपंचायतीची सत्ता सलग दोनदा काबीज करण्याचा माढ्यात इतिहास रचला.

## मिळालेल्या संधीचे सोने केले....

मीनलताईंच्या कार्यकत्तृवाला माहेर व सासरच्या उत्तम संस्काराची पार्श्वभूमी आहे. सोलापूर जिल्ह्याचे पहिले सहकार महर्षी स्व. गणपतराव साठे यांच्यासह दोनदा आमदार राहिलेले सासरे ॲड. धनाजीराव साठे, जिल्हा परिषद सदस्या स्व. मंदाकिनी काकी साठे (सासूबाई) आणि कुर्मदास साखर कारखान्याचे संचालक पती दादासाहेब साठे यांची खंबीर साथ महत्त्वाची आहे. गावोगावच्या मिस्टर सरपंच आणि मिस्टर नगराध्यक्ष अशा काहीशा काळात पती दादासाहेब साठे यांनी मीनलताईंच्या कार्याचा आवाका पाहून मोकळेपणाने आणि मोठ्या मनाने संपूर्ण स्वातंत्र्य दिल्याने त्यांच्या कार्याच्या कक्षा रूंदावल्या.

## महिला सबलीकरणासाठी उपक्रम

माढा शहर आणि परिसरासह तालुक्यातील महिलांमध्ये स्वत्वाची जाणीव होणे, यासाठी विविध व्याख्यानांच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात येते. यामध्ये ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ, अपर्णा रामतीर्थकर, अभिनेत्री निशिगंधा वाड, अलका कुबल, साधना करंदीकर, डॉ. रोहिणी कुलकर्णी, ॲड. सुचित्रा घोगरे-काटकर यांच्या व्याख्यानांचे आयोजन प्रियदर्शनी महिला विकास मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी केले जाते. या माध्यमातून महिलांसाठी कायदेविषयक, आरोग्यविषयक बौद्धिक आणि सामाजिक विषयांवर प्रबोधन करण्यात आले आहे. महिलांच्या आरोग्यासाठी कॅन्सर, कॅल्शियम, हिमोग्लोबिन, मधुमेह तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येते. महिला व मुलींच्या समस्यांवर शिबिरासह योगा शिबिरांचे आयोजन केले जाते.

## महिला उत्पादकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ

महिलांसाठी उद्योगवर्धिनी उपक्रम महिलांनी स्वतःच्या पायावर उभा राहून अर्थार्जन करावे. स्वावलंबी बनावे, यासाठी मंडळाच्या माध्यमातून वेगवेगळे प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली गेली. यामध्ये पापड उद्योग, कापडी पिशवी, फॅशन डिझायनिंग उद्योग, उन्हाळी कामाचे उद्योग प्रदर्शन व विक्री, संगणक प्रशिक्षण, सोयाबीन प्रक्रियापासून पदार्थ बनवणे व विक्री करणे, केक प्रशिक्षण, घरगुती कचऱ्यातून खत निर्मिती, दूध व दुग्धजन्य पदार्थांचे प्रशिक्षण, ब्युटी पार्लर प्रशिक्षण व मोबाईल दुरुस्ती प्रशिक्षण अशा शिबिरांचे आयोजन करतानाच या माध्यमातून तयार झालेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करण्यात आली. यामधील काही निवडक उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजार उपलब्ध करून दिलेली आहे.

### परिचय ...

- शिक्षण : बीएससी, एलएलएम
- पदे : उपनगराध्यक्ष २०१६ ते १८ माढा नगरपंचायत, २०१७ पासून जिल्हा नियोजन समितीच्या सदस्या, २०१८ पासून नगराध्यक्ष, चेअरमन सहकार महर्षी धनाजीराव साठे ग्रामीण बिगर शेती पतसंस्था,
  सचिव : जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ
  अध्यक्ष : प्रियदर्शनी महिला मंडळ माढा
  संस्थापक चेअरमन : प्रियदर्शनी महिला नाविन्यपूर्ण सर्वसाधारण सहकारी संस्था मर्यादित माढा

### प्राप्त पुरस्कार

- २०१७ रोटरी क्लब माढा स्त्रीशक्ती पुरस्कार
- २०१९ दैनिक सकाळ एक्सलन्स अवॉर्ड
- २०२० जिजाऊ पुरस्कार
- २०२० उत्कृष्ट नगराध्यक्ष पुरस्कार
- २०२० नेहरू युवा केंद्राच्या वतीने जिल्हास्तरीय आदर्श युवा मंडळ पुरस्कार प्रियदर्शनी महिला विकास मंडळ
- २०२१ राज्यस्तरीय स्त्रीशक्ती सन्मान पुरस्कार महा एनजीओ फेडरेशन पुणेतर्फे
- २०२१ नेहरू युवा केंद्राचा प्रियदर्शनी महिला विकास मंडळास स्वच्छता पुरस्कार
- २०२१ रणरागिणी पुरस्कार माँ दुर्गा गीत शकुन ट्रस्ट गोवा व स्वरकुल ट्रस्ट पुणे
- २०२२ महिला उद्योजिका सांगली
- २०२२ स्त्रीशक्ती सन्मान पुरस्कार रोटरी क्लब ऑफ माढा
- २०२२ राष्ट्रीय महिला पुरस्कार
- २०२३ कै. बाबुरावजी डिसले स्मृती जीवनगौरव पुरस्कार
- २०२४ नॅशनल एक्सलन्स ग्रामसेवक अवॉर्ड
- २०२४ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार
- २०२४ दिव्य मराठी सन्मान कर्तबगार महिलांचा पुरस्कार

## ग्रामसदृश्य माढ्याचा शाश्वत विकास

पंधरा वर्षांपूर्वीचा माढा आणि आजचा माढा जर पाहिला तर येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला माढ्याच्या विकासात झालेला बदल प्रकर्षाने जाणवतो. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून रस्ते, वीज, पाणी हा विकासाचा प्रश्न प्रभावीपणे राबवतानाच पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकुल योजना यासारख्या शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवल्य. हजारो कुटुंबांना स्वतःच्या हक्काचे घर मिळवून दिले. याचबरोबर सार्वजनिक शौचालय उभा करून माढा शहराला स्वच्छ व सुंदर बनवण्यामध्ये मोलाचा वाटा उचलला. माढा शहरांमध्ये नव्याने रस्ते करायचे झाले तर कोणता रस्ता मंजुरीसाठी घ्यायचा असा प्रश्न आज यानिमित्ताने समोर येतो आहे. इतकी मोठी कामे नगरपंचायतीच्या माध्यमातून मीनलताई साठे यांनी केलेली पाहायला मिळतात.

## सर्वधर्म विविध जाती आणि धर्मांमध्ये सामाजिक सलोखा

शहर व परिसरातील विविध जाती-धर्माचे लोक गुण्या गोविंदाने नांदावेत. सामाजिक सलोखा रहावा यासाठी खास मुस्लिम महिलांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन मीनलताई साठे यांनी सुरू केलेले आहे. याचबरोबर आषाढी वारीतील दिंडीतील लोकांना जेवण, चहा, नाष्टा, फळे वाटप, मोफत औषधोपचार नवरात्रमध्ये भक्तांना दूध, फळे वाटप करणे आदी उपक्रम राबवले जातात.

## पर्यावरणाचा संदेश

सीडस् बॉल तयार करणे, वृक्षारोपण करणे आणि वृक्ष संवर्धन करणे या गोष्टीसाठी मंडळाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून श्रमदानाबद्दल लोकांमध्ये जागृती करणे, स्वच्छतेविषयी जागृती करण्यासाठी स्वच्छतेविषयक उपक्रम राबवणे, पाणी आडवा, पाणी जिरवा या उद्देशाने मनकर्णा ओढ्याचे रुंदीकरणाचे व खोलीकरणाचे काम करणे, महिला मंडळामार्फत वटपौर्णिमेसाठी ज्या वडाची पूजा त्या वडाच्या झाडाची लागवड करणे आदी उपक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदात राबवले जातात.

## महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम

दैनंदिन ताणतणावातून, कामातून थोडासा आराम मिळावा, मनोरंजन व्हावे, यासाठी महिलांसाठी दांडिया स्पर्धा, गरबा स्पर्धा, डान्स स्पर्धा राबवल्या जातात. याचबरोबर जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिला शक्ती रॅली महिला, झांज पथक, ढोल पथक, लेझीम पथक रॅली, बेटी पढाव, बेटी बचाव रॅली, अशा अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते. याचबरोबर आदर्श माता पुरस्कार, आदर्श महिला उद्योजिका पुरस्कार, कर्तबगार माहेरवाशिण पुरस्कार, आदर्श सासू-सून पुरस्कार अशा पद्धतीच्या वेगळ्या प्रकारचे पुरस्कार देत कुटुंबा-कुटुंबामध्ये संवाद वाढवून प्रेम आणि आपुलकी वाढवण्याचे काम मीनलताई साठे या करत आहेत.







## महापालिकेचे उपायुक्त घोलप यांची बदली

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

महापालिकेचे उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांची बदली झाली असून शासनाने त्यांची नियुक्ती श्रीरामपुर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी या पदावर केली आहे. घोलप यांनी ४ मे २०२२ रोजी सोलापूर महापालिकेच्या उपायुक्त पदाची जबाबदारी स्विकारली होती.



तीन वर्षाचा कार्यकाळ पुर्ण होण्याला सहा महिने राहिले असताना त्यांची बदली झाली आहे. त्यांच्या विनंतीवरुन शासनाने बदली केली असल्याचे सांगण्यात आले.

उपायुक्त घोलप यांनी अडीच वर्षात आपल्या कामाची अमिट कार्याचा ठसा उमटविला आहे. घनकचरा व्यवस्थापन, परिवहन विभाग, क्रीडा कार्यालय, समाज विकास विभाग, उद्यान विभाग, पर्यावरण संवर्धन, नगरसचिव कार्यालय तसेच विभागीय कार्यालय क्रमांक २ आणि ४ अशा विविध विभागाची जबाबदारी त्यांनी अतीशय सक्षम आणि कर्तव्यदक्षपणे सांभाळली.

**सहाय्यक आयुक्त पदी कृष्णा पाटील यांची नियुक्ती**

सहाय्यक आयुक्त पदी कृष्णा पाटील यांची शासनाने नियुक्ती केली आहे. आता महापालिकेत ६ सहाय्यक आयुक्त झाले आहेत. पाटील हे कोल्हापूर महापालिकेत सहाय्यक आयुक्त पदावर प्रतिनियुक्तीवर होते. मत्स्य व्यवसाय विभागाचे वसुली अधिकारी ही जबाबदारी त्यांच्याकडे होती. त्यांच्या नव्या नियुक्तीमुळे सोलापूर महापालिका प्रशासनातील शासन नियुक्त सहाय्यक आयुक्त पदाचा कोटा पुर्ण झाला आहे. आता म हापालिकेत ६ सहाय्यक आयुक्त झाले आहेत. आता शासन स्तरावरील अतिरिक्त आयुक्त पदाची प्रतीक्षा आहे. तर घोलप यांच्या नंतर रिक्त उपायुक्त पदी आता कोण येणार याकडे लक्ष लागले आहे.






CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## संक्षिप्त वृत्त...



### दोन तोळ्याची सोन्याची चैन लंपास

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

धूम स्टाईलने दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील २ तोळ्याची ७० हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेली. ही घटना १९ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास शहरातील अंत्रोळीकर नगर परिसरात घडली.याबाबत कनिष्का संजय धामेचा (वय ३५, रा. प्लॉट नं. १०, अंत्रोळीकर नगर, वेलनेस मेडीकलच्या बोळात, होटगी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास कनिष्का धामेचा या त्यांच्या घरासमोरील गेटसमोर थांबल्या होत्या. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या अज्ञात चोरट्याने दुचाकीवरून येऊन धामेचा यांच्या गळ्यातील दोन तोळ्याचे सोन्याची चैन जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक शितलकुमार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### काळवीट हरणाचे मांस विकणाऱ्यास अटक

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

काळवीट जातीच्या हरणाचे मांस विकणाऱ्यास शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. गुलाब उर्फ सुभाष आबाशा भोसले (वय ४८, रा. १६ संडासजवळ, लिमयेवाडी येथे भाड्याने, सोलापूर मुळ रा. खानापूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत पोलिस शिपाई भारत पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी १८ सप्टेंबर रोजी साडेदहाच्या सुमारास गुलाब भोसले याच्या घरात छापा टाकला असता त्याच्याकडे दोन काळवीट जातीच्या हरणांचे मांस मिळून आले. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक खामकर पुढील तपास करीत आहेत.

### आबावाडी येथे पूर्व वैमनस्यातून दोन गटात हाणामारी

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

आबावाडी (ता. अक्कलकोट) येथे दोन गटात पूर्व वैमनस्यातून झालेल्या हाणामारीप्रकरणी अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात १८ जणांविरुध्द परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.याबाबत विकास अरुण गुळवे (वय २७) याने दिलेल्या फिर्यादीवरून स्वप्निल जयसिंग मोरे, सदाशिव आनंदराव मोरे, महादेव आनंदराव मोरे, शेषाबाई महादेव मोरे, महेश महादेव मोरे, दत्तात्रय महादेव मोरे, उमेश महादेव मोरे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दत्तात्रय महादेव मोरे यांच्या फिर्यादीवरुन सुनिल अरूण गुळवे, गणेश स्वामीराव मोरे, स्वामीराव आनंदराव मोरे, सुरेश स्वामीराव मोरे, सत्यजीत सुरेश मोरे, विकास अरूण गुळवे, सागर विजयकुमार भांड, प्रिती गणेश मोरे, सुरेखा सुरेश मोरे, मोनिका गुळवे, श्रीपती बलभिम पवार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ सप्टेंबर रोजी सकाळी मागील भांडणाचा राग मनात धरून स्वप्नील मोरे याचा भाऊ किशोर मोरे याला मारहाण करून जखमी केले. तसेच इतरांनी स्वप्नीलच्या वडीलांचे मामा स्वामीराव मोरे, दत्तात्रय मोरे यांना दगडाने, काठीने, हाताने मारहाण करून जखमी केले. तर दत्तात्रय मोरे यांच्या फिर्यादीनुसार ११ सप्टेंबर रोजी सकाळी सुनिल गुळवे व इतरांनी जागेच्या कारणावरून दत्तात्रय मोरे, सदाशिव मोरे आदींना शिवीगाळ करून दमदाटी करून हाताने, लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले. या दोन्ही घटनांबाबत अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र राठोड पुढील तपास करीत आहेत.

# सोलापुरात उद्योग विस्ताराला लोकमंगल बँकेचे बळ

## नुसते स्वप्न नाही दाखवले...तडीसही नेले; १ हजार ५०० नवउद्योजकांना १२५ कोटींचा अर्थपुरवठा

### माजी सहकार मंत्री आ. सुभाष देशमुख यांचे योगदान

**तभा वृत्तसेवा । जगन्नाथ हुक्केरी**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

नेहमीच नव्याचा ध्यास घेऊन काम करणारे नेते म्हणून माजी सहकार मंत्री आ. सुभाष देशमुख यांची ओळख. छोट्या-छोट्या गोष्टींना पाठबळ देऊन त्यातून नवनिर्माण करण्यासाठी नेहमीच त्यांची धडपड असते. अशाच धडपडीतून नवनवे प्रयोग त्यांनी साकारले. त्यात त्यांना मोठे यश आले. 'हाताला काम मागणारे होऊ नका. काम देणारे व्हा', असा महामंत्र तरुणांना देत उद्योजक घडविण्याचा संकल्प त्यांनी केला. आता त्यांच्या संकल्पाची पूर्तता झाली असून, लोकमंगल को-ऑप बँकेने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून तब्बल १ हजार ५०० नवउद्योजकांना १२५ कोटी रुपयांचे कर्ज दिले. या कर्जातून हजारो उद्योजकांना लोकमंगल बँकेने चांगले बळ दिले आणि सोलापूरचे उद्योग विश्व विस्तारण्यास मदत केली.

'अर्थ करी समर्थ' हा नारा देत आ. सुभाष देशमुख यांनी सोलापूरचे नाव जागतिक पातळीवर पोहचविण्यासाठी नेहमीच प्रयत्न केला आहे. त्यात सोलापूरच्या पर्यटनाबरोबरच उद्योग, व्यवसाय, खाद्य संस्कृती, धार्मिक स्थळे यासह अनेक बाबींचे मार्केटिंग त्यांनी केले. सोलापुरात सक्षम उद्योजक घडविण्याचे स्वप्न उराशी बाळगून





सतत प्रयत्न करत असताना त्यांना या कामी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची चांगली साथ मिळाली. यातून सोलापूर शहर, जिल्ह्यातीलच नव्हे तर परिसरातील तब्बल १ हजार ५०० नवउद्योजकांना १२५ कोटी कर्जाच्या रुपाने आर्थिक पाठबळ दिले. यातून सोलापुरातील गरजवंतांची आर्थिक कोंडीतून सुटका झाली आणि ते स्व:कौशल्यावर स्वत:चा व्यवसाय करण्यासाठी पुढे सरसावले. यामुळे स्वत:चे कुटुंब तर उभे राहिलेच; त्याबरोबरच इतरांच्या हातालाही काम मिळाल्याने स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण करण्याची किमया आ. सुभाष देशमुख यांनी केली. सोलापूरकरांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन त्यांना पतपुरवठा करण्यासाठी अनेक योजनांची तरतूद आ. सुभाष देशमुख यांनी लोकमंगल बँक, पतसंस्था, मल्टिस्टेटच्या माध्यमातून नेहमीच करत आहेत. या त्यांच्या कार्याला मर्यादा येत होत्या. आता अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामुळे मदतीचा बाहू विस्तारला आणि उद्योजक घडविण्याच्या त्यांच्या ध्येयाला चांगलीच चालना मिळाली. यातूनच मोठी कामगिरी ते करत आहेत. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेपासून आतापर्यंत अनेकांना मदत करण्यात आली. पूर्वी होत असलेला पतपुरवठा अल्प होता. शिवाय त्यात प्रचंड बंधने होती. यामुळे सहजासहजी त्याचा फायदा मिळत नव्हता. २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पतपुरवठ्याच्या धोरणात अमूलाग्र बदल केला. अल्पव्याज दरात कर्जपुरवठा करण्याचे धोरण अवलंबले. परतफेडीची सुलभताही निर्माण केली. कर्ज घेणे, फेडणे सोयीचे झाल्याने असंख्य मराठा समाज बांधव याकडे वळू लागले आणि उद्योजक बनण्याचे त्यांचे स्वप्न खऱ्या अर्थाने सत्यात उतरु लागले. बदललेल्या नव्या धोरणामुळे कर्ज बुडविण्याची भावना नष्ट झाली आणि उलट कर्जाचे हफ्ते वेळेत भरण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळाले. शिवाय लोकमंगल बँकेचे चेअरमन आ. सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सुविधा दिल्याने कर्जदारांची डोकेदुखी कमी झाली. यामुळेच केवळ दोन वर्षात १ हजार ५०० मराठा समाजातील नवउद्योजकांना याचा लाभ घेता आला.



### काय आहे योजनेचा उद्देश?

✻ मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या तरुणांना सक्षम बनविणे ✻ तरुणांना योजनेत समाविष्ट करुन रोजगार आणि स्वयंरोजगारच्या संधी उपलब्ध करुन देणे ✻ मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांचा विकास घडवून आणणे

### लाभासाठी ही आहे अट

✻ लाभार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा ✻ पुरुषांसाठी ५० तर महिलांसाठी ५५ वयोमर्यादा बंधनकारक ✻ महामंडळाच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा ✻ एका व्यक्तीला फक्त एकदाच लाभ घेता येतो ✻ दिव्यांग असल्यास दिव्यांग प्रमाणपत्र बंधनकारक

### सहकारी बँकांच्या समावेशासाठी आ. देशमुखांचा पुढाकार

पूर्वी राष्ट्रीयकृत बँकांनाच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे कर्ज देता येत होते. त्यात सहकारी बँकांचा समावेश नव्हता. सन २०१८-१९ मध्ये सहकारमंत्री व आर्थिक विकास महामंडळाच्या समितीवर असताना आ. सुभाष देशमुख यांनी सतत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन अर्थमंत्री आणि संबंधित विभागाकडे पाठपुरावा करुन सहकारी बँकांमार्फत कर्जपुरवठा करण्याची परवानगी मिळविली. यामुळे लाभार्थ्यांना सहकारी बँकांमधून कर्ज मिळण्याचा मार्ग अधिकच सुलभ आणि सुकर झाला. सहकारी बँकांनीही यासाठी पुढाकार घेतल्याने याचा लाभ मिळत आहे. लोकमंगल बँकेने तर यासाठी विशेष सोय केल्याने नवउद्योजकांची रीघ या बँकेकडे लागली आहे.

### 'चला उद्योजक घडवू या'साठी बैठका

आ. सुभाष देशमुख यांनी मोठे मेळावे, सभा न घेता गरजवंतांच्या छोट्या-छोट्या बैठका घेतल्या. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. त्यांच्या गरजांचा अंदाज घेऊन बँकेच्या अधिकाऱ्यांमार्फत समुपदेशन करुन आदर्श नवउद्योजक होण्यासाठी प्रेरणा दिली. आ. देशमुख यांच्या बैठकांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. याच प्रतिसादातून आज १ हजार ५०० मराठा नवउद्योजक घडले आहेत. विशेष म्हणजे कौशल्य असलेल्या आणि काहीतरी करण्यासाठी धडपड करणाऱ्यांची यादी काढून प्रत्यक्ष त्यांचा संपर्क साधण्यात आला. त्यांच्या कर्जाच्या मागणीचा अंदाज घेऊन त्यांना पतपुरवठा करण्यासाठीही लोकमंगल बँकेने मोठे योगदान दिले आहे.

### लोकमंगल बँकेत एक खिडकी योजना

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे कर्ज देण्यासाठी लोकमंगल बँकेचे चेअरमन आ. सुभाष देशमुख यांच्या सूचनेनुसार एक खिडकी योजना सुरु करण्यात आली आहे. यामुळे कर्जदारांना माहिती घेणे, कर्ज करणे, इतर बाबींचा तपशील मिळविणे याबाबी शक्य झाल्या आहेत. यामुळे त्यांना कमी श्रम, कमी कटकट, विनाझंजट कर्ज मिळत आहे. प्रशिक्षित लोकमंगल बँकेच्या अधिकाऱ्यांकडून त्यांना मार्गदर्शनही मिळत असल्याने कर्जदारांची डोकेदुखी, त्रास कमी झाला आणि याचा लाभ घेणे सोयीचे झाले.

### आज मराठा उद्योजक मेळावा

लोकमंगल को-ऑप बँक, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून मराठा उद्योजक संकल्पपूर्ती झाल्याने शनिवारी २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे मराठा उद्योजक मेळावा होणार आहे. यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, लोकमंगल बँकेचे चेअरमन आ. सुभाष देशमुख, व्हाईस चेअरमन प्रदीप नागणे, संचालक प्रा. देवानंद चिलवंत, सतिश लामकाने, प्रल्हाद कांबळे, अशोक सापटणेकर, जॉन चोप्रा, विजय कुलकर्णी, सिद्धार्थ सर्जे, प्रा. नरेंद्र काटीकर, जितेंद्र नाईक-लाड, अनंता चव्हाण, अभिजीत टाकळीकर, निलेश पटेल, शीतल कोकाटे, उज्वला चेळेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी व मराठा समाजातील नवउद्योजक, सभासद उपस्थित राहणार आहेत.

> “ इतरांच्या विकासात आपलाही वाटा असावा, या भावनेतून नेहमीच काम करत आलो आहे. याला केंद्र, राज्य शासनही विविध योजनांच्या माध्यमातून मदत करत आहे. आता अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून नवउद्योजक घडविण्यासाठी चांगलीच चालना मिळाली आहे. दोन वर्षात १२५ कोटींचे कर्ज देण्यात आले आहे. येत्या दोन वर्षात १० हजार मराठा उद्योजक घडविण्याचे ध्येय आहे. इतरांसाठीही अनेक योजना आहेत. त्यातूनही लाभ देण्यात येत आहे.
>
> **-आ. सुभाष देशमुख, चेअरमन, लोकमंगल बँक**

# गॅझेटचा आधार न घेता मराठा समाजाला ओबीसीतूनच घटनात्मक आरक्षण द्या



### मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक सुनील नागणे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० सप्टेंबर-**

राज्य सरकारने केवळ गॅझेटचा आधार न घेता मराठा म्हणून सरसकट ओबीसीमधूनच आरक्षण द्यावे. अन्यथा राज्यभरातील मराठा समाज पुन्हा रस्त्यावर उतरुन सरकारच्या विरोधात आंदोलन करेल, असा इशारा मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक सुनिल नागणे यांनी शुक्रवारी माध्यमांशी बोलताना दिला आहे.

राज्य सरकार मराठा समाजाच्या भावनेशी खेळ खेळत आहे. मराठा समाज हा कुणबी असल्याचे पुराव्यानिशी सिध्द झाले आहे. तरीही सरकार आरक्षण देण्यास टाळाटाळ करत आहे. पळवाट म्हणून सरकार आता सातारा, हैद्राबाद आणि बॉम्बे गॅझेटचा आधार घेऊन (तात्पुरती मलमपट्टी करून) आरक्षण देण्याची खेळी करत आहे. यातून सर्वच मराठा समाजाला कुणबी म्हणून आरक्षण मिळेल याची खात्री नाही. गॅझेटचा आधार घेतल्यास मुळे मराठा समाज आरक्षणापासून वंचित राहू शकतो, अशी भितीही त्यांनी व्यक्त केली आहे.

श्री. नागणे म्हणाले की, हैद्राबाद, सातारा आणि बॅम्बे गॅझेटमध्ये मराठा-कुणबी नोंदी असलेल्यांना ओबीसीचे आरक्षण मिळू शकते. परंतु गॅझेटमध्ये केवळ मराठा अशी नोंद असलेल्या समाजातील लोकांचे काय असा प्रश्न ही त्यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे गॅझेटचा आधार घेऊन आरक्षण देणे योग्य होणार नाही. त्यामुळे सरकारने सरसकट मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण द्यावे. सरसकट आरक्षण लागू केले तर चांद्यापासून बांद्यापर्यंत विखुरलेल्या मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. म्हणजेच दोन्हीं घरचा पाहुणा उपाशी पोटी कायमस्वरूपी राहील असे उदाहरण देत सरकार व विरोधी पक्षानी जाणूनबुजून ठेवले, असा आरोप ही सर्व राजकिय पक्षांच्यावर ठेवत सरकारने आमच्या मागणीची गांभीर्याने दखल घेवून विधानसभा निवडणुकीपूर्वी मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवावा, अन्यथा सरकारच्या विरोधात मराठा समाज पेटून उठल्या शिवाय राहणार नाही. त्याची सुरवात धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातून केली जाईल असा इशाराही नागणे यांनी दिला आहे.

# जरांगे-पाटील यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा

### मराठा क्रांती मोर्चा देणार सोलापुरात मुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, २० सप्टेंबर-**

लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री सोलापूरला येणार आहेत. यावेळी मराठा क्रांती मोर्चा सोलापूरच्या वतीने मुख्यमंत्र्यांना जरांगे - पाटील यांच्या मागण्यांसंदर्भात तातडीने निर्णय घ्यावा याबाबतचे निवेदन देण्यात येईल, अशी माहिती मराठा क्रांती मोर्चाचे अमोल शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जरांगे - पाटील हे काही दिवसापासून उपोषण करत असून त्यांची प्रकृती ढासळत आहे. शासनाने त्यांच्या या आंदोलनाची तात्काळ दखल घ्यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. यापूर्वीही महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी सर्वसमावेशक असं काम केले आहे. लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिला भगिनींच्या भेटीसाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री सोलापूरला येत असताना त्यांना सोलापुरात पाय ठेवून दिला जाणार नाही अशी वल्गना माऊली पवार आणि त्यांच्यासोबत असलेल्या काही महाविकास आघाडीच्या स्थानिक युवकांनी केली आहे. ही कृती समर्थनीय नाही. महाआघाडीचा अजेंडा मराठा समाजाचे काही कार्यकर्ते काँग्रेस पुढाऱ्यांच्या पाठिंब्याने राबवत आहेत, असा आरोप अमोल शिंदे यांनी केला आहे.

महिलांच्या कार्यक्रमासाठी येत असलेल्या कार्यक्रमास मुख्यमंत्र्यांना कोणी अडवण्याची भाषा करत असेल तर महिला भगिनी हे सहन करणार नाहीत. माऊली पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना अडवूनच दाखववावे. ते गर्दीत कधी गेले नाहीत. गर्दीची त्यांना कल्पना नाही. महिलाच त्यांना उत्तर देतील. आम्ही कार्यकर्तेही सज्ज आहोत, असे आवाहन अमोल शिंदे यांनी केले आहे. भाजपच्या आजी-माजी पालकमंत्र्यांकडून काम करून घेणं या उद्योगासाठी ही स्टंटबाजी सुरू असते. जरांगे - पाटील यांचे नाव घेऊन काही जणांची दुकानदारी सुरू आहे, असा आरोपही यावेळी करण्यात आला. दरम्यान, जरांगे-पाटील यांचे उपोषण सुरू आहे. हे उपोषण लांबणीवर जाणे योग्य नाही. यामुळे मुख्यमंत्री यांनी लवकरात लवकर हा प्रश्न सोडवावा या मागणीचे निवेदन सोलापुरात मुख्यमंत्र्यांना आम्ही देणार आहोत, असेही यावेळी दास शेळके यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस दिलीप कोल्हे, अनंत जाधव , शशी थोरात आदी उपस्थित होते.

### त्यांनी मुख्यमंत्र्यांना अडवूनच दाखवावे : अमोल शिंदे



माऊली पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना अडवूनच दाखवावे. ते गर्दीत कधी गेले नाहीत. गर्दीची त्यांना कल्पना नाही. महिलाच त्यांना उत्तर देतील. आम्ही कार्यकर्ते ही सज्ज आहोत. घोषणा करायच्या आणि अटक करून घ्यायची असा या मागचा प्रसिद्धी स्टंट करण्याचा हेतू आहे. पोलिसांनी संबंधितांना ताब्यात घेऊ नये. मोकळे ठेवावे. जेणेकरून दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल,असे आवाहन अमोल शिंदे यांनी केले आहे.

# रोटरी क्लब ऑफ सोलापूरतर्फे उद्या स्वामी गोविंददेव देव गिरी यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, २० सप्टेंबर-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या तर्फे कुलगुरु व रोटरीचे प्रांतपाल दिवंगत के. भोगिशयाना यांच्या स्मरणार्थ या वर्षी अयोध्या येथील श्री राम मंदिरचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव देव गिरीजी यांचे रविवार दि. २२ सप्टेंबर रोजी सकाळी. ९.३० वाजता शिवस्मारक सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष रोटेरियन सीए सुनिल माहेश्वरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मॅनेजमेंट लेसन्स फ्रॉम छत्रपती शिवाजी महाराज या विषयावर इंग्रजीतून ते व्याख्यान देणार आहेत. रोटरी क्लब ऑफ सोलापूर तर्फे के भोगिशयाना यांच्या स्मरणार्थ गेल्या २० वर्षांपासून विविध विषयांवर तज्ञ व्यक्तींची इंग्रजी मध्ये व्याख्याने आयोजित करण्यात येत आहेत. आतापर्यंत अनेक नामवंत वक्त्यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असून सोलापूरकरांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुनिल माहेश्वरी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सचिव ब्रिजकुमार गोयदानी, सीए राजगोपाल मिणियार, खजिनदार मितेश पंचमीया, कालिदास जाजू, संदीप झवेरी, निलेश फोफलिया आदी उपस्थित होते.






## ज्ञानामृत आनंदलहरी - ८९१

**तुका म्हणे देह दिला एकसरें ।**
**जयासि दुसरे नाहीं मग ।।**

देहावर अतोनात प्रेम करण्यामुळे माणूस खऱ्या अर्थाने एकमेकांपासून दूर होत असतो. कारण त्याचे हे प्रेम त्याला पुन्हा-पुन्हा मीची आठवण देते. माणसाकडे असणारा हा मी एकट्याने कधीच राहत नाही. तो सातत्याने ईर्षा, मोह, द्वेष, माया, अहंकार, काम, क्रोध आदिला जागे करत असतो. त्याचे असे करणे म्हणजेच माणसाने स्वत:ला कळत न कळत इतरांपासून वेगळे करणे होय. देहावर प्रेम करू नये असे नसले तरीही देहाच्या प्रेमात इतके अडकू नये की ज्यामुळे मी म्हणजे सर्वस्व होऊ नये. मी चा सर्वस्वपणा हीच मानवाची खरी हार असल्याने या मीतून बाहेर पडायलाच हवे. सर्व जीवमात्रात एका ईश्वराला पाहण्यासाठी म्हणजेच समता, बंधूता, नि:स्वार्थ प्रेम आदिच्या निर्मितीसाठी देहापासूनच्या वेगळेपणाच्या अस्तित्वाची जाणीव झाली पाहिजे. देह म्हणजेच मी असे होऊ नये म्हणून समत्व, बंधुत्व, नि:स्वार्थ प्रेमासाठी आपण हा देहच अर्पण केला आहे.त्यामुळे आपणाला जगतात आता कसलेही व्दैत दिसत नाही. सर्व जीवाच्या ठिकाणी केवळ समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम दिसते. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**तुका म्हणे देह दिला एकसरें ।**
**जयासि दुसरे नाही मग ।।**

या देहावर अतोनात प्रेम करणारा किंवा देहाला मी समजून मीचे अस्तित्व जोपासणारा व्यक्ती कोणाचाही नसतो. खरे म्हणजे इतरांचे तर सोडाच पण तो खऱ्या अर्थाने त्याचा स्वत:चाही नसतो. मला चांगले आठवते, मी जालन्याला असतांना केरोसिनच्या एका प्रकारात सुनावणी आटोपून मुंबईहून जालन्याला रेल्वेने परत येत होतो. मी ज्या डब्यात बसलो होतो त्याच डब्यात एका विभागाचे एक अधिकारी पत्नी, मुलं अनेक बॅगासह चढले. हे महाशय सारखे अधिकार वाणीने काहीतरी बडबडत होते. त्यांच्या पत्नीने चटकन जागेवर अंथरून टाकून पांघरून घेतले. हे महाशय मात्र सुमारे दोन तास बॅगा, मुले खालून वर, वरुन खाली करत होते. अधुन-मधून आम्हा दोन-तीन प्रवाशांनाही खाली झोपा, वर झोपा, आम्ही कोण आहोत माहिती नाही का? वगैरे वगैरे बडबडत होते. त्यांच्या बडबडण्यातून ते कोण आहेत, हे आम्हाला स्पष्ट कळत होते. तरी पण साहेब आपण कोण आहात? असे आम्ही त्यांना विचारावे असे त्यांना वाटत होते. रात्रभर प्रवासात व रेल्वेतून उतरेपर्यंत त्यांच्या वर्तनात विशेष बदल जाणवला नाही. त्यांची पत्नी शांत झोपून राहिली आणि हे केवळ मीमुळे रात्रंभर जागे राहिले. यांच्या पत्नीने यांना ओळखले पण हे स्वत:ला ओळखू शकले नाहीत हे यांचे दुर्दैव. असे दुर्दैववान भरपूर लोक समाजात आहेत. रात्रंदिन मी मध्ये जगणारे हे लोक खऱ्या मी बाबत सदैव झोपलेले असतात.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | संकष्टी चतुर्थी |
| दि. २१ सप्टेंबर २०२४ | चंद्रोदय रात्री ८.५८ |
| विक्रम संवत् २०८०, | चांगला दिवस. |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. चतुर्थी (१८.१४) | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र- भरणी (२४.३५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्याघात (११.३५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (०७.४०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| दिनविशेष - | |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. आत्म विश्वासाने संकटाला सामोरे गेल्याने जीवनातील संकट टळेल.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. जिवनात यश मिळेल. आज आनंदी दिवस जाईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील.आर्थिक आवक वाढेल.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. मुलांना आनंद मिळेल. खर्चाचे योग आहेत.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. जीवनात नवीन संधी मिळाल्याने यश प्राप्त होईल.

# महागाईच्या आगीत खाद्य तेलाचा भडका

## आयात शुल्क वाढल्याने खाद्य तेलांच्या दरात २० टक्के वाढ

### सणासुदीच्या तोंडावर सर्व सामान्य नागरिकांचे बजेट कोलमडले

**तभा वृत्तसेवा। यशवंत गुरव**
**सोलापूर दि. २० सप्टेंबर-**

एकीकडे अन्न, धान्य आणि भाजीपाल्यांचे दर वाढत असताना, आता खाद्यतेलाचे ही दर वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांचे बजेट कोलमडले आहे. केंद्रसरकारने खाद्यतेलाच्या आयातीवर शुल्क आकारण्याचा निर्णय घेतल्यानंतर खाद्यतेलाचे भाव चांगलेच वाढले आहेत.

सरकारने विविध खाद्यतेलांवरील शुल्क २० टक्क्यानी वाढवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे खाद्य तेलांच्या दरामध्ये सुमारे २० टक्के वाढ झालेली आहे. ऐन सणासुदीच्या काळामध्ये तेलांच्या दरामध्ये वाढ झाल्याने सर्व सामान्य नागरिकांचे हाल बेहाल झालेले आहेत.

खाद्य तेलांचे भाव वाढविण्यासाठी सरकारने शनिवारपासून खाद्यतेल आयात शुल्कात २० टक्क्यांनी वाढ केली. याचा परिणाम बाजारावर दिसून येत आहे. खाद्यतेलाच्या १५ लिटर डब्याच्या दरात अडीचशे रुपयांची वाढ झाली आहे. सुप्रीम तेलाच्या बॉक्सची किंमत पूर्वी १ हजार रु. एवढी होती, ती आता सुमारे १३०० रू. इतकी झाली आहे. तर एका लिटर मागे सुमारे ३० रुपयांपर्यंत वाढ झाली आहे.

#### भविष्यात आणखीन वाढ होण्याची शक्यता

केंद्र सरकारने खाद्य तेलांच्या आयात शुल्कमध्ये २० टक्के वाढ केल्याने खाद्य तेलांच्या दरात चांगलीच वाढ झाली आहे. एका रात्रीत हे दर वाढल्याने ग्राहकांना सांभाळने जिकरीचे जात आहे. ऐन सणासुदीच्या काळात शुल्क वाढल्याने भविष्यात दर आणखीन वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. - विजय परदेशी , तेल विक्रेते चौपाड.



#### खाद्यतेलांचे दर किती वाढले?

**सरकी तेल** : आता १३४ रू किलो /पूर्वी ११० रू किलो, **सूर्यफूल तेल** : आता १३८ रू.किलो/पूर्वी १२० रू किलो, **सोयाबीन तेल** : आता १३४ रू.किलो / पूर्वी ११० रू किलो, **शेंगा तेल**: आता १६० रू.किलो/पूर्वी १५० रू किलो.

#### सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले

केंद्र सरकारने खाद्य तेलांच्या आयात शुल्क आकारणीत एकदम वाढ केली आहे. ऐन सणासुदीच्या तोंडावर ही दरवाढ केल्याने सर्व सामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. सरकारने सणात अचानक वाढ करणे चुकीचे आहे. सरकारने अन्न, धान्य आणि तेलांचे दर किमान ठेवावेत. हीच सर्व सामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

**- संजय पाटील, ग्राहक**

# शहर उत्तरसाठी नक्की प्रयत्न करु या

## नाना पटोलेंचे सुदीप चाकोते यांना आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

'निवडणुका जाहीर व्हायला थोडेच दिवस उरले आहेत. इकडचे दौरे करत बसण्याऐवजी तुमचा मजबूत असलेला मतदारसंघ आणखी बळकट करा! आपण नक्कीच या मतदारसंघासाठी आग्रह धरू, अशा उत्तेजनात्मक शब्दात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोलापूरचे तरूण, तडफदार नेतृत्व सुदीप चाकोते यांना सांगितले आहे.



गेले अनेक दिवस सोलापूर उत्तरमध्ये नक्की उमेदवारी कोणाला याबद्दल उलटसुलट चर्चा सुरू आहेत. सगळ्यांनीच जोर लावायला सुरुवात केली आहे. अशा स्थितीमध्ये सुदीप चाकोते यांनी दिल्ली येथे भाजपा नेत्यांनी राहुल गांधींविरुद्ध केलेल्या वक्तव्यांचा निषेध करण्यासाठी नवी दिल्लीतील आंदोलनात प्रत्यक्ष सहभाग नोंदवला होता. मुंबईत आल्यावर त्यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची भेट घेतली. पटोलेंना त्यांनी सोलापूर उत्तर मतदारसंघाची माहिती दिली. सुरुवातीपासूनच काँग्रेसचा बालेकिल्ला असलेला हा मतदारसंघ पुन्हा काँग्रेसलाच मिळावा, अशी कार्यकर्त्यांची तीव्र इच्छा आहे. त्यामुळे सोलापूर उत्तरची जागा मविआच्या वाटपात काँग्रेससाठी मागण्याची कार्यकर्त्यांची आग्रही मागणी असल्याचेही त्यांनी पटोल यांना सांगितले. चाकोते यांनी स्वत:चा कार्य अहवालही सुपूर्द केला. तो पाहिल्यानंतर पटोलेंनी उत्तरसाठी नक्कीच प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# वालचंद महाविद्यालयात पर्युषण पर्व व्याख्यानमालेद्वारे विद्यार्थी जागरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

वालचंद कला व शास्त्र कनिष्ठ महाविद्यालयात पर्युषण पर्व व्याख्यानमाला उपक्रम मान्यवर वक्त्यांच्या उपस्थितीत, विद्यार्थ्यांच्या उत्साह पूर्ण सहभागाने संपन्न झाला.

उत्तम क्षमा, मार्दव, आ र्जव, शौच, सत्य संयम, तप, त्याग अकिंचन्य, ब्रह्मचर्य,- या पर्युषण पर्वाच्या/दशलक्षण धर्माच्या १० पैलूंची माहिती तसेच अहिंसा अनेकांत व शाकाहार जीवन पद्धती या विविध तत्वांबद्दल सखोल माहिती विद्यार्थ्यांना वक्त्यांकडून मिळाली. मान्यवर वक्त्यांमध्ये डॉ. सरिता कोठाडिया, धर्मानुरागी सुभाष शास्त्री, अरुण धुमाळ डॉ. महावीर शास्त्री, अरुण धुमाळ सर, सौ. स्वाती शहा, अजित देवसाळे यांनी विद्यार्थ्यांना दशधर्माच्या प्रत्येक पैलूंवर उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

याप्रसंगी, आयोजित वक्तृत्व स्पर्धेत कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. या पर्युषण पर्व व्याख्यानमालेच्या संयोजनासाठी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या मार्गदर्शनाखाली, उप प्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, स्पर्धा समन्वयक रवींद्र काळे, संदेश बोराळकर यांच्या कुशल संयोजनामध्ये पर्युषण पर्व व्याख्यानमाला उत्साहात संपन्न झाली. वक्तृत्व स्पर्धेसाठी 'परीक्षक' म्हणून वैशाली गांधी, धनंजय शहा, शेखर साळुंखे, चंद्रशेखर कस्तुरे डॉ. माधुरी शास्त्री, मंजुषा जैन, हर्षदा छेडा, विजया तडकल, सौ. वाडकर, राजश्री शिंदे, शंकर लिंग जनगोंड, निलेश भिडे, मंजुनाथ किरणगी, चेतन तुपकर यांनी काम पाहिले.

# प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत घरकुल पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांचा महापालिका उपायुक्त आशिष लोकरे आणि नगर अभियंता सारिका आकुलवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत सोलापूर महानगरपालिका सोलापूर मार्फत सदर आवास योजनेची अंमलबजावणी केली जाते.

मंजूर झालेल्या २८७ लाभार्थ्यांपैकी ज्या लाभार्थ्यांचे घरकुलाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे त्या लाभार्थ्यांना गृहप्रवेश करण्यासाठी केंद्र शासनाने सर्व अंमलबजावणी यंत्रणांना गृहप्रवेश कार्यक्रम आयोजित करण्यास कळविले होते.

त्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकुलवार यांच्या हस्ते घरकुल पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रधानमंत्री शहर तांत्रिक कक्षाचे एम. आय. एस. तज्ञ नागनाथ पद्मगोंडे, समाज विकास तज्ञ सिद्धाराम मेंडगुदले, नगर रचना तज्ञ पूजा भूतनाळे, स्थापत्य अभियंता प्रशांत गुंड आदी उपस्थित होते.

# सोलापुरात २६, २७ सप्टेंबर रोजी वसुंधरा संमेलन

## माझी वसुंधरा अभियान अंतर्गत तज्ञांचे मार्गदर्शन, रोपवाटिकांचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

सोलापूर महापालिका माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पहिले वसुंधरा संमेलन सोलापुरात आयोजित करण्यात आले आहे. दि.२६ आणि २७ सप्टेंबर असे दोन दिवस हुतात्मा स्मृती मंदिर आणि सोलापूर महापालिका परिसरात हे वसुंधरा संमेलन होणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.

वसुंधरा संमेलनाच्या निमित्ताने दि. २६ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत वृक्षदिंडी निघणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून वृक्ष दिंडीला सुरुवात होईल. सिद्धेश्वर मंदिर मार्गे ज्ञान प्रबोधिनी शाळा, डफरीन चौक आणि महापालिका परिसर असा वृक्षदिंडीचा मार्ग राहणार आहे. विविध शाळा, महाविद्यालयांमधील विद्यार्थी या वृक्षदिंडीत सहभागी होणार आहेत.

महापालिका इंद्रभवन परिसरात रोपवाटिकांचे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. वृक्षदिंडीनंतर या प्रदर्शनाचे उद्घाटन होईल. शुक्रवार दि. २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात वसुंधरा संमेलनाचे उद्घाटन सत्र होईल. ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक बी. एस. कुलकर्णी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.



संमेलनाच्या पहिल्या सत्रात सकाळी ११ ते १२ यावेळेत ज्येष्ठ सर्पतज्ञ निलीमकुमार खैरे हे सापांविषयीच्या रंजक गोष्टी आपल्या सादरीकरण आणि मार्गदर्शनातून सांगणार आहे. जुन्नर वन विभागातील वनरक्षक, पर्यावरण अभ्यासक रमेश खरमाळे हे पर्यावरण संवर्धनातील माझा सहभाग या विषयावर दुपारी १२ ते १ यावेळेत सादरीकरण आणि मार्गदर्शन करतील.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात दुपारी १:३० ते २:३० या वेळेत ज्येष्ठ सर्पतज्ञ, पर्यावरण अभ्यासक निलीमकुमार खैरे हे कचरा पुनर्वापर या विषयावर सादरीकरण आणि मार्गदर्शन करतील. जल अभ्यासक रजनीश जोशी हे जनजागृती या विषयावर दुपारी २:३० ते ३ यावेळेत मार्गदर्शन करणार आहेत.

संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात दुपारी ३ ते ३:३० या वेळेत पुण्याच्या मिशन शुन्य कचरा अभियानाच्या प्रमुख अर्चना मोरे या मिशन शून्य कचरा या विषयावर सादरीकरण आणि मार्गदर्शन करतील. त्यानंतर दुपारी ३:३० ते ४ वाजता गार्गी गिध (ग्रीन फाउंडेशन, मुंबई) या विघटनशील प्लास्टिक विषयी मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर ४ ते ५:३० या वेळेत सोलापूर शहरातील पर्यावरणप्रेमी संस्था पर्यावरण संवर्धनातील सहभाग या विषयावर सादरीकरण करणार आहेत.

समारोपाच्या सत्रात माझी वसुंधरा अभियान अंतर्गत सोलापूर शहरात पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने उपक्रम राबवणाऱ्या पर्यावरणप्रेमी संस्थांचा सन्मान करण्यात येणार आहे. सोलापूर महापालिका आयुक्त शीतल तेली- उगले यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागाचे उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, स्वप्निल सोलनकर, उद्यान अधीक्षक जगदाळे तसेच सोलापूर शहरातील सर्व पर्यावरण प्रेमी संस्था वसुंधरा संमेलन यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

राज्यामध्ये प्रशासन स्तरावर पहिलेच पर्यावरण संवर्धना विषयीचे संमेलन होत असुन पर्यावरण संवर्धना विषयीचे संमेलन होत असुन शहरातील सर्व पर्यावरणप्रेमिनी सदर संमेलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी केले आहे.

# चार लाखांच्या ऊस, केळीची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

आडेगाव (ता. माढा) येथील शेतातून ३ लाख ८० हजार रुपये किंमतीची केळीची व ऊसाची चोरी करण्यात आल्याप्रकरणी सहाजणांविरुध्द टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बिरूदेव सावता खरात-पाटील यांनी दिलेल्या फियादीवरुन बापू भगवान खरात, दादा बापू खरात, बंकट भानुदास जवळगे, ज्योतीराम नारायण चोपडे, बापू नारायण चोपडे, नारायण देऊ चोपडे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २४ नोव्हेंबर २०२३ ते २६ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत घडली आहे. सहायक फौजदार हजारे पुढील तपास करीत आहेत.

# माचणूर येथे सीईओ जंगम यांनी स्वतः उचलला प्लास्टिकचा कचरा

- जिल्ह्यात आज ११ तालुक्यातील १०१९ ग्रामपंचायतीमध्ये महास्वच्छता
- स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेल्या ग्रामस्थांना सिईओ जंगम यांनी दिली स्वच्छतेची शपथ
- महास्वच्छता श्रमदान शिबिरात हजारो युवक, ग्रामस्थ सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

सोलापूर जिल्ह्यात महा स्वच्छता श्रमदान शिबिरात हजारो युवक व ग्रामस्थ सहभागी झाले. माचणूर येथे स्वत: सिईओ कुलदीप जंगम यांनी हातात झाडू घेऊन सिध्देश्वर मंदिर परिसराची साफसफाई केली.

सोलापूर जिल्ह्यात आज ११ तालुक्यातील १०१९ ग्रामपंचायती मध्ये स्वच्छता ही सेवा या उपक्रमाअंतर्गत महा स्वच्छता श्रमदान करण्यात आले. 'एक दिवस माझ्या गावा साठी'या शिर्षा खाली हजारो हात श्रमदानासाठी राबले. ऐतिहासिक मंदिराचा परिसर, बस स्थानके व शासकीय इमारती व सार्वजनिक ठिकाणी जिल्ह्यात मोहिम राबविण्यात आली. जिल्हात बचतगटा सह, युवक, विद्यार्थी व ग्रामस्थासह शासकीय कर्मचारी यांनी स्वच्छतेबरोबर व्यापक स्वरूपाची जनजागृती करत पाच लाखा पेक्षा अधिक जिल्हा वासीयांना स्वच्छतेची शपथ दिली.



### माचणूर येथे महास्वच्छता अभियान

सकाळी ८ वाजता सिईओ कुलदिप जंगम हातात हातमोजे घालून स्वच्छता मोहिमेसाठी सरसावले. देवास अर्पण करणे साठी आणलेले नारळाचे केसर व प्लास्टिक स्वत विलगीकरण करीत ग्रामस्थांना कचरा विलगीकरणाचे धडे दिले. प्लास्टिक कचरा विलगीकरण करीत पाच बॅगा प्लास्टिकने भरण्यात सिईओ स्वत स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले नंतर शेकडो लोक स्वयं स्फुर्तीने सहभागी झाले. सोबत प्रशालेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल, जाधव, मंगळवेढा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी योगेश कदम, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, विस्तार अधिकारी नरळे, ग्रामसेवक गोरख जगताप, सरपंच साधना तानाजी डोके, तानाजी डोके, पाणी व स्वच्छता विभागातील सचिन सोनवणे, शंकर बंडगर, प्रशांत दबडे, महादेव शिंदे यांच्यासह ग्रामस्थ विद्यार्थी उपस्थित होते. एक दिवस माझ्या गावा साठी या उपक्रमा अंतर्गत हजारो लोक मोहिमेत सहभागी झालेबद्दल अभिनंदन करीत २ आक्टोबरपर्यंत ही स्वच्छता मोहिम सुरू राहणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक व्यक्ती पर्यंत स्वच्छतेचा संदेश या निमित्ताने गेला आहे. स्वच्छता ही केवळ अभियाना पुरती ठेवू नका त्यात सातत्य राहू द्या. ओला व सुका कचरा चे विलगी करण करा. सुका कचरा देखील विलगीकरण करणे शक्य आहे. त्या साठी. डस्टबीन चा वापर करा. लोकांना एकदा सवय होणे गरजेचे आहे. स्वच्छतेचे सातत्य टिकवून ठेवा असे आवाहन जिल्ही परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम यांनी केले.



#### ग्रामस्थांना सीईओंनी दिली स्वच्छतेची शपथ

माचणूर येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेल्या ग्रामस्थांना सिईओ जंगम यांनी स्वच्छतेची शपथ दिली. उप मुख्य कार्यकारी अमोल जाधव व गटविकास अधिकारी योगेश कदम यांनी मनोगत व्यक्त केले. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी स्वच्छतेच्या शपथेचे वाचन केले. जिल्ह्यात ११ पंचायत समिती अंतर्गत सर्व गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, अंगणवाडी व ग्रामस्थांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

#### हजारो टन कचराचे विलगीकरण..!

जिल्ह्यात स्वच्छता मोहिमे अंतर्गत जमा झालेले कचराचे विलगीकरण करीत प्लास्टिक संकलन केंद्रात प्लास्टिक कचरा व रिकामे पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या जमा करणेत आले आहेत. आबालवृद्धा पासून विद्यार्थी या मोहमेत सहभागी झाले होते. उपमुख्यकार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांच्यासह विभाग प्रमुख यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### समृद्धी यादव हिने विदेशातील डान्स स्पर्धेत पटकाविले रौप्य पदक

**अकलूज, दि. २० सप्टेंबर-**

अखिल भारतीय सांस्कृतिक संघ, युनेस्कोच्या कल्चरल विभाग व भारत सरकारच्या विद्यमाने १३ वे कल्चरल डान्स ऑलिंपॅड पॅरीस, फ्रान्स येथे समृद्धी दत्तात्रय यादव हिने इथेनिक सोलो या डान्स प्रकारांमध्ये दुसरा क्रमांक (सिल्वर मेडल) मिळविला आहे. एबीएसएसच्या चेअरपर्सन रत्ना वाघ, हेमंत वाघ तसेच युनेस्कोच्या कल्चरल कमिटीचे चिप जुडेत व्हॅन झडेन यांच्या हस्ते तिला सिल्वर मेडल देऊन गौरविण्यात आले. तिच्या या यशाबद्दल आ. महेश लांडगे, सारिकाताई पवार, कविता हिंगे, अजय पताडे, पंकज निकम व पिंपरी चिंचवडकरांनी अभिनंदन केले. समृद्धी सध्या पुणे येथे वास्तुशास्त्र विभागात चौथ्या वर्षात शिकत आहे. सन २०१० पासून समृद्धी आतापर्यंत आंतरराष्ट्रीयस्तरावर सहावेळा भाग घेऊन गोल्ड, सिल्वर आणि ब्रॉंझ मेडल जिंकली आहेत. थायलंड, मलेशिया, दुबई, सिंगापूर, मॉरीसिस अशा विविध देशांमध्ये तिने आपली नृत्य कला सादर केली आहे. अखिल भारतीय साहित्य संमेलन, अखिल भारतीय नाट्य संमेलन, पुणे फेस्टिवल, दम दमा दम, इंद्रा या सिनेमांमध्ये विविध ठिकाणी तिने नृत्य कला सादर केली आहे. सन २०१७ मध्ये तिला राष्ट्रीयस्तरावर उत्कृष्ट नृत्यकलाकार म्हणून शरद पवार यांच्या हस्ते गौरवण्यात आले आहे. आत्तापर्यंत समृद्धीने २०० पेक्षा जास्त ट्रॉफी, मेडल व सर्टिफिकेट मिळवली आहेत. समृद्धीचे वडील दत्तात्रय यादव हे मूळचे बिजवडी अकलूजचे रहिवासी असून तिच्या या यशामध्ये तिचे आई-वडील यांचे योगदान आहे.



### पिलीव येथे रौप्यपदक विजेते सचिन खिलारी यांचा सत्कार

**पिलीव दि २० सप्टेंबर -**

सांगली जिल्ह्यातील करगणीचे सुपुत्र सचिन सर्जेराव खिलारी यांनी ऑलम्पिकमध्ये गोळाफेक प्रकारात रौप्य पदकाला गवसणी घातल्याने त्याचा याबद्दल पिलीव ग्रामस्थांच्या वीतेने सत्कार करणयात आला. प्रारंभी त्याची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी नारायण करांडे, माजी जि. प. सदस्य गणेश पाटील, मोहन करांडे, माजी पंचायत समिती सदस्य शहाजी महाडीक, अविनाश जेऊरकर, उत्तम करांडे, दत्तात्रय करांडे, सुहास करांडे, प्रदीप करांडे, सूरज करांडे, दिलीप करांडे, मधुकर करांडे, सचिन करांडे, सुहास करांडे, पिंटू करांडे, दत्तूसिंग भैस, राहुल खलिपे, डॉ. करांडे, सचिन करांडे, राजेंद्र करांडे, मोहसीन शेख, तानाजी लोखंडे, भैय्या जामदार, चिकू जहागिरदार, दामोदर लोखंडे, अतुल नष्टे, संजय पाटील, प्रमोद भैस, संजय आर्वे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



### परिश्रम घेऊन उद्याचे सक्षम नागरिक व्हा : इनामदार

**सांगोला, दि. २० सप्टेंबर-**

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात भरपूर परिश्रम घेऊन उद्याचे सक्षम नागरिक तयार व्हावेत असे प्रतिपादन सांगोला केंद्राचे केंद्रप्रमुख अस्लम इनामदार यांनी केले. वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालयाच्या ३८ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. प्रतिमेचे पूजन उद्योगपती गिरीश नष्टे, संस्थाध्यक्षा कौशल्यादेवी शिंदे, मुख्याध्यापक रमेश पवार, विलासराव पाटील, नीलकंठ शिंदे, सजाबई पवार, विठ्ठलपंत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. वर्धापन दिनानिमित्त गिरीश नष्टे, विलास पाटील, सुवर्णा इंगवले यांनी मनोगत व्यक्त करून संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. सूत्रसंचालन संतोष कुंभार यांनी केले.

### सुरेश पालवे-पाटील यांच्या फंडातून तांबेवाडी-शिंदेवस्ती रस्ता पूर्ण

**नातेपुते, दि. २० सप्टेंबर-**



माळशिरस तालुक्यातील तांबेवाडी गावातून शिंदेवस्ती आणि ओढ्याच्या पलीकडे जाणारा रस्ता अखेर थोडा का होईना पूर्ण झाला. खूप दशकापासून ओढ्यापलीकडे आणि शेतात जायचं म्हणलं की रस्त्याची अडचण होती. पाऊस आला की येथील लोकांना सदर रस्त्याने जाणे महाकठीण होते. या रस्त्याची अडचणी लक्षात घेऊन सरपंच धनाजी बोडरे, राजेंद्र भोईटे, राजू भाऊ तांबे, तुषार भोईटे, माजी पोलीस पाटील लालासो पवार, ग्रामसेवक सागर गोरे, पोलीस पाटील, चागदेव देवकर, सोनबा जाधव, सुरेश शेलार आदी तांबेवाडीचे ग्रामस्थ, राष्ट्रवादी जिल्हा नियोजन समिती, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश पालवे-पाटील यांना रस्त्याबाबतच्या अडचणी सांगितल्यानंतर पालवे-पाटील यांनी या रस्त्याला मंजुरी दिली. खूप अडचणीचा सामना करून हे काम पूर्ण करून घेतले. अजून थोडा पुढे रस्ता होणे बाकी आहे.

# धनगर आरक्षणासाठी आ. पडळकरांनी थोपटले दंड

## सोमवारी राज्यभरात रस्ता रोको करणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० सप्टेंबर-**



राज्यात धनगर आरक्षणाचा वाद चांगलाच पेटला आहे. धनगर समाजाला आदिवासींच्या आरक्षणातून आरक्षण हवं आहे. मात्र, त्याला आदिवासी नेत्यांनी विरोध केला आहे. त्यामुळे दोन्ही समाज आमनेसामने आले आहेत. दोन्ही समाजाने आता सरकारवर दबाव वाढवण्याचं काम सुरू केलं आहे. उपोषणे सुरू आहेत. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आरक्षणाचा वाद पेटल्याने सरकारची चांगलीच कोंडी झाली आहे. त्यातच आता धनगर समाजाचे नेते आमदार गोपीचंद पडळकर यांनी आरक्षणासाठी दंड थोपटले आहेत. पडळकर यांनी थेट सोमवारी राज्यव्यापी रस्ता रोको करण्याचं जाहीर केलं आहे. त्यामुळे आरक्षणाचा मुद्दा अधिकच तापण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आमदार गोपीचंद पडळकर यांनी पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली. आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण देण्याची आमची मागणी आहे. काही आमदार आणि नेते सातत्याने आरक्षणाच्या विरोधात बोलत आहेत. आंदोलन करत आहेत. मुंबईला येणारं पाणी अडवण्याची भूमिका आता त्यांनी घेतली आहे. त्यामुळे आताच ताकद दाखवण्याची वेळ आली आहे. राजकिय हेतूने प्रेरित होऊन जर कुणी राजकारण करत असेल तर अभी नही तो कभी नहीं, असा इशारा देतानाच राज्यात सोमवारी सकाळी ११ वाजता मोठा रास्ता रोको करा, असं आवाहनच गोपीचंद पडळकर यांनी केलं आहे.




### पंढरपूर, लातूरमध्ये उपोषण

उपवर्गीकरण करण्यास मान्यता दिली पण सरकार वेळ काढू पण करत असेल तर ही गंभीर बाब आहे. जीआरबाबत सरकारने भूमिका घेतली पाहिजे, असं सांगतानाच पंढरपूर आणि लातूरमध्ये आमची उपोषणं सुरू आहेत. आता आम्ही सोमवारी रास्ता रोको करणार आ-होत. शांततेच्या मार्गानेच रास्ता रोको करणार आहोत, असं गोपीचंद पडळकर म्हणाले.

### आधी म्हणायचे 'र'चं 'ड' झालंय

आधी म्हणायचे की र चं ड झालंय. पण आता आरक्षण देण्यास विलंब लागतोय. राज्य सरकारने एफिडेव्हिट दिलंय की धनगड हे राज्यात अस्तित्वात नाहीत. खिलारे या धनगर समाजाच्या पाच जणांना धनगड सर्टिफिकेट मिळालं हे दुर्दैव, असंही ते म्हणाले.

### जीआर काढा

आम्ही एसटी प्रवर्गाचे दाखले द्या अशी मागणी केली होती. हायकोर्टात ही लढाई ताकदीने लढली गेली. धनगर जमातीच्या लोकांना धनगडचे दाखले काढले म्हणून याचिका रद्द झाली. आता सरकारने जीआर काढावा, एसटीचा दाखला द्यावा, ६ महिन्यापासून उपोषण, आंदोलन सुरू आहे. काल समितीची, रविवारी मुख्यमंत्री आणि आजही बैठक झाली. सगळी कागदपत्रं दिली आहेत, अशी माहिती आ. पडळकर यांनी दिली.



## सरकारने मराठा समाजाला न्याय द्यावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० सप्टेंबर-**

मराठा समाजासाठी लढणारे मनोज जरांगे-पाटील यांची प्रकृती खालावत आहे. महाराष्ट्रातील तमाम मराठा समाज बांधवांच्या भावना जोडल्या गेल्यामुळे आता तरी सरकारने त्यांच्या उपोषणाची तात्काळ दखल घेऊन समाजाला न्याय द्यावा, असे आवाहन विठ्ठल सह साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले.

अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण सुरू केले आहे. त्या ठिकाणी भेट दिल्यावर ते बोलत होते. यावेळी औदुंबर महाडिक-देशमुख, आबासाहेब साठे, ऋषिकेश तांबिले, वाय.

### अंतरवाली सराटीत अभिजीत पाटलांची जरांगे-पाटलांच्या उपोषणाला भेट

जी. भोसले, रणजित भोसले, जनक भोसले, पंकज लामकाने, अनिल यादव, कुलदीप कोलगे, शहाजी मुळे, दादासाहेब शिंदे, दिंगबर खडके, दादा पाटील, राज लोंढे, सचिन पाटील, महेश खटके, अतुल गायकवाड, सुनिल भोसले, कालिदास साळुंखे, सरपंच सोमानाथ झांबरे, विकास पाटील, नवनाथ नाईकनवरे, गोपाळ पाटील यासह आदी उपस्थित होते. महाराष्ट्रातील तमाम मराठा समाज बांधवांच्या भावना जोडल्या गेल्यामुळे सरकारने उपोषणाची तात्काळ दखल घेऊन मागण्या मान्य कराव्यात, ही मागणी पाटील यांनी केली आहे.

## प्रा. सचिन धेंडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएचडी प्रदान

**करमाळा, दि. २० सप्टेंबर-**



शेटफळ (ता. करमाळा) येथील रहिवासी व श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. सचिन अशोक धेंडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त झाली आहे. त्यांना प्रा. डॉ. किसन मारुती अंबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही पदवी मिळाली असून त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील दलित चळवळ आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अभ्यास (इ.स.१९९० ते इ.स.२०११) अशा विषयावर संशोधन करून शोधप्रबंध सादर केला होता. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी अभिनंदन केले. अनुराधा नागवडे, प्राचार्य सचिनराव लगडे, प्राचार्य प्रा. डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, माजी प्राचार्य डॉ. बी. एन. झावरे, प्रा. डॉ. बाळासाहेब सागडे, प्रा.डॉ. किसन मारुती अंबाडे यांनी अभिनंदन केले.

## विधानसभेची मतमोजणी माढ्यात न झाल्यास आंदोलनाचा इशारा

### सर्वस्तरातून आश्चर्य; तहसीलदारांना माढा शहर प्रशासकीय कार्यालय बचाव समितीचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २० सप्टेंबर-**



माढा विधानसभा मतदारसंघाची कुर्डूवाडी येथे होत असलेली मतमोजणी माढा शहरात व्हावी यासाठी माढा शहर प्रशासकीय कार्यालय बचाव समितीकडून माढा तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे.

स्वातंत्र्यनंतरच्या काळापासून आजपर्यंतच्या सार्वत्रिक निवडणुकीचे संपूर्ण कामकाज हे माढा येथे शासकीय गोदामात पार पडलेले आहे. सार्वत्रिक निवडणूक सन २०१९ चे लोकसभेची संपूर्ण मतदान प्रक्रिया ही माढा येथेच पार पडलेली आहे. माढा येथे उपलब्ध असलेल्या जागा व पायाभूत सुविधा या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणे व दाखविणे गरजेचे आहे. मतमोजणी प्रक्रिया व मतमोजणी ठिकाण माढ्यातून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत करणे अयोग्य आहे. या मागे माढा शहर व माढा तालुक्याचे ठिकाणाचे महत्व कमी करणे हा हेतू दिसून येत आहे. मतमोजणी प्रक्रिया माढा शहरातून दुसऱ्या ठिकाणी घेण्यात आली तर माढा शहर प्रशासकीय कार्यालय बचाव समितीच्या वतीने मंगळवारी २४ सप्टेंबर रोजी माढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. २५ सप्टेंबर रोजी तहसील कार्यालय माढा येथे मोर्चा काढण्यात येणार आहे. याचीही दखल न घेतल्यास २६ सप्टेंबर रोजी माढा तहसील कार्यालय आवारात बेमुदत ठिय्या व हालगीनाद आंदोलन करण्यात येणार आहे. यावेळी दादासाहेब साठे, ऋतुराज सावंत, शहाजी साठे, अरविंद खरात, दिनेश जगदाळे, दिनेश गाडेकर, भैय्या खरात, अनिकेत चवरे, मदन मुंगळे, सुधीर लंकेश्वर, कुंदन पवार, महादेव जगदाळे, बाबुल बागवान, स्वप्निल खरात, विकास पवार, आण्णा शिवपुजे, समाधान सुतार, माऊली ठोंबरे यांच्यासह माढा शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अकलूजमध्ये गणरायाला निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २० सप्टेंबर-**



श्री गणपती विसर्जनाच्या दिवशी सकाळपासूनच घरगुती गणपतीचे विसर्जन सुरू झाले होते. सायंकाळी सहा ते रात्री अकरा वाजेपर्यंत विविध मंडळांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये हलगी, लेझीम, ढोल ताशेबरोबरच पारंपारिक खेळ व गुलालाची उधळण करण्यात आली.

श्री विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्टच्या श्री गणेशाचे विसर्जन मिरवणूक कारखाना स्थळावरून नीरा नदीपर्यंत निघाली. मूर्तीचे पूजन कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी केले. उत्साही तरुण सराटी येथे जाऊन गणेशमूर्ती विसर्जन करीत होते. सायंकाळी अकलूज शहर मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळ आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी श्रीच्या मुर्तीची विसर्जनासाठी मिरवणूक काढली.मिरवणुकीत छत्रपती गणेशोत्सव मंडळ गोळीबारचौक, वंदे मातरम गणेशोत्सव मंडळ गणेशनगर, नागराज गणेशोत्सव मंडळ गांधीचौक, महाराणा प्रताप गणेशोत्सव मंडळ प्रतापसिंह चौक, वक्रतुंड गणेशोत्सव मंडळ जुने पोलीस चौकी, सिध्दी विनायक गणेशोत्सव मंडळ शिवापूर पेठ, शिवरत्न गणेशोत्सव मंडळ विजयचौक, बुरजा गणेशो त्सव मंडळ खाटीकगल्ली, नवशक्ती गणेशोत्सव मंडळ दत्तचौक, दि ग्रेट संभाजीराजे गणेशोत्सव मंडळ कासार गल्लीतील नरसिंह गणेशोत्सव मंडळांनी यावर्षी भरावणुकीसाठी आकर्षक फुलांचा रथ सजवला होता व दोन सिंहांच्या प्रतिमा उभारल्या होत्या. रात्री उशिरापर्यंत लहान-मोठे गणपतीचे विसर्जन करण्यात आले. अकलुज नगरपरिषद व मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्यावतीने माजी सरपंच किशोरसिंह माने यांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या श्री मूर्तीसह अध्यक्षांना पुष्पहार घालून स्वागत केले. यावेळी क्रांतीसिंह माने-पाटील, राहुल जगताप, किशोर राऊत, उपमुख्याधिकारी जयसिंह खुळे, कर निरीक्षक राजाराम नरुटे, लेखापाल आदित्य खुपटे, बाळासाहेब वाईकर, सुनील काशिद, आनंद जाधव, रोहित शेटे, विजय कांबळे, आकाश ठोंबरे, सागर बनसोडे उपस्थित होते. अकलुज पोलिस ठाण्याचे पो. नि. भानुदास निंभोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बंदोबस्त ठेवला होता.

## टेंभुर्णीत स्नेहदीप हॉस्पिटलचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २० सप्टेंबर-**



टेंभुर्णी येथे डॉ. स्नेहल कुलदीप पाटील यांच्या स्नेहदीप स्किन हेअर लेझर अँड जनरल क्लिनिकचा शुभारंभ सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. एम. के. इनामदार यांच्या हस्ते करण्यात आला.

डॉ. एम. के. इनामदार म्हणाले की, डॉ. स्नेहल पाटील यांनी त्वचा, कॉस्मेटिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्यामुळे माढ्यासह जिल्ह्यातील रुग्णांना लाभ होणार आहे. डॉ. स्नेहल पाटील यांनी कॉस्मेटिक ट्रीटमेंट संबंधीच्या केमिकल पिलिंग, पीआरपी ट्रीटमेंट, स्किन ब्राईटनिंग, स्किन पॉलिशिंग, मायक्रोनीडलिंग, मेडी फेशियल, त्वचा विकार, आधुनिक आयुर्वेदिक उपचार, मधुमेह, रक्तदाब, थायरॉईड, स्त्री-रोग, वंध्यत्व मार्गदर्शन, संधिवात, मणक्याचे विकार यासह अनेक आजारासंबंधी उपचार उपलब्ध आहेत, असे सांगितले. डॉ. स्नेहल कुलदीप पाटील या महाराष्ट्र राज्य ऊस दर नियंत्रण समितीचे सदस्य शिवाजीराव पाटील यांच्या स्नुषा व माजी समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे यांच्या कन्या आहेत. त्यांनी परिविक्षाधीन कालावधीत कोल्हापूर, सांगली शहरात पूरस्थिती असताना आपत्कालीन काळात तत्पर राहून वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा बजावली होती. यावेळी आ. बबनराव शिंदे, शिवाजीराव पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी सभापती विक्रमसिंह शिंदे, शिवाजी कांबळे, प्रणिताताई शिंदे, अंजनादेवी पाटील, कृष्णा शिंदे, रमेश पाटील, बाळासाहेब पाटील, प्रमोद कुटे, हिंमत सोलनकर, वेताळ जाधव, अमोल देवकर, रामभाऊ वाघमारे, किसन पाटील, विजयकुमार कोठारी, मधुकर देशमुख, रामभाऊ शिंदे, डॉ. विठ्ठल लेंगरे, डॉ. समीर बंडगर, डॉ. लालासाहेब शेंडगे, डॉ. तानाजी देवकते उपस्थित होते.

# कष्टाला पर्याय फक्त कष्टच : डॉ. विठ्ठल लहाने

### गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारोह सांगता समारंभात प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २० सप्टेंबर-**




जीवनात वेळ ही अत्यंत महत्त्वाची आहे. कठीणप्रसंगी आपण कर्तव्याप्रती तत्पर, जागरूक राहिले पाहिजे. कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांनी १९५२ चा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा कठीण काळ लक्षात घेऊन अतिशय मेहनतीने, कष्टाने सांगोला विद्यामंदिर सुरू केले. सांगोल्याच्या गोरगरीब जनतेसाठी, त्यांच्या लेकरांसाठी केलेले कार्य संपूर्ण महाराष्ट्रासाठी आदर्शवत ठरले. त्यामुळे जीवनात कष्टामुळेच सगळ्या गोष्टी साध्य होतात. कष्टाला पर्याय फक्त कष्टच असे प्रतिपादन लातूरचे प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी केले.

कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या ४३ व्या स्मृती समारोह सांगता समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, प्राचार्य अमोल गायकवाड उपस्थित होते.प्रास्तविकातून प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांनी शिष्यवृत्ती गुणवत्तेत अव्वल राहत जिल्ह्यात सांगोला विद्यामंदिरची ब्रँड म्हणून ओळख असून निकालाची परंपरा उज्ज्वल राखण्याचा प्रयत्न करणारे सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना संबोधित करण्यासाठी अत्यंत व्यस्त जीवनशैलीतून आपला अनमोल वेळ उपलब्ध करत डॉ. विठ्ठलराव लहाने यांच्या उपस्थितीबद्दल आनंद व्यक्त करत स्वागत केले. मिलिंद फाळके यांनी जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार निवड प्रक्रियेची माहिती दिली. पुरस्कार निवेदन प्रा. धनाजी चव्हाण यांनी केले. यावेळी संस्थेस देणगी दिल्याबद्दल प्रा. निलेश नागणे व प्रा. जालिंदर मिसाळ यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी संस्था कार्यकारिणी सदस्य प्रफुल्लचंद्र झपके, विश्वेश झपके उपस्थित होते. सूत्रसंचालन उन्मेश आटपाडीकर यांनी तर शेवटी आभार प्राचार्य अमोल गायकवाड यांनी मानले.

### पुरस्कार प्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक सुनील बनसोडे, संस्थांतर्गत गुणवंत शिक्षक सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज-निलेश नंदकुमार जंगम, गणेश महादेव हुंडेकरी, प्रा. माधुरी अरुण पैलवान, कोळा विद्यामंदिर हायस्कूल नमिता विनोद देशमुख, नाझरा विद्यामंदिर प्रशाला दिलीप रामचंद्र सरगर, सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालय स्वाती बापू गाढवे, सांगोला विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूल सुकेशिनी राजाराम नागटिळक, गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी नाझरा विद्यामंदिर प्रशाला दत्तात्रय जाधव, सांगोला विद्यामंदिर प्रशाला भारत सुखदेव पवार.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शंकर म्हेत्रेंवरील निष्ठा रक्ताने स्केच बनवून केली व्यक्त

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२० सप्टेबर-**

अक्कलकोट तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शंकर म्हेत्रे यांच्यावरील निष्ठा प्रेम व्यक्त करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते आझम शेख यांनी स्वतः चे रक्त काढून रक्ताने शंकर म्हेत्रे यांचे हुबेहुब कलाकृती साकारली. याप्रसंगी मुस्लिम समाजाचे अध्यक्ष जीलानी नाकेदार, तोलासाब गुलबर्गा, हाजी रौफसाब नदाफ, अल्लाउद्दीन नदाफ, सामाजिक कार्यकर्ते आझम शेख, महिबुब बिल्लाड, सैय्यद शेख, महिबूब शेख, अल्लाबक्ष जिडगे, गौस शेख, अशपाक शेख, मेहराज जिडगे, मोसीन मुकादम, राज गौडगाव आदी उपस्थित होते.





## संक्षिप्त वृत्त...



### चालता-बोलत्या जीवंत मानवी देहातच देव असतो

**फुलचंद नागटिळक : बार्शीतील प्रबोधनात्मक कार्यक्रमात प्रतिपादन**

**बार्शी, दि. २० सप्टेंबर-**

चालता बोलत्या जिवंत मानवी देहातच देव असतो, असे प्रतिपादन नटसम्राट फेम फुलचंद नागटिळक यांनी केले. श्रीगणेशोत्सवाच्या औचित्याने यशोदा पार्क परिवाराच्या वतीने आयोजित संत गाडगेबाबा यांचे जीवनावर आधारित प्रबोधनात्मक कार्यक्रमात ते बोलत होते. प्रथमतः माजी उपनगराध्यक्ष अरुण बारबोले यांचे शुभहस्ते श्रीगणेशाची आरती करण्यात आली. यावेळी अरुण बारबोले, यशोदा पार्क प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद गायकवाड, सचिव धनंजय काळे, दादासाहेब ताटे आदी पदाधिकारी उपस्थित होते. अरुण बारबोले यांनी प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमांचे कौतुक करीत या परिसरातील समस्यांबाबत योग्य ते सहकार्य करण्याचे अभिवचन दिले. सूत्रसंचालन प्रतिष्ठानचे खजिनदार गणेश वाघमारे यांनी केले. कार्यक्रमासाठी विजय कांबळे, श्रीकांत ढेरे, अक्षय काळे, मेजर चांदणे, सचिन लवळे, सुलतान शिकलगार, सचिन पवार, रोहिदास व्हनकळस यांनी परिश्रम घेतले. आभार डॉ. हनुमंत तिकटे यांनी मानले.



### करमाळ्यात पालखीतून कॅमेऱ्याची मिरवणूक

**करमाळा, दि. २० सप्टेंबर-**

करमाळा शहरामध्ये जागतिक छायाचित्र दिनानिमित्त फोटोग्राफर बांधवाच्या वतीने पालखीतून कॅमेऱ्याची मिरवणूक काढण्यात आली. शहरातील सर्व महापुरुषांच्या स्मारकांना पुष्पहार अर्पण करत व कुंडीतील रोपाला पाणी घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी कॅमेऱ्याचे पूजन केले. यावेळी प्रा. गणेश करे-पाटील, पुणे फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष अभय कापरे, सुमित जैन, राजेंद्र खैरे, अध्यक्ष सचिन गायकवाड, योगेश ठोंबरे, सुधीर चोपडे, मनोज ढेरे, राज मुसळे, ओंकार कदम, महेंद्र मांडगे, राज मुसळे, देविदास कोठावळे, अनिकेत राऊत, गणेश इरकर, निलेश चांदगुडे, देविदास कोठावळे, लखन कोठावळे, सुनील जगताप, नागनाथ सातपुते, प्रवीण वीर, ऋषिकेश अमरुळे, बापू पवार, बाळू सलगर, राज झिंझाडे, प्रमोद वैद्य, अनिल शेंडे, गणेश गलांडे उपस्थित होते. स्वागत निलेश विधाते यांनी केले तर बबन आरणे यांनी प्रास्ताविक केले. अमृता आरणे यांनी सूत्रसंचालन केले तर नागेश सातपुते यांनी आभार मानले.



### स्वेरीमध्ये ऑलम्पस २ के २४ चा समारोप

**पंढरपूर, दि. २० सप्टेंबर-**

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये आयोजिलेल्या 'ऑलम्पस २ के २४' या राष्ट्रीय स्पर्धेच्या समारोप झाला. यावेळी तंत्रशिक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. एन. बी. पासलकर, विद्यार्थी उपाध्यक्ष अनिल पिसे, साक्षी पवार, प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, डॉ. महेश मठपती, डॉ. ए. पी. केने, प्रा. दिगंबर काशीद, विद्यार्थिनी सचिवा नम्रता घुले आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सोनाली कांबळे व ज्ञानेश्वरी मेटकरी यांनी केले तर ऑलम्पसचे विद्यार्थी खजिनदार ओंकार जाधव यांनी आभार मानले.



### भैरवनाथ शुगर उद्योग समुहाच्या नोकरी महोत्सवाबाबत शिबीर

**टेंभुर्णी, दि. २० सप्टेंबर-**

भैरवनाथ शुगर उद्योग समुहाच्या नोकरी महोत्सवाची तयारी म्हणून टेंभुर्णी येथे तरुणांसाठी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख शिवाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पृथ्वीराज सावंत आणि सरपंच ऋतुराज सावंत यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या नोकरी महोत्सवाची तयारी म्हणून टेंभुर्णी येथे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यामध्ये तरुणांना बायोडाटा कसा द्यायचा याबद्दल व सॉफ्ट स्कील, स्किल डेव्हलपमेंटबद्दल माहिती देण्यात आली. यावेळी वाकावचे सरपंच ऋतुराज सावंत, आरपीआयचे जिल्हा उपाध्यक्ष जयवंत पोळ, शिवसेना शहरप्रमुख कुलदीप पाटील, रोहन चव्हाण, कांतीलाल टेळे, सचिन भुसारे उपस्थित होते.

## ई-जमीन मोजणीमुळे चिंता मिटली

### शेतकऱ्यांमधून समाधान; एका तासामध्ये होणार मोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० सप्टेंबर-**

ग्रामीण भागातील शेतजमिनींच्या मोजणीचे प्रश्न गेली अनेक दिवस वादात आहेत. शेतकऱ्यांकडून जेव्हा जमीन मोजणीची मागणी केली जात असे. तेव्हा भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी जमीन मोजून देत असतात. परंतु अपूर्ण कार्यप्रणालीमुळे जमीन मोजणीचे योग्य परिणाम अधिकाऱ्यांना मिळत नाहीत. त्यात अनेक त्रुटी असल्याने शेतजमिनधारक आणि इतरांमध्ये वादविवाद होत असतात. परंतु आता शेतकऱ्यांची ही चिंता मिटली आहे. कारण भूमी अभिलेख विभागामार्फत अशी एक कार्यप्रणाली विकसित करण्यात आली आहे.

नव्या ई प्रणालीच्या वापराने अगदी एका तासात अचूक जमीन मोजणी करणे शक्य झाले आहे. त्यामुळे शासनाने नव्याने सुरु केलेली ई मोजणी प्रणाली २.० ही शेतकऱ्यांच्या शेतजमीन मोजणीसाठी जणू जादूची कांडीच ठरणार असल्याची माहिती तालुका उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालयाचे मुख्यालय सहायक संतोष बिराजदार यांनी दिली आहे. संतोष बिराजदार म्हणाले की, ई मोजणी व्हर्जन २.० ही प्रणाली येण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या शेत जमीन मोजणीसाठीच्या अनेक तक्रारी विभागाकडे प्राप्त होत होत्या. शेत जमीन मोजणीमध्ये त्रुटी राहिल्याने हे वाद होत असत. मोजणीनंतर देखील नकाशा बनवण्याच्या प्रक्रियेत अनेक त्रुटींमुळे हद्द वेगळी असे आणि नकाशावर वेगळीच हद्द दाखवली जात असे. त्यामुळे दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांचे समाधान होत नव्हते. त्यामुळे अशी प्रकरणे कायम वादातीतच राहत होती. त्यामुळे ऊस पिकाची मोजणी देखील अभिलेख विभागाला करता येत नसे. मात्र या नव्या प्रणालीमुळे आता एका तासात जमिनीची मोजणी शक्य झाली आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख विभागाने ई मोजणी व्हर्जन २.० ही संगणकीय प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीमध्ये सॅटेलाईटच्या मदतीने रोव्हर मशिनचा वापर करुन मोजणी केली जाते.



#### नकाशे ऑनलाईन मिळणार

या प्रणालीमधून मोजणी झालेल्या क्षेत्राचे सर्व दस्ताऐवज आणि नकाशे शेतकऱ्यांना थेट ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध होऊ शकतात. यामध्ये खाडाखोड अथवा हातचलाखी करता येत नाही. त्यामुळे सुरक्षित आणि पारदर्शक रेकॉर्ड राहू शकते. मोबाईलवर एसएमएसद्वारे सर्व टप्प्यावरची माहिती शेतकऱ्यांना घरबसल्या कळविण्यात येईल असे बिराजदार म्हणाले.

मुख्यालय सहायक संतोष बिराजदार म्हणाले की, या संगणक प्रणालीमध्ये जीआयएस प्रणालीचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामुळे जिओग्राफीक इन्फॉमेशन सिस्टीमचा वापर करुन शेतीचा डाटा तयार केला जातो. त्यामुळे त्यामध्ये अचूकता येते आणि कोणाची ही शंका राहत नाही.

हा निर्णय दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांना मान्य होतो. कमी वेळात जास्त क्षेत्राची मोजणी सहज या प्रणालीमुळे शक्य होत आहे.



## दीपक साळुंखे-पाटलांशी वैद्यकीय समस्यांबाबत चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२० सप्टेंबर-**

वैद्यकीय क्षेत्रातील समस्यांबाबत माजी आ. दीपक साळुंखे-पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अ.प.गट) वैद्यकीय मदत कक्षाचे राज्य सरचिटणीस सचिन सरवदे, जिल्हा कार्याध्यक्ष घाडगे, सांगोला तालुका समन्वयक बापू देवकते यांनी भेट घेऊन वैद्यकीय क्षेत्रात रुग्णांना मदत करताना येणाऱ्या अडीअडचणी,समस्या याबाबत चर्चा केली.

दीपक साळुंके-पाटील यांनी त्या समस्या सोडवण्याबाबत सर्वतोपरी मदत व मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले. याप्रमाणेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अ.प.गट) जिल्हा महिला अध्यक्षा वर्षा शिंदे यांचीही भेट घेऊन याबाबत चर्चा केली असता त्यांनीही सहकार्य करण्याचे सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदतकक्ष महाराष्ट्रभर कार्यरत असून या कक्षामार्फत मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय संस्थांकडून मदतनिधी मिळवणे, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या योजनेंतर्गत वैद्यकीय मदत कक्षाने हजारो रुग्णांना मदत मिळवून दिली आहे. याप्रसंगी जिल्हा कार्याध्यक्ष प्रीती घाडगे, सांगोला तालुका समन्वयक बापू देवकते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### घरगुती गौरी-गणपती सजावट स्पर्धेचे २८ सप्टेंबरला बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२० सप्टेंबर-**

कार्यतपस्वी आ. काकासाहेब साळुंखे-पाटील चॅरिटेबल ट्रस्टतर्फे घेतलेल्या भगवतभक्त शारदादेवी साळुंखे-पाटील घरगुती गौरी-गणपती सजावट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याचे बक्षीस वितरण २८ सप्टेंबरला होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याचे डॉ. नेहा साळुंखे-पाटील यांनी सांगितले. विविध बक्षिसासह या स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक महिलांना ट्रस्टच्या वतीने आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. सांगोला येथील हर्षदा लॉन्स येथे दु.१.३० वा पार पडणाऱ्या बक्षीस वितरण समारंभास महिला स्पर्धकांनी उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. नेहा साळुंखे-पाटील यांनी केले आहे.



## वैराग नगरपथ विक्रेता समितीवर सोपल गटाचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, २० सप्टेंबर -**

वैराग नगरपंचायत नगरपथ विक्रेता समिती सदस्य निवडणुकीमध्ये माजी मंत्री दिलीपरावजी सोपल यांच्या पॅनलच्या सहा सदस्यांची बिनविरोध निवड झाली आहे.

बाबा सलाउद्धिन शेख (सर्वसाधारण प्रवर्ग), सोनाली वैभव चपलगावकार (सर्वसाधारण प्रवर्ग), महानंदा संतनाथ चपलगावकर (सर्वसाधारण महिला), अझरुद्धिन म. हनीफ बागवान (इतर मागास प्रवर्ग), चंचला सुभाष केदारी (अनुसूचित जाती महिला प्रवर्ग), शहानवाज रफिक तांबोळी (अल्पसंख्यांक प्रवर्ग). निवडणूक निर्णय अधिकारी चरण कोल्हे, उपनगराध्यक्ष नीरंजन भूमकर, माजी सभापती मकरंद निंबाळकर यांच्या हस्ते सदस्यांना निवडपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यलयीन अधीक्षक जगताप, जाधव, विलास मस्के, किरण वाघमारे, सचिन पानबुडे, कविता सोपल, रावसाहेब खेंदाड, अशोक वरदाने, बजरंग पांढरमिसे, मारूती जिरंगे, नंदकुमार पांढरमिसे, अमर निंबालकर, समाधान पवार उपस्थित होते.



### इर्ले येथे १०० जणांच्या आरोग्याची तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि २० सप्टेंबर**

महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, डॉ. अंधारे यांचे सुश्रुत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, बार्शी व इर्ले ग्रामपंचायतीतर्फे इर्ले येथे घेतलेल्या शिबिरात १०० हून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली. काही रुग्णांवर बार्शी येथे उपचार करण्यात येणार आहे.

डॉ. नाना बारस्कर, डॉ. दिनेश गपाट, डॉ. नंदकिशोर शिंदे, डॉ. अजित सगरे, शहाजी मोरे, आबा थोरात, माजी जिल्हा परिषद सदस्य दिनकर पाटील, प्रा. सतीश पाटील, उपसरपंच अंगद देवकते, कैलास डुरे, अभिजीत पाटील, प्रकाश देवकते, सुधीर डुरे, विनोद काजळे, ग्रामसेवक संतोष आवारे, चेअरमन किरण पाटील, संदीप अडगळे, राज गायकवाड उपस्थित होते.

### कर्मयोगी इंस्टिट्यूटमध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**पंढरपूर, दि. २० सप्टेंबर-**

कर्मयोगी अभियांत्रिकीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत व पालक सभा पार पडली. यावेळी प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जगदीश मुडेगावकर, प्रा. अनिल बाबर, प्रा. एस. एम. लंबे, प्रा. डॉ. एस. व्ही. एकलारकर, प्रा. दीपक भोसले, प्रा. अभिनंदन देशमाने, प्रा. मोहसिन शेख, डॉ. अभय उत्पात, प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार जी. डी. वाळके, उपप्राचार्य प्रा. जे. एल. मुडेगावकर, डॉ. अभय उत्पात, प्रा. अनिल बाबर, प्रा. सोमनाथ लंबे, डॉ. एस. व्ही. एकलारकर, प्रा. दीपक भोसले, प्रा. अभिनंदन देशमाने उपस्थित होते. साक्षी भिंगे व रामरत्नराजे जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एन. डी. तिवारी यांनी आभार मानले.



### मैंदर्गी शहर पथविक्रेता समिती सदस्यांची निवडणूक बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २० सप्टेंबर-**

मैंदर्गी नगरपरिषदेंतर्गत शहर पथविक्रेता निवडणूक बिनविरोध पार पडली. नगरपरिषद पथविक्रेता सदस्य समितीच्या निवडणुकीत विजयी उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी अतिश वाळुंज यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

नगर पथविक्रेता समितीमध्ये बिनविरोध निवडून आलेले सदस्य चंद्रकांत शिवलिंगप्पा काळी, मल्लिनाथ भिमशा हुलमनी (सर्वसाधारण), लता रमेश बेंद्रे (अनुसुचित जाती, महिला), कावेरी शिवचलप्पा हिरतोट (सर्वसाधारण महिला), शंकर श्रीशैल भंडारकवठे (इतर मागास वर्ग), इमाम सैपन बागवान (अल्पसंख्याक), लक्ष्मण तुकाराम पुजारी (विकलांग) हे उमेदवार बिनविरोध निवडून आले. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी भागवत पवार, स्वच्छता निरीक्षक वैशाली नन्ना तसेच पथविक्रेते उपस्थित होते. यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी राजेंद्र गायधनकर यांनी आभार मानले.

## संत परंपरेत संत नामदेव महाराजांचे कार्य अलौकिक

### गोविंदगिरी महाराज : पंढरपुरात रामप्रसाद महाराजांच्या नामदेव कथेला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० सप्टेंबर-**

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून या संत परंपरेत संत नामदेव महाराजांचे कार्य अलौकिक आहे. पंजाब प्रांतात राहून त्यांनी विठ्ठलभक्तीचा व भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला. आज हा धर्मच जगाला तारु शकतो, असे मत आयोध्येतील श्रीराम मंदिराचे मुख्य पुजारी व कोषाध्यक्ष गोविंदगिरी महाराज यांनी व्यक्त केला.

पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या भक्तनिवासच्या प्रांगणात श्री संत नामदेव समाजसेवा समितीच्या वतीने संत शिरोमणी श्री नामदेव महाराजांच्या कथेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री रामप्रसाद महाराज हे पाच दिवस या कथेचे निरुपण करणार आहेत. ही कथा श्रवण करण्यासाठी देशभरातील नामदेवभक्त श्री क्षेत्र पंढरपुरात उपस्थित झाले आहेत.

#### संतांचे चरित्र श्रवण करावे : रामप्रसाद महाराज

संतांचे चरित्र श्रवण केले की भक्तांना आनंद मिळतो तर भक्तांचे चरित्र वर्णन केले की देवाला आनंद वाटतो. संत नामदेव समाजसेवा समितीने श्री क्षेत्र पंढरपूर येथे संत नामदेव भक्तमाल कथेचे सुंदर आयोजन केले आहे. जसे आपल्या इच्छेशिवाय कोणी अतिथी आपल्या घरात येऊ शकत नाही. तद्वत संत नामदेव या थोरभक्ताची कथा ऐकण्यासाठी त्याचे भक्तच येऊ शकतात, असे श्री रामप्रसादजी महाराज यांनी यांनी सांगितले.

गोविंदगिरी महाराज म्हणाले, संत नामदेवांमुळेच संत निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई आदी थोर संत जगाला कळाले. श्री विठ्ठलाचे अनेकवेळा प्रत्यक्ष दर्शन घेणारे संत नामदेव एकमेव संत होते. श्री नामदेवांच्या कीर्तनात प्रत्यक्ष पांडुरंग नाचत असे. ज्ञानदेवांचे ज्ञान व संत नामदेवांचे नाम हेच आज जगाला तारक आहे. संत नामदेवांच्या वाणीमध्ये प्रभाव होता. महाराष्ट्रातील नामदेव भक्तांनी उत्तर भारतात जाऊन संत नामदेवांची भक्ती व प्रेम पहावे. पंजाब प्रांतात राहून त्यांनी विठ्ठलभक्तीचा प्रचार व प्रसार केला. गुरु ग्रंथसाहेबमध्ये संत नामदेवांचे ६१ अभंग समाविष्ट आहेत. दुसऱ्या ग्रंथात नामदेवांचे अभंग समाविष्ट असणे ही फार मोठी गोष्ट आहे.

प्रारंभी श्री विठ्ठल मंदिराच्या महाद्वारातील नामदेव पायरीपासून कलश यात्रा काढण्यात आली. देशभरातून आलेला नामदेव समाज तसेच पंढरपूर परिसरातील शिंपी समाजाच्या महिला भगिनी टाळ-मृदुंगाच्या गजरात व श्री विठ्ठल-रुक्मिणी व संत नामदेव महाराजांच्या पारंपरिक वेशभूषेत या यात्रेत सहभागी झाले होते. संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान असलेल्या नामदास वाड्यात संत नामदेवांच्या पादुकांची पूजा करण्यात आली. यावेळी संत नामदेव महाराजांचे वंशज हभप मुकुंद महाराज नामदास यांच्या हस्ते पादुकांची विधिवत पूजा करण्यात आली. भक्तनिवास प्रांगणात कलश यात्रेचे आगमन झाल्यावर व्यासपीठावर गोविंदगिरी महाराज, कथाकार रामप्रसाद महाराज व सीने अभिनेते गोविंद नामदेव, लेखक दिग्दर्शक हेमंत वर्मा यांचा नामदेव समाजाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी संत नामदेव चरित्र ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी अखिल भारतीय श्री नामदेव छीपा महासभाचे राष्ट्रीय अध्यक्ष राम सोपरा, राष्ट्रीय महामंत्री अवधेश पांडे, अहमदाबाद छीपा समाजाचे अध्यक्ष मुलचंद परमार, नवरतन छोडो, सूर्यप्रकाश पाटनेचा, विजयराज चौहान, मुलचंद गेहलोत, हजारीमल चौहान, नवरतनलाल छीपा, उत्तम चौहान, खेमराज नामा, पुरणमल परमार, नवरतनलाल टांक, ॲड. सागर मांढरे, डॉ. शकुंतला टेलर, चेतन खमायचा, रामगोपाल तोलंबीया, दिनेश झेडू, श्री संत नामदेव शिंपी समाजाचे अध्यक्ष गणेश उंडाळे तसेच विश्वस्त मंडळ उपस्थित होते.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शेतातील उभे तीन एक्कर सोयाबीन पीक चोरीला

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२० सप्टेंबर -**
शेतातील काढणीला आलेले उभे सोयाबीन पीक चोरीला गेल्याची घटना कळंब तालुक्यातील गंभीरवाडी येथे घडली असून याबाबतचा गुन्हा कळंब पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, शेतकरी फिर्यादी शितल कुंडलिक भराटे (वय ३६, रा. गंभीरवाडी ता. कळंब) यांचे गंभीरवाडी येथील शेत गट नं. ३८३, ३८४ मधील सोयाबीनचे तीन एक्कर पीक अंदाजे ६७ हजार ५०० रूपये किंमतीचे अज्ञात व्यक्तीने दि.१७ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास हार्वेस्टरने काढून चोरुन नेले.

अशा मजकुराच्या फिर्यादी शितल भराटे यांनी दि.१९ सप्टेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पोलिस ठाणे येथे भा.न्या.सं. ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. याबाबत अधिक तपास पोलिस करीत आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



### वाढदिवसानिमित्ताने विद्यार्थ्यांना तीन हजार वह्यांचे वाटप

**तुळजापूर, दि.२० सप्टेंबर -**
तिर्थक्षेत्र तुळजापूरात वाढदिवसानिमित्ताने अनावश्यक साहित्य भेट देण्याची क्रेज वाढला असतानाच मात्र सामाजिक कार्यकते आनंद कंदले मात्र त्यांना वाढदिवसा निमित्ताने चक्क तीन हजार वह्यांसह तीन ते चारशे पेन, कंपास, वह्या, स्कुल बँग भेट रुपात मिळाल्या. येथील सामाजिक कार्यकते आनंद कंदले यांनी मात्र आपले स्वागत हारतुरे न देता शैक्षणिक साहित्य देवुन स्वागत करावे असे आवाहन केले. हे सर्व शैक्षणिक साहित्य गोरगरीब वर्गातील शालेय विद्यार्थांना वाटप करणार असल्याची माहिती आनंद कंदले यांनी दिली.



### शिराढोण येथे दसलक्षण पर्वाची पालखी सोहळा संपन्न

**शिराढोण, दि.२० सप्टेंबर -**
कळंब तालुक्यातील शिराढोण येथील श्री १००८ आदिनाथ दिंगबर जैन मंदिर व श्री १००८ पार्श्वनाथ दिंगबर जैन मंदिर या दोन्ही मंदिरामध्ये दि.८ सप्टेंबर रोजी ऋषी पंचमी ते दि.१७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीपर्यंत पर्युषण पर्व मोठ्या उत्साहात पार पडला. श्री १००८ आदिनाथ दिंगबर जैन मंदिर येथून दु.५ वा. पालखी सोहळा आयोजीत करण्यात आला. यामध्ये आरोही, ओजस्वी, गायत्री, गौरी, पलक, पर्युल्ल, मनस्वी व विहान या बालकलाकारांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उज्वला कोंडेकर, मनोज होसाळे, प्रमोद बिडकर, सचिन कोंडेकर, निलेश संगवे, श्रीनिवास कोंडेकर, विशाल संगवे, सचिन जेगावकर आदींनी परिश्रम घेतले.

### गणेश उत्सवानिमित्त नेत्र तपासणी शिबिराचा ८० रूग्णांनी घेतला लाभ

**तुळजापूर, दि.२० सप्टेंबर -**
येथील सारा गौरव वसाहतीत श्रीगणेश उत्सवा निमित्ताने श्री तुळजाभवानी नेत्रालय वतीने घेण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरात ८० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबिराला रोटरी अध्यक्ष प्रशांत अपराध, प्रा. शिवाजी सुयश जाधव, प्रा. शिवाजी जेटीथोर अदि मान्यवरांनी भेट देवुन या उपक्रमाचे कौतुक केले. या शिबिरात प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. गितांजली कुंडलिक माने यांनी रुग्णांची तपासणी केली. शिबीर यशस्वी करण्यासाठी सारा गौरव सोसायटी गणेश मंडळ पदाधिकारी व श्री तुळजाभवानी नेत्रालयच्या नेत्ररोग तज्ञ डॉ. गीताजंली माने व त्यांच्या सहकार्यांनी परिश्रम घेतले.



### रोकडेश्वरी यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी प्रभाकर शेळके यांची निवड

**कळंब, दि.२० सप्टेंबर -**
खामसवाडी (ता.कळंब) येथील श्री रोकडेश्वरी देवीची शारदीय नवरात्र महोत्सव यात्रा अश्विन शुद्ध नवमीला भरत असते. सदरील नवरात्र महोत्सव दि.३ ते १२ ऑक्टोंबर या दिवसात साजरा होणार असून या यात्रेनिमित्त दि.१८ सप्टेंबर रोजी देवीच्या मंदिरात गावकऱ्यांच्या वतीने यात्रा कमिटीची स्थापना करण्यात आली. यावेळी सर्वांनुमते यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी माजी सरपंच प्रभाकर शेळके यांची निवड करण्यात आली. यात्रा कमिटी पुढीलप्रमाणे आहे उपाध्यक्ष म्हणून विश्वास हनुमंत कोकणे व महादेव शेळके, तर सचिव धनंजय शेळके, सदस्यपदी किरण पाटील, ज्योतीसिंग राठोड, निलेश पाटील, सादिक सय्यद, संजय शेळके, मधुकर शेळके, शिवाजी बोबडे, चंद्रकांत पाटील, वाल्मीक कोळी, विजय शेळके, सतीश माने यांच्या निवडी झाल्या.

### विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी चव्हाण महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची निवड

**तुळजापूर, दि.२० सप्टेंबर -**
जिल्हा क्रीडा कार्यालया मार्फत घेण्यात आलेल्या १९ वर्षाखालील क्रिकेट निवड चाचणीत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची निवड करण्यात आली यामध्ये पृथ्वीराज रोकडे व पारस कंदले यांची नांदेड येथे होणाऱ्या विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी धाराशिव संघामध्ये निवड करण्यात आली. या यशाबद्दल बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ. मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगावकर, प्राचार्य मुकुंद गायकवाड, डॉ. नरसिंग जाधव, उपप्राचार्य रमेश नन्नवरे, प्रा. संभाजी भोसले यांनी अभिनंदन केले. या खेळाडूंना प्रा. संभाजी भोसले व प्रा. रत्नाकर उपासे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



## आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचा दूरदृश्य प्रणालीद्वारे पंतप्रधानांच्या हस्ते शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० सप्टेंबर -**
महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजक्ता व नाविन्यता विभागा मार्फत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (सीकेव्हीके) चे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे शुभारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी दूरदृष्टी प्रणालीद्वारे राज्यपाल डॉ.सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री तथा रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

माननीय कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. धाराशिव शहरात सदर कार्यक्रमाचे दूरदृश्य प्रणालीद्वारे प्रक्षेपण करण्यात आले. बिल गेट्स इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड मॅनेजमेंट महाविद्यालय, धाराशिव येथे आज दुपारी १२:३० वाजता कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

या कार्यक्रम स्थळी उपस्थित मान्यवर म्हणून श्रीलक्ष्मी सेवाभावी सामाजिक संस्था, हासेगाव (शि. ता. कळंब) च्या अध्यक्षा डॉ. सरोजनी संतोष राऊत या उपस्थित होत्या.

तसेच श्री कुलस्वामिनी शिक्षण प्रसारक मंडळ, धाराशिवचे सचिव डॉ. रमेश विठ्ठलराव दाबके, बिल गेट्स इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड मॅनेजमेंट धाराशिवचे प्राचार्य डॉ. अर्षद रजवी, सह्याद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, धाराशिवच्या संचालिका डॉ. वसुधा दिग्गज दापके-देशमुख, सह्याद्री कॉलेज ऑफ नर्सिंग धाराशिवचे प्राचार्य बाळासाहेब बिरादार आदीं मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. आचार्य चाणक्य कौशल विकास केंद्र मार्फत प्रतिवर्षी प्रत्येक महाविद्यालयात १५० युवक युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण दिले जाईल.

वर्षभरामध्ये १५ ते ४५ वयोगटातील १ लाख ५० हजार युवक युवतींना मिळणार मोफत प्रशिक्षण. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेअंतर्गत ५०० महिलांसाठी अर्थसहाय्य करण्याचे उद्दिष्ट आहे.

प्रतिवर्षी प्रत्येक महाविद्यालयात १५० युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण दिले जाईल. वर्षभरात १५ ते ४५ वयोगटातील १ लाख ५० हजार युवक-युवतींना योजनेत मोफत प्रशिक्षण मिळणार आहे.

धाराशिव जिल्ह्यामध्ये एकूण १८ आचार्य कौशल्य विकास केंद्राचे शुभारंभ झाले आहे.

## नळदुर्ग परिसरात पुन्हा अवैध धंद्यांना ऊत; कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० सप्टेंबर -**
नळदुर्ग परीसरात पुन्हा एकदा चक्री जुगार सुरु झाला असुन पोलिसांनी तात्काळ कारवाई करून अनेकांचे संसार तसेच घरे उध्वस्त करणारा चक्री जुगार बंद करून हा चक्री जुगार सुरु करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

चक्री जुगारामुळे अनेकांचे संसार व घरे उध्वस्त झाली आहेत. या चक्री जुगारामध्ये चक्री जुगार सुरु करणारा मालामाल तर हा जुगार खेळणारे अक्षरशा कंगाल होतात.

हा चक्री जुगार बंद करण्याची मागणी जोर धरल्यानंतर पोलिसांनी नळदुर्ग पोलिस ठाणा हद्दीतुन चक्री जुगार हद्दपार केला होता. मात्र आज पुन्हा हा चक्री जुगार हळुहळु पाय पसरत आहे.

सध्या जळकोट येथे खुलेआम चक्री जुगार सुरु आहे. हा चक्री जुगार पुन्हा कसा काय सुरु झाला? हा चक्री जुगार सुरु करण्याची परवानगी कोणी दिली? याची चौकशी होणे गरजेचे आहे.

हा जुगार सुरु केला आहे. त्याच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी नळदुर्ग व परिसरात नागरिकांकडून होत आहे.

## हाडोंग्री येथील घरकुल लाभधारकांना चाव्या सुपूर्द

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२० सप्टेंबर -**
मराठवाडा मुक्ती संग्रामाचे औचित्य साधून पंतप्रधान आवास योजनेतील पूर्ण झालेल्या घरकुल लाभार्थ्यांना ग्रामसेवक आणि सरपंच यांचेकडून मालकीच्या चाव्या सुपूर्द केल्यामुळे लाभधारकातून समाधान व्यक्त केले जात आहे.

प्रत्येकालाच स्वतःच्या मालकी हक्काचे छोटसे का होईना परंतु घर असावे असे स्वप्न असते. परंतु गोरगरीब, दलित मजुरांना हक्काचे घर मिळणे मोठ कठिण असत. अशा हातावर पोट असणाऱ्या मजुरांना स्वप्नातले घर मिळावे यासाठी शासनाने पंतप्रधान आवास घरकुल योजना, इंदिरा आवास घरकुल योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेच्या माध्यमातून आवश्यक त्या लाभधारकांना घरकुल देण्या संदर्भात उपाययोजना केली आहे. यामध्येही ज्यांना घरकुल बांधण्यासाठी जागा नाही परंतु घरकुल मंजूर झाले आहे अशा लाभार्थ्यांना ग्रामपंचायत अंतर्गत, नगर पालिके अंतर्गत जागा देखील घेण्यासाठी शासनाने विशेष उपाय योजना केल्या आहेत. एकंदरीत मागील त्याला घरकुल मिळावे यासाठी शासनाने घरकुल योजना कटाक्षपणे राबवत आहे. अशाच योजनेतून ज्यांची घरकुल पूर्ण झालेली आहे. अशा हांडोंग्री तालुका भूम येथील या लाभार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामा दिनाचे औचित्य साधून हाडोंग्री ग्राम पंचायतच्यावतीने ग्रामसेवक निलम जानराव, सरपंच संदीप मगर, उपसरपंच रविंद्र लोमटे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व घरकुलाची चावी देण्यात आली आहे.



एकाच दिवशी नारायण क्षिरसागर, सचिन भरनाळे, सतिश लोमटे या लाभधारक चाव्या दिल्या आहेत. यामुळे लाभधारकांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

## वात्सल्य संस्थेस शासनाचा उत्कृष्ट सामाजिक संस्था पूरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० सप्टेंबर -**
जिल्ह्यातील सामाजिक संस्थांनी केलेल्या समाज हिताच्या कार्याचा गौरव व्हावा व कार्य करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून महाराष्ट्र शासन दरवर्षी उत्कृष्ट सामाजिक संस्थांना पुरस्कार देते.

धाराशिव जिल्ह्यातील सन २०२२- २३ या वर्षीचा पुरस्कार, पोलीस परेड मैदानावर वात्सल्य सामाजिक संस्थेला देण्यात आला. पालकमंत्री तानाजीराव सावंत, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, पोलीस अधीक्षक संजय जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठवाडा मुक्ती दिनावेळीच्या ध्वजारोहणानंतर सदरील पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गौरवपत्र, सन्मानचिन्ह व पन्नास हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते.

समाजातील विधवा, परित्यकता, एकल महिला तसेच गोसंवर्धन, आरोग्य, वृक्ष लागवड व संवर्धन, अनाथ मुलांसाठी शैक्षणिक कार्य अशा विविध क्षेत्रात काम करून वात्सल्य सामाजिक संस्थेने आपले वेगळेपण निर्माण केले आहे.

## रुईभर येथे आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० सप्टेंबर -**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय रुईभर येथे कौशल्य, रोजगार, उद्योग व नाविन्यता विभाग आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे दूरदृश्य प्रणालीद्वारे शुभारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रम महाविद्यालयातील स्वातंत्र्य सेनानी सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आला.

जिल्हा कौशल्य विकास कार्यालय यांच्या सूचनेनुसार कार्यक्रमास आवश्यक एल.ई.डी प्रोजेक्टर, स्क्रीन, इंटरनेट सुविधा इत्यादीची पूर्तता करून सदर कार्यक्रम यशस्वीपणे घेण्यात आला. दूरदृश्य प्रणालीद्वारे माननीय पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचा शुभारंभ करण्यात आला. पंतप्रधानांच्या संदेशाचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले होते. कार्यक्रमास डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष कोळगे, गोपाळ निंबाळकर, मारुती कस्पटे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, नोडल अधिकारी बाबासाहेब शेटे, बालाजी कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंखे, महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, उपप्राचार्य धनाजी भोसले, मुअ नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक के.ए. डोंगरे, महाविद्यालयाच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे एसपीओसी जगन्नाथ लटके, गावातील मान्यवर, प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सूत्रसंचालन सचिन कांबळे व आभार प्रा. शेटे यांनी मानले.

## श्री संत मारूती महाराज कानेगावकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वराज्य केसरी कुस्ती स्पर्धा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२० सप्टेंबर -**
श्री संत मारूती महाराज कानेगावकर यांच्या २८ व्या पुण्यतिथीनिमित्त स्वराज्य शैक्षणिक, सामाजिक व कृषि विकास संस्था कानेगाव यांच्यावतीने स्वराज्य केसरी निमंत्रित भव्य कुस्ती स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.

या कुस्ती स्पर्धेत लातूर, बीड, धाराशिव, सोलापूर जिल्हयातील तसेच कर्नाटक राज्यातील जवळपास १२० पैलवानांच्या सहभागातून ६० कुस्त्या हभप. ज्ञानेश्वर महाराज कानेगावकर, पोनि. अजित चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडल्या.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून पै. रामेश्वर कार्ले वस्ताद, पै. दयानंद साळुंके धानुरी, पै. शशिकांत मेलगर, पै. संजय पारवे, पै. राजाभाऊ शेळके यांनी चोख काम पाहिले.

या कुस्ती स्पर्धेत विषेश कुस्ती महिलांची पै. श्वेता कार्ले यांची भरवण्यात आली. या सामन्यास राष्ट्रवादी शरदचंद्र पवार या पक्षाच्या युवती प्रदेशाध्यक्ष सक्षना सलगर उपस्थित राहिल्या.

या कुस्ती स्पर्धेतील अंतिम कुस्ती हि पै. सागर लोहार महाराष्ट्र चॅम्पियन, टाका व पै. महेश गायकवाड शिवराम दादा कुस्ती संकुल पुणे यांच्यात झाली. यामध्ये पै. महेश गायकवाड होर्टी याने बाजी मारून मानाची चांदीची गदा व रोख अकरा हजार रूपयांचे पारितोषिक पटकावले.

या कुस्ती स्पर्धा यशस्वीरित्या पार पडाव्यात यासाठी निवृत्ती कदम, नागनाथ कदम, प्रदीप मडुळे, किशोर साबळे, समाधान क्षीरसागर, प्रविण सगर, कृष्णा क्षीरसागर, राहुल कुलकर्णी, ज्ञानेश्वर आडसुळे यांनी परिश्रम घेतले.

## छत्रपती शिवाजी विद्यालय 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या स्पर्धेत तालुक्यातून प्रथम क्रमांक



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२० सप्टेंबर -**
वाशी तालुक्यातील वाशी येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला. विद्यालय शासनाकडून तीन लाख रुपयांचे बक्षीस मिळण्यास पात्र झाले आहे तसेच जिल्हास्तरीय मूल्यांकनासाठी निवड झाली आहे.

वाशी तालुक्यातून प्रथम आलेल्या छत्रपती शिवाजी विद्यालयास जिल्हास्तरीय मूल्यांकन समितीने भेट दिली. या समितीमध्ये इनामदार गटशिक्षणाधिकारी तुळजापूर, मिलिंद अघोर अधिव्याख्याता डायट धाराशिव, माळी एस.एस. शिक्षणविस्ताराधिकारी, अंकुशे साधनव्यक्ती तुळजापूर, दत्तात्रय मोहिते केंद्रप्रमुख इंदापूर यांचा समावेश होता. या समितीने विद्यालयातील विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन, इंग्रजी भाषिक कौशल्ये तपासली.

समितीने विद्यालयातील प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांचे मूल्यांकन केले. विद्यालयाचे व्यसनमुक्ती अभियान, साक्षरता प्रचार व प्रसार, शालेय स्वच्छता, शालेय आरोग्य आणि विविध शैक्षणिक उपक्रमांच्या आयोजनाबाबत समाधान व्यक्त केले.

अभियानातील या यशाबद्दल सोमनाथ घोलप गटशिक्षणाधिकारी वाशी, टेकाळे शिक्षण विस्तार अधिकारी, सयाजी माने नगरपंचायत वाशी, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस.व्ही. गाढवे व पर्यवेक्षक बी.एम. सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. अभियानातील मूल्यांकनातील विविध बाबींची पूर्तता व तयारी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक ए.बी. वाघेरे, एस.व्ही. क्षीरसागर व एस.बी. छबिले यांनी परिश्रम घेतले.

तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे योगदान लाभले.

विद्यालयाने प्राप्त केलेल्या या यशाबद्दल शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, अरूण देबडवार, जयकुमार शितोळे, टी.पी. शिनगारे तसेच संस्थेचे सर्व कार्यकारिणी सदस्य यांनी अभिनंदन केले आहे. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष संदीप कवडे, नेताजी नलवडे, पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस.व्ही. गाढवे, पर्यवेक्षक बी.एम. सावंत, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी यांनी अथक परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### खरोळा फाटा ते पानगाव रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गांची पथकाडून पाहणी

**रेणापूर, दि. २० सप्टेंबर-**

खरोळा फाटा ते पानगाव रखडलेल्या महामार्ग संदर्भात जिल्हा अधिकारी संगीता टकले यांच्या दालनात बैठक संपन्न झाली.दरम्यानचा रस्त्यात लगत चे शेतकरी कोण आहेत. त्यांचे गट नंबर कोणते आहेत याची पाहणी करण्यासाठीचे पथक नियुक्ति करण्यात आले आहे. या पथकाने प्रत्यक्ष पाहणी करण्यास सुरुवात केली आहे. खरोळा फाटा ते पानगाव रखडलेल्या रस्त्याचे काम सुरु व्हावे यासाठी १५ ऑगस्टपासून साखळी उपोषण सुरु आहे.यात विवीध आंदोलने केली जात आहेत . गुरुवारी तहसीलदार कार्यालयासमोर अर्ध नग्न आंदोलन बोंबाबोंब आंदोलनाचा करण्यांत आले.त्या नंतर दुपारी अप्पर जिल्हा अधिकारी संगीता टकले यांच्य दालनात आंदोलन करते. महसूल राष्ट्रीय महामार्गांचे अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यात उपाध्यक्षक भूमी अभिलेख मंडळ अधिकारी, तलाठी, राष्ट्रीय महामार्गांचे अधिकारी व पोलीस यांचे संयुक्त पथक तयार करुन लागलीच प्रत्यक्ष पाहणीस सुरूवात करण्यांत आली आहे. सध्या रस्ता किती आहे. रस्त्यालगतचे शेतकरीही कोण आहेत. त्यांचे गट नंबर आणी रास्ता करण्यासाठी संमती दिलेले शेतकरी तेच आहेत का याची खात्री करण्यात येणार आहे. दोन दिवसात हे काम पूर्ण करुन राष्ट्रीय महामार्ग विभागांच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली जाणार आहे. रस्त्याचे पाहणी करताना तहसीलदार मंजुषा भगत मंडळ अधिकारी कमलाकर तिडके आदींसह विविध अधिकारी कर्मचारी पोलीस उपस्थित होते.



### महापालिकेमार्फत दंतशल्य चिकित्सा सुविधेस सुरुवात

**लातूर, दि. २० सप्टेंबर-**

लातूर शहर महानगरपालिका आरोग्य विभागा अंतर्गत विविध आरोग्य विषयक सेवा सुविधा नागरिकाना दिले जातात. परंतु, यामध्ये दंतशल्यचिकित्सा उपलब्ध नसल्या कारणाने ही सेवा लातूर शहर वासियांना उपलब्ध करून देण्याचा मानस मनपा प्रशासनाचा होता. तसेच माईर्स पुणे चे महाराष्ट्र इंस्टिट्यूट ऑफ डेंटल सायन्सेस अँड रिसर्च (दंत महाविद्यालय व रुग्णालय) लातूर चा उद्देश समाजातील शेवटच्या घटकापर्यंत दंत चिकित्सा सुविधा पुरविणे आहे. त्यादृष्टीने आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिलेल्या मान्यतेनुसार मनपाच्या वतीने उपायुक्त(आरोग्य) डॉ. पंजाब खानसोळे, आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती व MIDSR प्राचार्य डॉ. कांगणे यांनी योग्य ती प्रक्रिया पूर्ण करून दोन्ही संथांच्या सहकार्याने व परस्पर संमतीने नागरिकांसाठी दंतशल्यचिकित्सा सुविधा सुरु करण्याच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आले आहेत या करारा अंतर्गत मनपातील चार(४) प्रा. आरोग्य केंद्र येथे अतिशय अल्प दरात दंत चिकित्सा सुविधा तज्ञ मार्गदर्शकांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे. यामधे नियमित दंत तपासणी(जझऊ) सोबतच स्केलिंग, रूट कॅनल, दात काढणे, दातात सिमेंट भरणे आदि सेवा देण्यात येणार आहेत. तसेच संदर्भीय सेवा या माईर्स चखऊझ्ठ येथील रुग्णालयात दात इम्प्लंट करणे, दंत कॅन्सर, गुंतागुंतीची शस्त्रक्रिया आदि सुविधा देण्यात येणार आहेत. आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी यावेळी चखऊझ्ठ दंत महाविद्यालयाचे दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. तरी नागरिकांनी खालील नमूद केलेल्या चार ठिकाणी १) प्रा.ना.आ.केंद्र इंडिया नगर २) प्रा.ना.आ.केंद्र गौतम नगर ३)प्रा. ना. आ. केंद्र तावरजा कॉलनी ४) मनपा दवाखाना काळे गल्ली या ठिकाणी दंतशल्यचिकित्सा सेवेचा लाभ दिनांक २३-९-२०२४ पासून सकाळी १० ते २ या वेळेत घ्यावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# निधीवरुन खा. राजेनिंबाळकरांचा विरोधकांवर हल्लाबोल

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १८ सप्टेंबर-**

शहर व गावातील जनतेच्या विकासासाठी शासनाकडून विविध निधीअंतर्गत आणलेले पैसे जनतेचेच आहेत. कर रुपातून गोळा झालेला निधी त्यांच्याच विकासासाठी खर्च करायचा असतो. हा पैसा कोणत्याही लोकनेत्यांचा नाही. आणि कोणी वैयक्तिक प्रापर्टी विकून जनतेच्या विकासासाठी निधी आणून दिला नाही. यामुळे मी एवढा निधी आणला. म्हणुन सांगायची गरज नाही. लेकरांची ओळख बापाच्या चेर्हय़ावरुन होते. असा मार्मिक टोला खासदार ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी नाव न घेता विद्यमानांना लगावून चौफेर फटकेबाजी केली. यामुळे खासदारांच्या टोलेबाजीत विद्यमान घायाळ झाले असल्याचा सूर जनतेतून निघत आहे

तालुक्यातील उजनी येथील श्री शिवछत्रपती प्रतिष्ठापच्या श्री गणेशाचे खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर व माजी आ. दिनकर माने यांच्या हस्ते पूजन करुन आरती करण्यात आली. यानंतर सांस्कृतिक सभागृहात ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयाने खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचा नागरी सत्कार केला. यानिमित्ताने ते सत्काराला उत्तर देताना बोलत होते. सरपंच युवराज गायकवाड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते .माजी आ. दिनकर माने, महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संतोष सोमवंशी, माजी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष नारायण लोखंडे, माजी सभापती योगीराज पाटील, एकंबीतांडाचे सरपंच शिवराज राठोड, श्रीरंग वळके, शेखर चव्हाण, प्रदीप रणखांब, मजहर पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती . खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर म्हणाले, आगामी निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने माझी लाडकी बहिण योजना आणली आहे. हीच योजना सत्तेत आल्याबरोबर सुरु केली असती. तर जनतेला या योजनेचा अधिक विश्वास वाटला असता .पैशाची अशीच अतिवृष्टी लोकसभेच्या निवडणुकीत झाली होती.याचा काहीही फायदा झाला नाही. उलट नुकसानच झाले आहे. एखाद्या सामान्य माणसाने ठरवले तर अशा कितीही योजना आणून उधळण केली तरी त्याचा फायदा होत नाही . यापेक्षा शेतकऱ्यांच्या धान्याला योग्य भाव, आयात



बंद करुन कांदा प्रश्न सोडविला असता तर शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे आले असते. पिकांचे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना पिक विमा मिळत नाही.यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. अशा अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देऊन त्यांची सोडवणुक करण्यासाठी सरकारकडे वेळ नाही. याच काळात उद्योगपतीच्या १७ लाख कोटी रुपयांच्या कर्जाला कर्जमाफी दिली गेली. परंतू शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सरकारकडे पैसा नाही. १६ वर्षापूर्वी केंद्रीय कृषीमंत्री पदावर असताना शरद पवार यांनी ७० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली होती. उद्योगपतीच्या कर्जमाफीत शेतकऱ्यांची २० वेळा कर्जमाफी झाली असती. असे खा. राजेनिंबाळकर म्हणाले. आम्ही चार हजार कोटी रुपयांचा निधी आणला. हे सांगायची गरज नाही. यापेक्षा एवढा निधी कोठून आणला व कोठे खर्च केला. ते सांगा. तुम्ही लोकप्रतिनिधी आहात तुमची कामे तुम्हीच केली पाहिजेत. आम्हीच कामे केली आहेत हे सांगायची गरज नाही.एखाद काम प्रामाणिपणे केले तर परमेश्वर सुध्दा आशिर्वाद देतो. जनता तर देणारच आहे. असा खोचक टोला खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी विरोधकांना लगावला आहे. श्री शिवछत्रपती प्रतिष्ठान उजनी यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले. याचा १८५ रुग्णांनी लाभ घेतला. राज पाटील, प्रज्योत अलमले, गणेश ढवण, रोहित ढवन, पांडुरंग ढवन, सुरज आलमले, प्रदीप ढवन, प्रवीण ढवण, लक्ष्मण चव्हाण, पृथ्वीराज वळके, लक्ष्मण ढवन, मुक्तार शेरीकर, ग्रामस्थ, गणेश भक्त, गणेश मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

**आगामी निवडणुकीत ढगफुटी होणार : खा. राजेनिंबाळकर**

सत्ताधाऱ्यांचा जनतेपेक्षा पैशावर अधिक विश्वास असून पैशावर वातावरण बदलता येते. अशा समजातून गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत पैशाची अतिवृष्टी झाली होती. याचा काहीही फायदा झाला नाही.तरी पण आगामी निवडणुकीत आर्थिक ढगफुटी होणार आहे. यासाठी तुम्ही घर सांभाळून रहा, असा सल्ला उजनीकरांना खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी दिला .

## निलंगा येथे जशने ईद-ए-मिलादुन्नबी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २० सप्टेंबर-**

शहरात इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद (स्व.) पैगंबर यांची जयंती म्हणजेच ईद-ए-मिलादुन्नबी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील हाडगा नाका येथून मिलादुन्नबीच्या जुलूसची सुरुवात करण्यात आली.

जुलूस (रॅली) अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने निघाली होती, त्यात मुस्लिम धर्माचे मौलवी, कारी, मुफ्ती यांच्यासह छोटे चिमुकले सोबतच समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या जुलूस (मिरवणूक रॅली ) निमित्त छत्रपती शिवाजी नगर येथील युवकांतर्फे हाडगा नाका येथे शुरकूर्मा, तर अशोक नगर येथील मैत्री ग्रुपतर्फे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शुरकूर्मा वाटप, तसेच विविध ठिकाणी शिरा, सरबत, बिस्कीट पुडे, खारीक, पाणी,अन्न वाटप करण्यात आले. या जुलूसमध्ये काँग्रेसचे प्रदेश सचिव अभय साळुंके, पं.स.चे माजी सभापती अजित माने, माजी न. प. सभापती गोविंद शिंगाडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित नाईकवाडे यांनी सहभागी होऊन शुभेच्छा दिल्या. जुलूसमध्ये इस्लामिक प्रवचन व एकतेचे संदेश तसेच प्रेषित पैगंबर यांनी दिलेल्या माणुसकीचे संदेश देण्यात आले. ही मिरवणूक रॅली हाडगा नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे दत्तनगर, आनंदमुनी चौक ते पिरपाशा दर्गाह येथे सांगता करण्यात आली. या जुलूसच्याच्या यशस्वीतेसाठी कारी गुलाम गौस, कारी हबीबसाब, डॉ. सादत हुसेन, दादापीर दर्गाह चे जहीर बाबा कादरी, अजगर अन्सारी, नसीम खतीब, खालील तिलगुरे, सबदर कादरी,बाबा बिबराले, इम्रान सय्यद, वसीम अत्तार यांनी परिश्रम घेतले.



## काँग्रेस पक्षाचा हात आम आदमी के साथ

### महिला मेळाव्यात वैशाली देशमुख यांनी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २० सप्टेंबर-**

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यापासून देशाला महासत्ता बनविण्यापर्यंतचा सर्वांगिण विकास काँग्रेस पक्षानेच केलेला आहे.सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून काँग्रेस पक्षाने धोरणं आखून त्याची यशस्वी अंमलबजावणी केली. तोच धागा पकडून विकासरत्न विलासराव देशमुख यांनी महाराष्ट्राचा विकास केला.त्यांच्या विचारावर पाऊल टाकत माजी मंत्री आमदार अमित देशमुख व आमदार धिरज देशमुख काँग्रेस पक्षाचा हात आम आममी के साथ, या उक्तीप्रमाणे सर्वसामान्यांच्या विकासाच्या योजना मोठ्या प्रमाणात राबवित आहेत.त्यामुळे येत्या काळातही तमाम मतदारांनी पुन्हा काँग्रेस पक्षाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली देशमुख यांनी केले.

रेणापूर तालूक्यातील इंदरठाणा, दर्जीबोरगाव, गव्हाण येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी बचत गटांच्या महिलांशी संवाद साधताना श्रीमती वैशालीताई देशमुख बोलत होत्या. यावेळी रीड लातूरच्या संस्थापिका दीपशिखा देशमुख, डॉ. सारीका देशमुख, सुनिता अरळीकर, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव



मोरे, जिल्हा बँकेचे व्हाईस अॅड. प्रमोद जाधव, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेरमण अनंतराव देशमुख, रेणापूर महिला काँग्रेस अध्यक्षा पूजा इगे, रेणापूर महिला कॉग्रेस शहर अध्यक्षा निर्मला गायकवाड यांच्यासह आदी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या, विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आमदार धिरज देशमुख व त्यांचे सर्व सहकारी लातूर ग्रामीण मतदारसंघाच्या विकासासाठी कायम तत्पर आहेत. आमदार धिरज देशमुख यांनी गेल्या पाच वर्षात मतदारसंघाचा केलेला विकास आपल्या समोर आहे. दृश्यस्वरुपात विकासाची कामे आपल्याला पाहता येतील. शिवाय मांजरा परिवारातील साखर कारखाने आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकजयांमध्ये आर्थिक क्रांती घडविली आहे. त्यामुळे विकासाच्या गप्पा मारणाजयांना अजिबात थारा न देता आमदार धिरज देशमुख यांना आशिर्वाद द्यावा.

याप्रसंग दैवशाला जोगदंड, फरजाना सय्यद, सरस्वती पवार, सरिता पवार, अनिता पवार, दिपाली माने, मंगलबाई घोडके, सारिकाबाई घोडके, मैणाबाई घोडके, शालूबाई क्षीसागर, मेराजबी सय्यद, कुशिर्वता रणदिवे, प्रतिक्षा माने, अश्वीनी पवार, किमाइण इंगोले, सावित्री पवार, रेखा पवार, प्रियंका पवार, चंद्रकला पवार यासह आदी महिलांची उपस्थिती होती.

**पुन्हा एकदा संधी द्या, विश्वासाने विकास करुन घ्या**

रीड लातूरच्या संस्थापिका सौ. दीपशिखा धिरज देशमुख महिलांशी संवाद साधताना म्हणाल्या, आमदार धिरज देशमुख यांनी गेल्या पाच वर्षांत प्रामाणिकपणे मतदारसंघाचा विकास केला. मतदारसंघातील मतदारांनी पुन्हा एकदा आमदार धिरज देशमुख यांना संधी देऊन विश्वासाने विकास कामे करुन घ्यावीत, असे आवाहन केले.

## देशाच्या विकासात हिंदी भाषेचे योगदान मोलाचे : डॉ. मिश्रा



**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २० सप्टेंबर-**

देशाच्या विकासात हिंदी भाषेचे योगदान मोलाचे असून विद्यार्थ्यांनी हिंदी भाषा व साहित्याचा अभ्यास करून आपले वैचारिक विश्व प्रगल्भ करावे असे प्रतिपादन कै. रसिका महाविद्यालय, देवणी येथील माजी प्राचार्य डॉ.रामेश्वर मिश्रा यांनी केले. येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने हिंदी अभ्यास मंडळाचे उद्घाटन तथा हिंदी दिनानिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ.सचिन हंचाटे होते. व्यासपीठावर हिंदी विभागप्रमुख डॉ.जाफर चौधरी, डॉ.भगवान कदम, हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष शिल्पा सुर्यवंशी, उपाध्यक्ष राधा शिंदे उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. रामेश्वर मिश्रा यांनी विद्यार्थ्यांनी आपले नियमित अध्ययन व करिअर सिद्धीसोबतच हिंदी भाषेतून परस्पर संवाद, निबंध-कथा व कविता लेखन, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा इत्यादींमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. जीवन जगताना कठीण व प्रतिकूल परिस्थिती आल्यास त्याला न डगमगता अंगी सहनशीलता बाळगून धैर्याने तोंड देत मार्ग काढला पाहिजे. अध्यक्षीय समारोप डॉ.सचिन हंचाटे यांनी केले. याप्रसंगी शिल्पा सुर्यवंशी, ज्योती मरगणे, प्रितम कल्याणे, सना शेरीकर व साक्षी पौळ या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिया मुल्ला यांनी केले. प्रास्ताविक डॉ.जाफर चौधरी यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ.भगवान कदम यांनी मानले. यावेळी डॉ.नागनाथ तेलंगे, विलास होटकर, राजेंद्र बेलुरे उपस्थित होते.

# वडवळचे संजीवनी बेट आयुर्वेदाचे मुख्य केंद्र

### दुर्धर आजारांवरील वनौषधी बेटावर उपलब्ध

### यात्रेसाठी विविध राज्यांतील पर्यटकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा । सतीश गाडेकर**
**चाकूर, दि. २० सप्टेंबर-**

वडवळ येथील संजीवनी वनस्पती बेटावर पर्यटक रुग्ण वनस्पती प्रेमी वैद्य मोठ्या संख्येने वनस्पती यात्रेसाठी येण्यास सुरुवात झाली. येथील संजीवनी वनस्पती बेटाची यात्रा १३ सप्टेंबर पासून सुरू झाली असून २७ सप्टेंबरपर्यंत ही यात्रा चालते. यात्रेसाठी बाहेरील तीन राज्यातून रुग्ण वैद्य वनस्पती प्रेमी व पर्यटक हे अनेक वर्षापासून न चुकता येथील वनस्पती सेवन करण्यासाठी बर्याच ठिकाणाहून येत असतात वनौषधी उत्तरा नक्षत्रामध्ये सेवन केल्याने अनेक आजार कायमचे बरे होत असल्याचे जाणकार व वनस्पती सेवन करणारे सांगत आहेत. या बेटावरती येणारा प्रत्येक जण एक वेळेस या संजीवनी बेटावर आल्यास तो कायम वनस्पती सेवन करण्यासाठी दरवर्षी न चुकता येतोच हा एक येथे येणाऱ्या रुग्ण पर्यटक व वनस्पती प्रेमीच्या तोंडून बोलत असतो अशा या यात्रेस सुरुवात झाली असून पहिल्याच दिवशी शाळेच्या सहलीने संजीवनी वनस्पती बेट यात्रामय झाला होता तर संजीवनी वनस्पती बेट हिरवा गार सज्ज असा रुग्णांच्या सेवेसाठी परिपूर्ण झाल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे.

**संजीवनी वनस्पती बेटावरील वैशिष्ट्ये**

येथील संजीवनी वनस्पती बेटाच्या पायथ्याला भव्य असे वैद्य निवास असून येणाऱ्या रुग्णांना येथे राहता व उपचारही घेता येणार आहेत तर बेटावर जाण्यासाठी बऱ्याचशा पायऱ्या चढून वरती जावे लागते पायऱ्याच्या वरच्या बाजूलाच मोठी गुहा असून या गुहेत टॉर्च किंवा दिवा मेणबत्ती घेऊन आत मधी थोड्या अंतरावर गेल्यानंतर प्रकाश नाहीसा होतो असे आत मध्ये जाणारे बरेच जण सांगतात तर संजीवनी बेटावर हनुमान मंदिर विठ्ठल रुक्मिणी मंदिर व देवीचे मंदिर व अनुष्ठान वेळी डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांनी स्थापन केलेले शिवलिंग आहे तसेच काही अंतरावर लोटांगण पॉईंट आहे तर रामकुंड म्हणून खूप असा खोल व मोठ्या आकाराचा कुंड असून यामध्ये विविध वनस्पती आढळतात तर थोड्या अंतरावर सीतेची नहानी किंवा ब्रह्मकुंड आहे असेही अनेक जण या कुंडास म्हणतात. तेथून पुढे आल्यानंतर हवेचे थंड असे व शुद्ध हवा मिळणारे ठिकाण म्हणून विशाल अशा दगडावर बेटाच्या एका बाजूस अनेक जण सूर्य अस्तमानाच्या वेळी बसतात त्यामुळे तेथे बसणाऱ्या लोकांना शुद्ध हवा मिळते तेथील खडा जिभेला लावल्यानंतर तो जिभेला चिटकतो तर रोशा गवत खूप सुगंधी व चवदार लागते तर या बेटावर लोखंडी साल जी की खाल्ल्यानंतर पानाचा विडा खाल्ल्याप्रमाणे जीभ रंगते अशा अनेक वनस्पतीनी परिपक्व असलेल्या संजीवनी वनस्पती बेटावरील वनस्पती सेवन करणारे जाणकारही या बेटाला न चुकता उतरानक्षेत्रात अवश्य येतात व येथील वनस्पती सेवन करून वर्षभर कुठलीच औषध गोळी खात नसल्याचेही अनुभव अनेक जण सांगतात तसेच या बेटावर तीन दिवस राहून रोज सकाळी दुपारी व संध्याकाळी फिरून वनस्पती सेवन करतात व तिसऱ्या दिवशी वनस्पती जेवण झाल्यानंतर खाली येऊन तलावातील पाण्याने काळया साळीचा भात व गाईचे तूप सेवन करून मगच गावी परततात.

**सेवा सुरू करण्याची मागणी**

आंध्रा कर्नाटक व बाहेरील जिल्ह्यातून रेल्वेने प्रवास करून येणाऱ्या रुग्ण व पर्यटकांसाठी रेल्वे प्रशासनाने संजीवनी वनस्पती बेटाच्या यात्रेनिमित्त येथे सर्व गाड्यांना थांबा द्यावा, अशी मागणी गावकऱ्यांसह येणाऱ्या रुग्ण व पर्यटकांमधून होत आहे तर बस सेवा ही सुरू करण्याची मागणी होत असून याकडे लातूर जिल्ह्याचे खासदार डॉ. शिवाजी काळगे तसेच रेल्वे प्रशासनाने व परिवहन विभागाने लवकरात लवकर द्यावे कारण १३ सप्टेंबर पासून यात्रेस सुरुवात झाली असून २७ सप्टेंबरला ही यात्रा संपणारा असून याबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन येथे रेल्वे गाड्या बस सेवा थांबण्याचा निर्णय घ्यावा, अशी ही मागणी मोठ्या प्रमाणात होते.

**यात्रेसाठी ग्रामपंचायत सज्ज**

येणाऱ्या सर्व रुग्णांना व भाविकांना पर्यटकांना वनस्पती प्रेमींना पिण्याच्या पाण्याची सोय तर संजीवनी वनस्पती बेटावर जाणाऱ्या पायऱ्यांची साफसफाई स्वच्छता बेटावर कोठेही घाण किंवा घाण कचरा होणार नाही याची दक्षता तर बेटावर गुटखा सुपारी किंवा कुठल्याही विक्री होणार नाही याची दक्षता तसेच वनस्पती ओरबाडून नाश धूस करून कोणीही घेऊन जाऊ नये यासाठी वन विभागाचे कर्मचारी नेमण्यात येणार आहे तसेच चाकूर पोलीस यांच्या वतीने दोन वेळा गस्त व होमगार्डची नेमणूक व वनस्पतीचे माहिती दर्शवणारे फलक जागोजागी लावण्यात येणार असून बेटावर असलेल्या वनस्पतीचा उपयोग ही या फलकावर नोंदविण्यात येणार असल्याची माहिती वडवळ ग्रामपंचायतचे उपसरपंच बालाजी गंदगे यांनी दिली.

**दुर्मिळ वनस्पती या बेटावर आढळतात**

अश्वगंधा, पित्त पापडा, रोशा गवत, अडुळसा, दहीपळस, भुत्याकेशी, रामवड, काळा कुडा, तांबडा कुडा, काळा शिरीष, शिरीष, वायवर्ण, बेल, निर्मली, पळस, धामण, खिरणी, भारंगी, अडुळसा, मूरमाटी बाभूळ, बेडकी/आपमारी, निळी, कारबोर, खडक पायर, गुंज, किरायता, शालपर्णी, मेढशिंगी, माकडशिंगी, मालकांगोणी, अजाणवृक्ष, लोखंडी, बहावा, काळी टाकळी, दमवेल, रुद्रकंठी असे अनेक दुर्मिळ वनौषधी उगवण झाली असल्याचे वनस्पती प्रेमी व वनस्पतीचे जाणकार शिवशंकर चापूले यांनी माहिती दिली.

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



## आदर्श शिक्षक सन्मान पुरस्कारांचे रविवारी वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २० सप्टेंबर-**

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने वर्ष २०२४ -२५ साठी आदर्श शिक्षक सन्मान पुरस्कार देण्यात येणार असून रविवारी या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

लातूर शहरात शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य केलेल्या शिक्षकांचा रोटरी इंटरनॅशनलच्या वतीने सन्मान करण्यात येतो.यावर्षी रेनिसन्स विद्यालयाचे महेश बांगर, सरस्वती विद्यालयाच्या साधना धर्माधिकारी, शाहू महाविद्यालयाचे अभय देशमुख. दयानंद महाविद्यालयाच्या प्रा.मेघा पंडित, शाहुचे प्रा.अनिरुद्ध बिराजदार,जिप शिक्षण विभागाचे विवेक सौताडेकर यांचा आदर्श शिक्षक सन्मान पुरस्कार (नेशन बिल्डर अवॉर्ड) देऊन गौरव करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम रविवार दि.२२ सप्टेंबर रोजी सायकाळी ५ वाजता कस्तुर कंचन सभागृह, श्रीकिशन सोमाणी विद्यालय येथे संपन्न होणार आहे.

कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष चेतन पंढरीकर,सचिव गिरीश पेन्सलवार,प्रोजेक्ट चेअरमन चंद्रकांत गस्तगार व लिटरसी डायरेक्टर डॉ.दिनेश सोनी यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### मुक्ती लढ्याचा इतिहास नव्या पिढीसमोर आणण्याची गरज : उपजिल्हाधिकारी शिंदे

**उदगीर, दि. २० सप्टेंबर-**

मुक्तीलढ्याचा इतिहास जाज्वल्य असून तो नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचणे गरजेचे आहे. उदगीरमध्ये या पातळीवर होणाऱ्या सामाजिक प्रयत्नांना प्रशासनाची निश्चित साथ राहील, असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांनी केले. मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने येथील हुतात्मा स्मारक मंदिरात हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने आयोजित चित्र प्रदर्शनाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. तहसीलदार राम बोरगावकर नगर परिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर, मजवीपच्या स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटिया, सचिव प्रा. एस. एस. पाटील, श्यामलाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुपोषपाणी आर्य, अंजुमनी आर्य, साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर, दक्षिण मध्य रेल्वे समिती सदस्य मोतीलाल डोईजडे यावेळी उपस्थित होते. विजयकुमार बैले यांनी मराठवाडा गीत सादर केले. प्रा. एस. एस .पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन माधव खताळ तर राम मोतीपोवळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुरलीधर जाधव, विश्वनाथ बिरादार, दीपक बलसूरकर, गणेश मुंडे, रवी जवळे यांनी परिश्रम घेतले.



### 'कै. अशोकराव हाके- पाटील पतसंस्थेवर सभासदांचा विश्वास'

**अहमदपूर, दि. २० सप्टेंबर-**

कै. अशोकराव हाके पाटील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्था मर्यादित अहमदपूर ही पतसंस्था अल्पावधीत नावारूपास आली असून या पतसंस्थेमध्ये आतापर्यंत एक कोटी रुपये शेअर्सच्या माध्यमातून जमले आहेत हे निश्चितच अभिमानास्पद बाब असून सर्व सभासदांच्या विश्वासाचे हे प्रतीक आहे त्यामुळे कै. अशोकराव पाटील पतसंस्था म्हणजेच सभासदांचा विश्वास आहे असे प्रतिपादन श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळ मांडूरकीचे अध्यक्ष तथा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यांनी केले. अहमदपूर येथील संस्कृती लॉन्स येथे आयोजित केलेल्या कै अशोकराव हाके पाटील पतसंस्थेच्या १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर पतसंस्थेच्या अध्यक्षा तसेच संस्थेच्या सचिव तथा भाजपाच्या महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस प्राचार्या रेखा हाके, वटसिद्ध नागनाथ प्राथमिक आश्रम शाळा वडवळ नागनाथ च्या मुख्याध्यापिका मीना देवकते, पतसंस्थेचे सचिव प्रा. संतोष मुळे, प्रा हणमंत देवकते, यांच्यासह पतसंस्थेच्या कोषाध्यक्षा आशाताई रोडगे, पतसंस्थेचे संचालक परमेश्वर पाटील, प्रा. संभाजी दुर्गे, शेख इलियास, संजीवनी गुरमे,संतोष नळगिरे तसेच पतसंस्थेचे लिपिक शेषराव हुडगे आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला तसेच सभासदांच्या अशा पाल्यांचाही सत्कार करण्यात आला ज्यांचे पाल्य शासकीय किंवा निमशासकीय सेवेत रुजू झालेले आहेत. यावर्षी सभासदांना १० टक्के लाभांश देण्याचे सचिव संतोष मुळे यांनी जाहीर केले. सूत्रसंचालन प्रा. दैवशाला शिंदे आणि शेख जिलानी यांनी केले तर आभार पतसंस्थेचे सचिव संतोष मुळे यांनी मानले.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**
(दंडणीय - विभाग)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि ४१४ दि. १८/०९/२०२४

**जाहीरनामा**

अर्जदार :- श्री/श्रीमती, मांगदरे देविदास संतुका
विरुध्द
**गैरअर्जदार :-** मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्राम पंचायत
कार्यालय, कलकोटी
**अर्ज :-** कलम १३(३) जन्म-मृत्यु नोंदणी कायया,

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **श्री/श्रीमती, मांगदरे देविदास संतुका** रा. कलकोटी ता चाकुर जि. लातूर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत असुन यांचा मुलगा/मुलगी **कु. मांगदरे गजानन देविदास** जन्म दि. २७/०७/२००८ रोजी राहत्या घरी झाला आसुन मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय कलकोटी ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय कलकोटी ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि. १८/९/२०२४ पुढील तारीख २०/९/२०२४

शिक्का

**आदेशावरून**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा ना तहसिलदार,**
**तहसील कार्यालय, चाकुर**

## बुद्ध विहारांच्या माध्यमातून समानतेचे विचार पोहोचणार

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले; बुद्ध विहाराचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २० सप्टेंबर-**

औसा येथील तक्षशिला बुद्ध विहार विकास कामांचे लोकार्पण करताना अतिशय आनंद होत आहे. या बुद्ध विहाराच्या माध्यमातून गौतम बुद्धांचे शांतता आणि समानतेचे विचार समाजापर्यंत पोहचण्यास मदत होणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.

औसा येथील तक्षशीला बुद्ध विहारच्या पहिल्या टप्पातील कामाचे लोकार्पण व दुसऱ्या टप्यातील विकासकामाचे भूमीपुजन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते करण्यात आले.

विजय मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात केंद्रीय मंत्री आठवले बोलत होते. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आ. अभिमन्यू पवार, माजी आमदार बसवराज पाटील, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, भन्ते पय्यानंद, औसा नगरपरिषद मुख्याधिकारी शिंदे यांच्यासह तक्षशिला बुद्ध



विहार समितीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. केंद्रीयमंत्री रामदास आठवले म्हणाले, गौतम बुद्धांच्या विचारांचा अंगीकार करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील तळागाळातील लोकांच्या कल्याणासाठी प्रयत्न केले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशातील प्रत्येक व्यक्तीला समानतेची वागणूक मिळावे, अशी त्यांची भूमिका होती. सर्व जाती-धर्मांच्या कल्याणाचा विचार करून त्यांनी भारतीय राज्यघटना तयार केली, असे ना. आठवले म्हणाले. औसा परिसरात आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नातून सर्व समाज घटकांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात

#### सर्वांना सोबत घेऊन विकासकामे करणार आ. पवार

तक्षशीला बुद्ध विहार येथील विविध कामांसाठी २ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. याठिकाणी स्पर्धा परीक्षा अभ्यासिका सुरू करून समाजातील युवकांना स्पर्धा परीक्षा पूर्वतयारीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासह विविध विकास कामांसाठी निधी देणार असून सर्व समाजाला सोबत घेऊन विकास कामे करणार असल्याचे आ, अभिमन्यू पवार यांनी यावेळी सांगितले.

कामे झाली आहेत. जवळपास ११० गावांमधे त्यांनी समाज भवन बांधकामासाठी सहाय्य केले असून औसा येथील तक्षशीला बुद्ध विहारासाठी २ कोटी रुपये निधी त्यांनी दिला आहे. तक्षशिला बुध्द विहार विकास कामांच्या पहिल्या टप्यात ध्यानधारना केंद्र इमारतीचे बांधकाम व नूतनीकरण, प्रवेशद्वार ते ध्यानधारना केंद्रापर्यंत पार्यऱ्या, तथागत गोतम बुध्द यांच्या मुर्तीसाठी चबुतरा, विद्युतीकरण आदी कामाचा समावेश आहे. याठिकाणी प्रवेशद्वार, संरक्षण भिंत, उद्यान विकसितीकरणाची कामे दुसऱ्या टप्यात होणार आहेत. भन्ते सुमेधजी नागसेन, भन्ते धम्मासार, तक्षशिला बुध्द विहारट्रस्टचे अशोक बनसोडे, राजेंद्र बनसोडे उपस्थित होते.

## महाराष्ट्र भूषण पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २० सप्टेंबर-**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर आयोजित महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा दयानंद सभागृहात लातूर हभप गहिनीनाथ महाराज औसेकर पंढरपूर देवस्थानचे कार्याध्यक्ष यांच्या हस्ते अनेक मान्यवरांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन अनेकांना सन्मानित करण्यात आले.



मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजयजी भोकरे अध्यक्षस्थानी विराजमान होते तर या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लातूर जिल्ह्याचे नवनिर्वाचित लोकसभाचे खासदार शिवाजीरावज काळगे यांच्याकडून याप्रसंगी उपस्थिती लावण्यात आली ज्येष्ठ पत्रकार व मार्गदर्शक म्हणून जयप्रकाशजी दगडे यांच्याकडून हे काम पाहण्यात आले आणि शहराध्यक्ष महादेव डोंबे वैभव स्वामी विठ्ठल कांगणे कालिदास माने यांच्याकडूनही याप्रसंगी उपस्थिती लावण्यात आली होती आणि याप्रसंगी कालिदास माने यांना कर्मवीर भाऊराव पाटील हा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन यांना व यांच्या कौटुंबिक परिवाराला सन्मानित करण्यात आले हा पुरस्कार स्वीकारत असताना कालिदास माने यांच्यासोबत त्यांच्या पत्नी सुरेखा माने व चिरंजीव मनोज माने उपस्थित होते. कार्यक्रमाचे विनीत म्हणून लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष म्हणून असलेले अशोक देडे यांच्याकडून हे काम उत्कृष्ट पद्धतीने पाहण्यात आले.

मराठी पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे म्हणाले, पत्रकार हा कुणाचा मित्रही नसतो आणि पत्रकार हा कोणाचा शत्रूही नसतो पत्रकार हा व्यवस्थेच्या विरोधातला व्यवस्थेत काही चुका दिसून येत असतील तर व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठवणारा असतो तो सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देणारा असतो केवळ समाजाच्या राष्ट्राच्या जनसामान्यांच्या हितासाठी स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवून ज्या कुणाला ह्या जगात आपलं कोणी नाही असं वाटतं किंवा वाटण्याच्या अगोदरच त्या ठिकाणी त्याच्यासाठी पत्रकार उभा टाकलेला असतो ज्यांचं चुकतं त्यावरती नक्की बोट ठेवलंच पाहिजे ज्यांचं कौतुकास पात्र असतं त्यांचं कौतुकी केलं पाहिजे. तसेच लातूर मधील लातूर शहराच्या नैसर्गिक वैभवा मध्ये भर घालणाऱ्या डॉक्टर पवन लडा यांनी स्थापन केलेल्या ग्रीन लातूर वृक्ष टीमच यांच्याकडून कौतुक ही करण्यात आले. कार्यक्रमासाठी जिल्हाभरातून अनेक दैनिक वृत्तपत्राचे, साप्ताहिकाचे, मासिकाचे लेखक, संपादक आणि पत्रकार बांधव या ठिकाणी आवर्जून उपस्थित होते. यावेळी शिरूर अनंतपाळ तालुक्यातून ज्येष्ठ पत्रकार म्हणून आणि उजेड नगरीचे साप्ताहिकाचे संपादक उत्तम कदम दैनिक तरुण भारतचे शंकर मिटकर, राजनारायण बिरादार, नितेश झांबरे, बाबुराव बोरोळे, राम बालवाड, शिवहार कोटे उपस्थित होते.

## आ. रमेश कराड यांच्या प्रयत्नांतून भिसे वाघोली आरोग्य केंद्र मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २० सप्टेंबर-**

लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्राला भारतीय जनता पार्टीचे नेते आ. रमेश कराड यांच्या प्रयत्नातून राज्यातील महायुती शासनाने २० सप्टेंबर रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे भिसे वाघोली आणि परिसरातील रुग्णांची मोठी सोय होणार आहे.



ग्रामीण भागातील जनतेला आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात, रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित व्हावे, यासाठी भाजपाचे नेते आ. रमेश कराड यांनी राज्यातील महायुती शासनाचे मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ, तानाजी सावंत यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. कराड यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले.

लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाल्याने भिसे वाघोली सह भोसा, वाडीवाघोली, निळकंठ, शिराळा, येळी, पिंपरीआंबा, माटेफळ, करकटा, खुंटेफळ, बोरगाव, हिसोरी, खंडाळा आदी आजूबाजूच्या अनेक गावातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. भाजपा नेते आ. कराड यांचे भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, संभाजी वायाळ, सरपंच सौ. स्वंयम वायाळ, भैरवानाथ पिसाळ, शामसुंदर वाघमारे, बाबा भिसे, सुरज शिंदे, विश्वास कावळे, काशीनाथ ढगे, रशिद पठाण, योगीराज साखरे, काकासाहेब पाटील, बाबासाहेब देवकर, नामदेव मांडे, संदीप भुजबळ, तात्यासाहेब औताडे, सुधाकर नाना काळे, धनंजय जाधव, अरविंद पारवे, सचिन सवई, राहूल काळे, संदीपान काळे, बालाजी नाईकवाडे, भाऊसाहेब भिसे, शुभम खोसे, सचिन हींगे, नवनाथ भिसे, राहूल भिसे, प्रदिप शिंदे, राजाभाऊ मरे, बालाजी शिंदे, विष्णू महानवर, श्रीमंत शिंदे, काकासाहेब साखरे, जणाबाई साखरे, शिवाजी आडसूळ, विश्वनाथ शिंदे, मधुकर शिंदे, अरुण शिंदे, शिवराम शिंदे यांच्यासह भिसे वाघोली आणि त्या परिसरातील भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी आभार व्यक्त केले आहे.

## बहुजन कल्याणाच्या योजनांसाठी निधी कमी पडणार नाही

### मंत्री अतुल सावे

### किल्लारी येथील योजनांच्या जागरला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**औसा दि.२० सप्टेंबर-**

विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्गाच्या विकासासाठी राज्य शासनाकडून विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्यासाठी शिष्यवृत्ती, आश्रमशाळा, तांडा वस्तीच्या विकासासाठी निधी, घरकुल योजना, विविध महामंडळांच्या माध्यमातून अर्थसहाय्य देण्यात येत आहे. यामाध्यमातून बहुजन समाजाच्या कल्याणाचा शासनाचा प्रयत्न असून या योजनांसाठी राज्य शासन निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासन इतर मागास बहुजन कल्याण व गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी दिले

तालुक्यातील किल्लारी येथील शेतकरी सहकारी साखर कारखाना परिसरात 'उत्कर्ष बहुजनांचा, संकल्प बहुजन कल्याणाचा' या संकल्पनेतून आयोजित विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागास वर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या 'विविध कल्याणकारी योजनांचा जागर' कार्यक्रमाचे उद्घाटन मागास बहुजन कल्याण व गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आले . त्यावेळी ते बोलत होते. आमदार योगेश टिळेकर, आमदार अभिमन्यू पवार, माजी मंत्री बसवराज पाटील, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक दिलीप राठोड, सहायक संचालक शिवकांत चिकुर्ते, औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे,



तहसीलदार घनश्याम अडसूळ, भटके विमुक्त विकास परिषदेचे कार्यवाह नरसिंग झरे यावेळी उपस्थिती होते.

मंत्री अतुल सावे म्हणाले, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने ग्रामीण भागातील ९७८ आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जात आहे. धनगर समाजातील मुलांना नामांकित शाळांमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळावे, यासाठी यावर्षी १६ हजार ५०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यास मंजुरी दिलेली आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्गाच्या ७५ विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येत असल्याचे मंत्री अतुल सावे यांनी सांगितले. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील बेरोजगार युवकांना कर्ज योजना आणि व्याज परतावा योजनेचा लाभ दिला जात आहे.

राज्य शासनाने राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, पैलवान मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ, गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, जगतज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ, सुतार समाज आर्थिक विकास महामंडळ अशी विविध विकास महामंडळे स्थापन केली आहेत. यामाध्यमातून बहुजन कल्याणाच्या योजना राबविण्यात येणार असल्याचे मंत्री अतुल सावे म्हणाले. गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे यांनी आभार मानले. उध्दव फड यांनी सूत्रसंचालन केले.

#### लाभार्थ्यांना विविध योजनांच्या लाभांचे वाटप

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विविध योजनांच्या लाभार्थ्यांना यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात लाभ प्रमाणपत्र देण्यात आले. यामध्ये औसा येथील दिलीप शंकरराव गोदमे यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण विभागाच्यावतीने गृहपयोगी साहित्य, किनीथोट येथील अंगद भाऊराव काळे यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून सिंचन विहीर, अपचुंदा येथील रामेश्वर ज्ञानोबा कात्रे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी आवास योजनेतून घरकुल, किल्लारी येथील श्रीमती द्वारकाबाई पांढरी गायकवाड यांना संजय गांधी निराधार योजनेतून निवृत्तीवेतन लाभ वितरीत करण्यात आला.




## उदगिरात डेअरी बचाव पुनरुज्जीवन समितीचे आंदोलन

### दूध योजना पूर्ववत सुरू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २० सप्टेंबर-**

येथील शासकीय दूध भुकटी प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करण्यात यावे व यानंतरच या प्रकल्पातील भंगाराचा लिलाव करण्यात यावा. या मागणीसाठी येथील दूध योजना पुनरुज्जीवन समितीच्या वतीने गुरुवारी डेअरी समोर धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात कृती समितीचे आशिष पाटील राजूरकर, अजित शिंदे, नरेश सोनवणे, अहमद सरवर, मोतीलाल डोईजोडे, प्रा. एस. एस. पाटील, संतोष कुलकर्णी, चंद्रकांत टेंगेटोल, ओम गांजूरे या समिती सदस्यांसह माजी आमदार शिवराज तोंडचिरकर, रंगा राचुरे,भरत चामले, माजी नगराध्यक्ष बसवराज बागबंदे, माजी सभापती शिवाजी मुळे, मनोज पुदाले, ॲड. दत्ता पाटील, मनसेचे संजय राठोड, अजीम दायमी, गजानन सताळकर, सेनेच्या अरुणा लेंडाणे, विवेक जाधव, मंजूर खान पठाण, स्वप्नील जाधव, सुरेश पाटील नेत्रगावकर,प्रमोद पाटील यांच्यासह डेअरी पुनरुज्जीवन समितीस पाठिंबा देण्यासाठी आलेले नागरिक उपस्थित होते.

दूध डेअरी पूर्ववत सुरू झाल्याशिवाय या डेअरीतील शिल्लक असलेल्या मशिनरीचा एक नट बोल्टही हलवू देणार नसल्याचा पवित्रा या समितीने घेतला. आभार कपील शेटकार यांनी मानले.